भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# कारखाना अधिनियम, १९४८

(१९४८ चा अधिनियम क्रमांक ६३)

[३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The factories Act, 1948

**(Act No. 63 of 1948)**

[As in force on the 31st August 1995]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९६
[किंमत : रु.       ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला फॅक्टरीज ॲक्ट, १९४८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक ३, दिनांक ७ डिसेंबर १९९५ यात पृष्ठ १३२ ते १८९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यांत आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ७ डिसेंबर १९९५.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Factories Act, 1948 as on the 31st August 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India Extraordinary Part XII, Section 1, No. 3, Vol. 6, dated 7th December 1995 on pages 132 to 189.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 7thDecember1995.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. निरसन व विशोधन अधिनियम, १९४९ (१९४९ चा ४०).

२. विधि अनुकूलन आदेश, १९५०.

३. निरसन व विशोधन अधिनियम, १९५० (१९५० चा ३५).

४. भाग ख राज्ये (विधि) अधिनियम, १९५४ (१९५४ चा २५).

५. कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १).

६. भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १८).

७. केंद्रीय श्रमिक विधि (जम्मू व काश्मीर येथे लागू करणे) अधिनियम, १९७० (१९७० चा ५१).

८. कारखाना (विशोधन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ९४).

९. कारखाना (विशोधन) अधिनियम, १९८७ (१९८७ चा २०).

# कारखाना अधिनियम, १९४८

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण एक

### प्रारंभिक

विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. निर्वचन.

३. दिवसाच्या वेळेसंबंधी निर्देश.

४. निरनिराळी खाती म्हणजे वेगवेगळे कारखाने असल्याचे अथवा दोन किंवा अधिक कारखाने म्हणजे एकच कारखाना असल्याचे जाहीर करण्याचा अधिकार.

५. सार्वजनिक आणीबाणीच्या प्रसंगी सूट देण्याचा अधिकार.

६. कारखान्यांना मान्यता देणे, लायसने देणे व त्यांची नोंदणी करणे.

७. कार्यचालकाने नोटीस देणे.

७क. कार्यचालकाची सर्वसाधारण कर्तव्ये.

७ख. कारखान्यातील वापरासाठी असलेल्या वस्तू आणि पदार्थ यांच्या संबंधात निर्माते इत्यादींची सर्वसाधारण कर्तव्ये.

### प्रकरण दोन

### निरीक्षण कर्मचारीवर्ग

८. निरीक्षक.

९. निरीक्षकांचे अधिकार.

१०. प्रमाणन शल्यचिकित्सक.

### प्रकरण तीन

### आरोग्य

११. स्वच्छता.

१२. गाळसाळ व सांडपाणी यांची विल्हेवाट लावणे.

१३. वायुवीजन व तपमान.

१४. रज:कण व धूम.

१५. कृत्रिम आर्द्रीकरण.

१६. अतिगर्दी.

१७. प्रकाश योजना.

१८. पिण्याचे पाणी.

१९. शौचकूप व मुताऱ्या.

२०. थुंकपात्रे.

कलमे

प्रकरण चार

## सुरक्षितता

२१. यंत्रसामग्रीस कुंपण घालणे.

२२. चालू असलेल्या यंत्रावर किंवा यंत्राजवळ काम करणे.

२३. धोक्याच्या यंत्रांवर अल्पवयीन व्यक्तींना कामावर लावणे.

२४. वीजप्रवाह बंद करण्यासाठी स्ट्राईकिंग गिअर व साधने.

२५. स्वयंचलित यंत्रे.

२६. नवीन यंत्रसामग्रीला आवरण घालणे.

२७. कापूस खोलणी यंत्राजवळ स्त्रियांस व बालकांस कामावर लावण्यास मनाई.

२८. पाळणे व लिफ्ट.

२९. उचलयंत्रे, साखळदंड, दोरखंड व उचलतेगार.

३०. वर्तुळाकार फिरणारी यंत्रसामग्री.

३१. दाब संयंत्र.

३२. मजले, जमिनी, जिने व प्रवेशमार्ग.

३३. फरशीमधील खड्डे, डबरे, विवरे, वगैरे.

३४. अति वजनाची ओझी.

३५. डोळ्यांचे संरक्षण.

३६. अपायकारक धूम, वायू इत्यादी यांच्या बाबतीत बाळगावयाची सावधगिरी.

३६क. हातवाही विजेच्या दिव्याच्या वापराबाबत बाळगावयाची सावधगिरी.

३७. स्फोटक किंवा ज्वालाग्राही धूळ, वायू वगैरे.

३८. आगीच्या प्रसंगी बाळगावयाची सावधगिरी.

३९. सदोष भागांची तपशीलवारी देण्यास किंवा त्यांच्या सजबुतीची चाचणी घेण्यास फर्माविण्याचा अधिकार.

४०. इमारतींची व यंत्रसामग्रीची सुरक्षितता.

४०क. इमारतींची देखभाल.

४०ख. सुरक्षा अधिकारी.

४१. या प्रकरणास पूरक म्हणून नियम करण्याचा अधिकार.

प्रकरण चार-क

## धोक्याच्या प्रक्रियेशी संबंधित उपबंध

४१क. स्थळ मूल्यन ठरवणाऱ्या समितीची स्थापना.

४१ख. कार्यचालकाने माहिती उघड करणे सक्तीने असणे.

४१ग. धोक्याच्या प्रक्रियेसंबंधात कार्यचालकाची विवक्षित जबाबदारी.

४१घ. चौकशी समिती नेमण्याची केंद्र शासनाची शक्ती.

४१ङ. आणीबाणी विषयक मानके.

४१च. रसायने आणि विषारी पदार्थ यांच्या उद्भासनाची अनुज्ञेय मर्यादा.

४१छ. सुरक्षा व्यवस्थेमधील कामगारांचा सहभाग.

४१ज. निकटवर्ती धोक्यासंबंधी इशारा देण्याचा कामगारांचा अधिकार.

कलमे

प्रकरण पाच

कल्याण कार्य

४२. धुण्याच्या सोयी.

४३. कपडे ठेवण्यासाठी व सुकविण्यासाठी सोयी.

४४. बसण्याच्या सोयी.

४५. प्रथमोपचाराची साधने.

४६. आहारगृहे.

४७. निवाऱ्याच्या जागा, विश्रांतिकक्ष आणि भोजनकक्ष.

४८. पाळणाघरे.

४९. कल्याण कार्य अधिकारी.

५०. या प्रकरणास पूरक म्हणून नियम करण्याचा अधिकार.

प्रकरण सहा

प्रौढ व्यक्तींचे कामाचे तास

५१. आठवड्याचे तास.

५२. आठवडी सुट्या.

५३. भरपाई सुट्या.

५४. दररोजचे कामाचे तास.

५५. विश्रांतीसाठी मध्यंतरे.

५६. कार्यकाल विस्तार.

५७. रात्रपाळ्या.

५८. परस्परव्यापी पाळ्यांस मनाई.

५९. अतिकालिक कामाबद्दल जादा वेतन.

६०. दोन ठिकाणी कामास लावण्यावर निर्बंध.

६१. प्रौढ कामगारांकरिता कामाच्या अवधीबाबतची नोटीस.

६२. प्रौढ कामगारांची नोंदवही.

६३. कामाचे तास हे कलम ६१ खालील नोटीस व कलम ६२ खालील नोंदवही या दोहोंशी अनुरूप असणे.

६४. सूट देण्याबाबत नियम करण्याचा अधिकार.

६५. सूट देण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार.

६६. स्त्रियांना कामावर लावण्यावर आणखी निर्बंध.

प्रकरण सात

अल्पवयीन व्यक्तींना कामावर लावणे

६७. अल्पवयीन बालकांना कामावर लावण्यास मनाई.

६८. प्रौढ नसलेल्या कामगारांनी टोकने बाळगणे.

६९. स्वास्थ्य प्रमाणपत्रे.

७०. किशोरास दिलेल्या स्वास्थ्य प्रमाणपत्राचा परिणाम.

७१. बालकांसाठी कामाचे तास.

७२. बालकांकरिता कामाच्या अवधीबाबतची नोटीस.

कलमे

७३. कामगार बालकांची नोंदवही.

७४. कामाचे तास, कलम ७२ खालील नोटीस व कलम ७३ खालील नोंदवही या दोहोंशी जुळते असणे.

७५. वैद्यकीय तपासणी करून घेण्यास फर्मावण्याचा अधिकार.

७६. नियम करण्याचा अधिकार.

७७. विधीच्या इतर विवक्षित उपबंधांना आडकाठी नाही.

प्रकरण आठ

## वार्षिक सवेतन रजा

७८. प्रकरणाची प्रयुक्ती.

७९. वार्षिक सवेतन रजा.

८०. रजेच्या मुदतीतील वेतन.

८१. विवक्षित बाबतीत रक्कम आगाऊ देणे.

८२. देण्यात न आलेले वेतन वसूल करण्याची पद्धती.

८३. नियम करण्याचा अधिकार.

८४. कारखान्यांना सूट देण्याचा अधिकार.

प्रकरण नऊ

## विशेष उपबंध

८५. विवक्षित परिवास्तूंना अधिनियम लागू करण्याचा अधिकार.

८६. सार्वजनिक संस्थांना सूट देण्याचा अधिकार.

८७. धोक्याची कामे.

८७क. गंभीर धोक्यामुळे कामावर लावण्यास प्रतिबंध करण्याची शक्ती.

८८. विवक्षित अपघातांबाबत नोटीस.

८८क. विवक्षित धोकादायक घटनांची नोटीस.

८९. विवक्षित रोगांबाबत नोटीस.

९०. अपघाताच्या किंवा रोगाच्या प्रकरणांची चौकशी करण्याबद्दल निदेश देण्याचा अधिकार.

९१. नमुने घेण्याचा अधिकार.

९१क. सुरक्षा व व्यावसायिक आरोग्यविषयक पाहणी.

प्रकरण दहा

## शिक्षा व कार्यपद्धती

९२. अपराधांबद्दल सर्वसाधारण दंड.

९३. विवक्षित परिस्थितीत परिवास्तूच्या मालकांचे दायित्व.

९४. पूर्वीच्या दोषसिद्धीनंतर वाढीव शिक्षा.

९५. निरीक्षकास अडथळा केल्याबद्दल शिक्षा.

९६. कलम ९१ खालील विश्लेषणाचा निकाल गैरपणे जाहीर केल्याबद्दल शिक्षा.

९६क. कलमे ४१ ख, ४१ग व ४१ज यांच्या उपबंधांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

९७. कामगारांनी केलेले अपराध.

९८. खोटया स्वास्थ्य प्रमाणपत्राचा उपयोग केल्याबद्दल शिक्षा.

कलमे

९९. बालकाला दोन ठिकाणी कामावर लावण्यास परवानगी दिल्याबद्दल शिक्षा.

१००. विवक्षित बाबतीत कार्यचालक निश्चित करणे.

१०१. विवक्षित बाबतीत कार्यचालकास किंवा व्यवस्थापकास दायित्वातून सूट.

१०२. आदेश देण्याचा न्यायालयाचा अधिकार.

१०३. कामावर असण्यासंबंधी गृहीतक.

१०४. वय सिद्ध करण्याची जबाबदारी.

१०४क. व्यवहार्यतेची मर्यादा शाबीत करण्याची जबाबदारी.

१०५. अपराधांची दखल घेणे.

१०६. खटल्यांची मुदत.

१०६क. अपराधासाठी कार्यवाही इ. विचारात घेण्याची न्यायालयाची अधिकारिता.


## प्रकरण अकरा

## पुरवणी


१०७. अपिले.

१०८. नोटिसा लावणे.

१०९. नोटिसा बजावणे.

११०. प्रतिवेदने.

१११. कामगारांची आबंधने.

१११क. कामगारांचे अधिकार, इत्यादी.

११२. नियम करण्याचा सर्वसाधारण अधिकार.

११३. निदेश देण्याचे केंद्राचे अधिकार.

११४. सुविधा व सुखसोयी यांबद्दल आकार न घेणे.

११५. नियम प्रसिद्ध करणे.

११६. सरकारी कारखान्यांस अधिनियम लागू होणे.

११७. अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

११८.
११८क. } माहिती प्रकट करण्यावर निबंध.

११९. १९७० चा अधिनियम ३७ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी हा अधिनियम परिणामक असणे.

१२०. निरसन व व्यावृत्ती.

अनुसूची—१ ली.

अनुसूची—२ री.

अनुसूची—३ री.

शब्दसूची—इंग्रजी—मराठी.

शब्दसूची—मराठी—इंग्रजी.

# कारखाना अधिनियम, १९४८

## (सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ६३)[1]

(३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान) [२३ सप्टेंबर, १९४८]

**कारखान्यांतील मजुरांच्या कामाचे विनियमन करण्यासंबंधीचा विधी एकत्र करण्यासाठी व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, कारखान्यांतील मजुरांच्या कामाचे विनियमन करण्यासंबंधीचा विधी एकत्र करणे व विशोधित करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'कारखाना अधिनियम, १९४८' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

[2][(२) त्याचा विस्तार [3]* * * * संपूर्ण भारतभर आहे.]

(३) तो दिनांक १ एप्रिल, १९४९ रोजी अंमलात येईल.

२. विषय किंवा संदर्भ यामध्ये काहीही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमात— निर्वचन.

(क) "प्रौढ" याचा अर्थ, जिच्या वयास अठरावे वर्ष पूर्ण झाले आहे ती व्यक्ती, असा आहे;

(ख) "किशोर" याचा अर्थ, जिच्या वयास पंधरावे वर्ष पूर्ण झाले आहे, परंतु अठरावे वर्ष पूर्ण झालेले नाही ती व्यक्ती, असा आहे ;

[4][(खख) "कॅलेंडर वर्ष" याचा अर्थ, कोणत्याही वर्षात जानेवारीच्या १ तारखेपासून सुरू होणारा बारा महिन्यांचा कालावधी, असा आहे ; ]

(ग) "बालक" याचा अर्थ, जिच्या वयास पंधरावे वर्ष पूर्ण झालेले नाही ती व्यक्ती, असा आहे ;

[5][(गक) ह्या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाच्या संबंधात "सक्षम व्यक्ती" याचा अर्थ, या अधिनियमाच्या उपबंधान्वये कारखान्यामध्ये करणे आवश्यक असतील अशा चाचण्या, तपासण्या, आणि निरीक्षणे पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, मुख्य निरीक्षकाने अशा चाचण्या, तपासण्या आणि निरीक्षणे करण्याच्या दृष्टीने,

(एक) व्यक्तीच्या अर्हता आणि अनुभव आणि तिला उपलब्ध असलेल्या सोयी,

(दोन) संस्थेमध्ये कामावर लावलेल्या व्यक्तींच्या अर्हता व अनुभव आणि संस्थेत तिला उपलब्ध असलेल्या सोयी,

विचारात घेऊन, मान्यता दिलेली अशी एखादी व्यक्ती किंवा संस्था असा आहे आणि एखाद्या कारखान्याच्या बाबतीत सक्षम व्यक्ती म्हणून एकापेक्षा अधिक व्यक्तींना किंवा संस्थांना मान्यता देता येईल.

(गख) "धोक्याची प्रक्रिया" याचा अर्थ, ज्या प्रक्रियेमध्ये विशेष काळजी घेतल्याशिवाय, तीमध्ये वापरण्यात आलेला कच्चा माल किंवा अर्धवट तयार झालेले किंवा तयार झालेले उत्पादन किंवा उप-उत्पादन, गाळ-साळ किंवा सांडपाणी यांमुळे,—

(एक) त्या प्रक्रियेत गुंतलेल्या किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तीच्या आरोग्यास मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचेल, किंवा

(दोन) सर्व साधारण पर्यावरण प्रदूषण निर्माण होईल,

अशी कोणतीही, पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या उद्योगाच्या संबंधातील प्रक्रिया किंवा कार्य असा आहे :

परंतु, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील, अधिसूचनेद्वारे उक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही उद्योगांमध्ये भर घालून, उद्योग गाळून किंवा त्यात फेरबदल करून ती अनुसूची विशोधित करू शकेल.]

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी, पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९४७, भाग पाच, पृष्ठे ५८०–५८१; प्रवर समितीच्या अहवालासाठी, पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९४८, भाग पाच, पृष्ठे ५५१–५९०.
हा अधिनियम, १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची एकद्वारे दादरा व नगर हवेलीवर ; १९६३ चा विनियम ७, कलम ३ आणि अनुसूची एकद्वारे पाँडीचेरीवर ; १९६३ चा विनियम ११ याचे कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे, गोवा, दमण व दीववर आणि १९६५ चा विनियम ८, कलम ३ व अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमीन दीवी बेटांवर विस्तारित करण्यात आला.

२. अनुकूलन आदेश, १९५०, यांद्वारे आधीच्या पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

३. "जम्मू व काश्मीर राज्याखेरीज" हा मजकूर १९७० चा अधिनियम ५१, कलम २ व अनुसूचीद्वारे (१ सप्टेंबर, १९७१ रोजी व तेव्हापासून) वगळण्यात आला.

४. १९५४ चा अधिनियम २५, कलम २ द्वारे, हा खंड समाविष्ट करण्यात आला.

५. १९८७ चा अधिनियम २०, कलम २ द्वारे, समाविष्ट करण्यात आला. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून)

(घ) "अल्पवयीन व्यक्ती" याचा अर्थ, जी एकतर बालक आहे किंवा किशोर आहे ती व्यक्ती, असा आहे ;

(ङ) "दिवस" याचा अर्थ, मध्यरात्रीपासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी, असा आहे ;

(च) "आठवडा" याचा अर्थ, शनिवारच्या रात्री किंवा विशिष्ट विभागासाठी मुख्य निरीक्षक, कारखाने, याने लेखी मान्यता दिलेल्या अशा अन्य दिवसाच्या रात्री मध्यरात्रीपासून सुरू होणारा सात दिवसांचा कालावधी, असा आहे ;

(छ) "शक्ती" याचा अर्थ, विद्युत शक्ती किंवा जी शक्ती यंत्राद्वारे पारेषित केली जाते व मनुष्यनिर्मित किंवा प्राणिनिर्मित नाही अशी अन्य कोणत्याही स्वरूपातील शक्ती, असा आहे ;

(ज) "मूल गतिचालक" याचा अर्थ, कोणतेही इंजिन, गतियंत्र (मोटर) किंवा जे शक्ती निर्माण करते किंवा अन्यथा पुरविते असे इतर साधन, असा आहे ;

(झ) "पारेषण यंत्रसामग्री" याचा अर्थ, कोणतीही लाट (शाफ्ट), चाक, ड्रम, कप्पी, कप्पीची यंत्रणा, कप्लिंग, क्लच, गतिदायक कडीपट्टा (ड्रायव्हिंग बेल्ट) किंवा ज्याच्याद्वारे मूल गतिचालकाची गती एखाद्या यंत्रसामग्रीकडे किंवा उपसाधनाकडे पारेषित होते अथवा त्याला मिळते असे अन्य उपसाधन किंवा साधन, असा आहे ;

(ञ) "यंत्रसामग्री" या संज्ञेत, मूल गतिचालक, पारेषण यंत्रसामग्री आणि ज्यांच्या सहाय्याने शक्ती निर्माण करण्यात येते, तिचे रुपांतर करण्यात येते, ती पारेषित करण्यात येते किंवा कामी लावण्यात येते अशी इतर सर्व उपसाधने यांचा समावेश आहे ;

(ट) "निर्मिति प्रक्रिया" याचा अर्थ,—

(एक) कोणतीही वस्तू किंवा पदार्थ याचा उपयोग, विक्री, वाहतूक, सुपूर्दगी किंवा विल्हेवाट करण्याच्या हेतूने ती वस्तू किंवा तो पदार्थ तयार करण्याची, त्यात फेरबदल करण्याची, तो दुरुस्त करण्याची, सजवण्याची, सफाईदार करण्याची, बांधण्याची, त्याला तेल देण्याची, तो धुण्याची, स्वच्छ करण्याची, फोडण्याची, नष्ट करण्याची किंवा इतर रीतीने त्यावर संस्कार करण्याची किंवा त्यात अनुकूल बदल करून घेण्याची ; किंवा

[१][ (दोन) तेल, पाणी, मलप्रवाह अथवा अन्य कोणताही पदार्थ उपसून काढण्याची ; किंवा]

(तीन) शक्ती निर्माण करण्याची, तिचे रूपांतर करण्याची किंवा ती पारेषित करण्याची ; किंवा

[२][ (चार) मुद्रणासाठी खिळे जुळविण्याची, अक्षरमुद्रणाच्या सहाय्याने केलेल्या मुद्रणाची, शिलामुद्रणाची, उत्कीर्ण प्रकाशलेखाची किंवा तत्सम इतर कामाची किंवा पुस्तक बांधणीची; ] [३][ किंवा]

(पाच) जहाजांची किंवा जलयानांची बांधणी करण्याची, फेरबांधणी करण्याची, दुरुस्ती करण्याची, फेरजोडणी करण्याची, ती सफाईदार करण्याची किंवा मोडण्याची ; [३][ किंवा]

[४][ (सहा) शीतागारात कोणताही पदार्थ टिकवून किंवा साठवून ठेवण्याची; ]

—कोणतीही प्रक्रिया, असा आहे ;

(ठ) "कामगार" याचा अर्थ, कोणत्याही निर्मितिप्रक्रियेत अथवा निर्मिति प्रक्रियेसाठी उपयोगात आणलेल्या यंत्रसामग्रीचा किंवा परिवास्तूचा कोणताही भाग साफ करण्याच्या कामी किंवा निर्मितिप्रक्रियेशी आनुषंगिक किंवा तिच्याशी निगडित असलेले किंवा निर्मितिप्रक्रियेच्या विषयाशी संबंधित असलेले इतर कोणत्याही प्रकारचे काम करण्यासाठी [५][प्रत्यक्षपणे किंवा (कंत्राटदारासकट) कोणत्याही यंत्रणेद्वारे किंवा यंत्रणेमार्फत प्रमुख नियोक्त्याच्या कळत वा नकळत कामावर लावलेली व्यक्ती, असा आहे ; मग तिला पारिश्रमिक देण्यात येत असो किंवा नसो, ] [६][पण, यात संघराज्याच्या सशस्त्र सेनेच्या कोणत्याही सदस्याचा समावेश होत नाही] ;

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २ (१) (क) द्वारे, मूळ उपखंड (दोन) ऐवजी हा उपखंड दाखल करण्यात आला.

२. १९५४ चा अधिनियम २५, कलम २ द्वारे, उपखंड (चार) ऐवजी हा उपखंड दाखल करण्यात आला.

३. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २ (१) (ख) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २(१) (ग) द्वारे, हा उपखंड (सहा) समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २(२) (क) द्वारे, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम २(२) (ख) द्वारे, हा मजकूर शेवटी समाविष्ट करण्यात आला.

(ड) "कारखाना" याचा अर्थ, ज्या परिवास्तूमध्ये,—

(एक) दहा किंवा त्याहून अधिक कामगार काम करीत असतील किंवा मागील बारा महिन्यांत कोणत्याही दिवशी काम करीत होते, आणि ज्या परिवास्तूच्या कोणत्याही भागात शक्तीच्या सहाय्याने एखादी निर्मितिप्रक्रिया चालविण्यात येत असेल किंवा तशी ती सामान्यपणे चालवली जाते अशी, किंवा

(दोन) वीस किंवा त्याहून अधिक कामगार काम करीत असतील किंवा मागील बारा महिन्यांत कोणत्याही दिवशी काम करीत होते, आणि ज्या परिवास्तूच्या कोणत्याही भागात शक्तीच्या सहाय्यावाचून एखादी निर्मिती प्रक्रिया चालवण्यात येत असेल किंवा तशी ती सामान्यपणे चालवली जाते अशी,

—प्रसीमांसहित परिवास्तू, असा आहे :

परंतु, यात [१][खाण अधिनियम, १९५२] याच्या प्रवर्तनास अधीन असलेली अशी खाण किंवा [२][संघराज्याच्या सशस्त्र सेनेच्या मालकीचे फिरते पथक, रेल्वे रनिंग शेड किंवा एखादे हॉटेल, उपहारगृह, किंवा खाद्यगृह यांचा] समावेश होत नाही; १९५२ चा ३५.

[३][[४][स्पष्टीकरण १.]—या खंडाच्या प्रयोजनार्थ कामगारांच्या संख्येची संगणना करताना, एका दिवसाच्या [५][निरनिराळ्या गटातील व टप्पागटातील] सर्व कामगार हिशेबात धरले जातील; ]

[६][स्पष्टीकरण २.—या खंडाच्या प्रयोजनार्थ कोणत्याही परिवास्तूत किंवा तीमधील कोणत्याही भागात जर अशा परिवास्तूत किंवा तीमधील कोणत्याही भागात निर्मितिप्रक्रिया चालत नसेल तर, केवळ इलेक्ट्रॉनिक आकडेवारी संस्करण युनिट किंवा संगणक युनिट बसविले आहे, या कारणावरून तो कारखाना आहे, असा त्याचा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.]

(ढ) कारखान्याचा "कार्यचालक" याचा अर्थ, कारखान्याच्या कारभारावर जिचे अंतिम नियंत्रण असते ती व्यक्ती, असा आहे, [७] * * * * * *

[८][ परंतु,

(एक) भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा अन्य संघ यांच्या बाबतीत भागीदार व्यक्तींपैकी किंवा तिच्या सदस्यांपैकी कोणत्याही एका व्यक्तीला कार्यचालक मानण्यात येईल.

(दोन) कंपनीच्या बाबतीत, कोणत्याही संचालकाला कार्यचालक मानण्यात येईल.

(तीन) केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांच्या मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील कारखान्यांच्या बाबतीत, केंद्र सरकार, राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी कारखान्यांचा कारभार चालविण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीला किंवा यथास्थिती व्यक्तींना, कार्यचालक मानण्यात येईल.]

[९][ [१०][परंतु आणखी असे की,] भाड्याने उपलब्ध असलेल्या सुक्या गोदीमध्ये ज्याची दुरुस्ती चालू आहे किंवा ज्याच्यावर देखभालीचे काम चाललेले आहे, अशा जहाजाच्या बाबतीत,—

(१) गोदीचा मालक हा,—

(क) कलम ६, कलम ७, [११][कलम ७क, कलम ७ख, ] कलम ११ किंवा कलम १२ ;

---

१. १९५४ चा अधिनियम २५, कलम २ द्वारे, "भारतीय खाण अधिनियम, १९२३ (१९२३ चा ४)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २(३) (क) द्वारे, "रेल्वे रनिंग शेड" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २(३) (ख) द्वारे, हे स्पष्टीकरण शेवटी समाविष्ट करण्यात आले.

४. १९८७ चा अधिनियम २०, कलम २ द्वारे, स्पष्टीकरणाला "स्पष्टीकरण-१" असा नवीन क्रमांक दिला (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे, मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे, समाविष्ट करण्यात आले (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

८. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे, समाविष्ट करण्यात आले (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

९. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २(४) द्वारे, हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

१०. १९८७ चा अधिनियम २०, कलम २ द्वारे, मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

११. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे, समाविष्ट करण्यात आला (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(ख) जेथवर कलम १७ चा, गोदीमध्ये किंवा गोदीसभोवती पुरेशा आणि योग्य अशा प्रकाश-योजनेची तरतूद करणे आणि ती राखणे याच्याशी संबंध आहे तेथवर ते कलम ;

(ग) अशी दुरुस्ती किंवा देखभाल करण्याच्या कामी नेमलेल्या कामगारांच्या संबंधात कलम १८, कलम १९, कलम ४२, कलम ४६, कलम ४७ किंवा कलम ४९,

---याद्वारे किंवा त्याअन्वये उपबंधित केलेल्या कोणत्याही बाबीच्या प्रयोजनार्थ कार्यचालक असल्याचे समजण्यात येईल ;

(२) जहाजाचा मालक किंवा त्याचा अभिकर्ता अथवा नौकाधिपती किंवा जहाजाचा अन्य प्रभारी अधिकारी अथवा असा मालक, अभिकर्ता, किंवा नौकाधिपती किंवा अन्य प्रभारी अधिकारी याच्याबरोबर दुरुस्तीचे किंवा देखभालीचे काम करण्यासाठी संविदा करणारी अन्य कोणतीही व्यक्ती ही,---

(क) प्रत्यक्ष तिने स्वत: किंवा अन्य कोणत्याही यंत्रणेद्वारे किंवा यंत्रणेमार्फत कामावर लावलेल्या कामगारांच्या; आणि

(ख) असा मालक, अभिकर्ता, नौकाधिपती किंवा जहाजाचा अन्य प्रभारी अधिकारी अथवा अन्य व्यक्ती यांच्याकडून केल्या जाणाऱ्या अशा दुरुस्तीच्या किंवा देखभालीच्या कामाच्या प्रयोजनार्थ वापरात असलेली यंत्रसामग्री, संयंत्र किंवा परिवास्तू,---

---यांच्या संबंधात कलम १३, कलम १४, कलम १६ किंवा कलम १७ (या परंतुकात अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून) किंवा प्रकरण चार (कलम २७ वगळून) किंवा कलम ४३, कलम ४४ किंवा कलम ४५, प्रकरण सहा, प्रकरण सात, प्रकरण आठ किंवा प्रकरण नऊ, किंवा कलम १०८, कलम १०९ किंवा कलम ११० याद्वारे किंवा त्या खाली उपबंधित केलेल्या कोणत्याही बाबीच्या प्रयोजनार्थ, कार्यचालक असल्याचे समजण्यात येईल; ]

[१] * * *

(त) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

[२] * * *

(द) जेव्हा एकाच प्रकारचे काम दिवसातील निरनिराळ्या कालखंडात काम करणाऱ्या कामगारांच्या दोन किंवा त्याहून अधिक गटांकडून करण्यात येते तेव्हा, अशा गटांपैकी प्रत्येक गटाला [३][ "गट" किंवा "टप्पागट" ] असे संबोधले जाते आणि अशा कालखंडांपैकी प्रत्येक कालखंडाला "पाळी" असे संबोधले जाते.

दिवसाच्या वेळेसंबंधी निर्देश.

३. या अधिनियमात दिवसाच्या वेळेसंबंधी केलेले निर्देश हे, ग्रिनिच माध्य वेळेपेक्षा साडेपाच तास पुढे असणाऱ्या भारतीय प्रमाण वेळेसंबंधीचे निर्देश आहेत :

परंतु, ज्या क्षेत्रात सर्वसाधारणपणे भारतीय प्रमाण वेळ पाळण्यात येत नाही अशा कोणत्याही क्षेत्रासाठी, राज्य शासनाला,---

(क) ते क्षेत्र विनिर्दिष्ट करणारे,

(ख) त्या क्षेत्रात सर्वसाधारणपणे पाळण्यात येणारी स्थानिक माध्य वेळ निश्चित करणारे, आणि

(ग) त्या क्षेत्रात असलेल्या सर्व कारखान्यात किंवा कोणत्याही कारखान्यात अशी वेळ पाळण्याबद्दल परवानगी देणारे,

---नियम करता येतील.

निरनिराळी खाती म्हणजे वेगवेगळे कारखाने असल्याचे अथवा दोन किंवा अधिक कारखाने म्हणजे एकच कारखाना असल्याचे जाहीर करण्याचा अधिकार.

[४][४. कार्यचालकाने याबाबत अर्ज केला असता [५][ किंवा स्वत:हून ] राज्य शासन लेखी आदेशाद्वारे, [५][ आणि त्यास योग्य वाटतील अशा शर्तींच्या अधीनतेने ] असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी कार्यचालकाच्या कारखान्याची अर्जात विनिर्दिष्ट केलेली निरनिराळी खाती किंवा त्यांच्या शाखा या निरनिराळे कारखाने आहेत असे मानण्यात येईल किंवा अर्जात विनिर्दिष्ट केलेले कार्यचालकाचे दोन किंवा अधिक कारखाने हे एकच कारखाना आहे असे मानण्यात येईल. ]

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम २ द्वारे, उपखंड (ण) वगळण्यात आला (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे, खंड (थ) वगळण्यात आला.

३. १९८७ चा अधिनियम २०, कलम २ द्वारे, समाविष्ट करण्यात आला. (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

४. १९५४ चा अधिनियम २५, कलम ३ द्वारे, मूळ कलम ४ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

५. १९८७ चा अधिनियम २०, कलम ३ द्वारे, समाविष्ट करण्यात आला (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी तेव्हापासून).

[१][परंतु, कार्यचालकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज या कलमान्वये राज्य शासन स्वतःहून कोणताही आदेश देणार नाही.]

**सार्वजनिक आणीबाणीच्या प्रसंगी सूट देण्याचा अधिकार.**

५. कोणत्याही सार्वजनिक आणीबाणीच्या प्रसंगी, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यास योग्य वाटेल अशा मुदतीकरिता व अशा शर्तींवर, कोणत्याही कारखान्यास किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांना या अधिनियमाच्या [२][कलम ६७ खेरीजकरून] सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांपासून सूट देऊ शकेल :

परंतु, अशी कोणतीही अधिसूचना एका वेळी तीन महिन्यांहून अधिक मुदतीसाठी काढता येणार नाही.

[३][स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "सार्वजनिक आणीबाणी" या, शब्दप्रयोगाचा अर्थ ज्यायोगे भारताची किंवा त्याच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही भागाची सुरक्षितता धोक्यात आलेली आहे अशी गंभीर आणीबाणी, असा आहे—मग ती आणीबाणी युद्धामुळे असो किंवा बाह्य आक्रमणामुळे असो अथवा अंतर्गत विक्षोभामुळे असो.]

**कारखान्यांना मान्यता देणे, लायसने देणे व त्यांची नोंदणी करणे.**

६. (१) राज्य शासनाला पुढील गोष्टींबाबत नियम करता येतील :—

[४][(क्) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांचे आराखडे मुख्य निरीक्षक किंवा राज्य शासन यांच्याकडे सादर करण्यास भाग पाडणे ; ]

[५][(कक्)] ज्या जागेवर कारखाना उभारावयाचा असेल त्या जागेसाठी व कोणत्याही कारखान्याचे किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांचे बांधकाम करण्यासाठी किंवा त्यांचा विस्तार करण्यासाठी राज्य शासनाची अथवा मुख्य निरीक्षकाची आगाऊ लेखी परवानगी मिळविण्यास भाग पाडणे;

(ख्) अशा परवानगीकरिता येणाऱ्या अर्जांचा विचार करण्यासाठी, आराखडे व तपशीलवारी सादर करण्यास भाग पाडणे;

(ग्) अशा आराखड्यांचे व तपशीलवारीचे स्वरूप कसे असावे आणि ते कोणी प्रमाणित केले पाहिजेत ते विहित करणे ;

(घ्) कारखाने किंवा कोणत्याही वर्गाचे किंवा वर्णनाचे कारखाने यांना नोंदणी व लायसन आवश्यक करणे आणि अशा नोंदणीसाठी व लायसनांसाठी व लायसनांच्या नूतनीकरणासाठी घ्यावयाची फी विहित करणे;

(ङ्) कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेली नोटीस दिल्याशिवाय कोणतेही लायसन देता कामा नये किंवा त्याचे नूतनीकरण करता कामा नये असे फर्मावणे.

(२) पोटकलम (१) चा [६][खंड (कक्)] यामध्ये उल्लेख केलेल्या परवानगीबाबतचा अर्ज व त्यासोबत त्या पोट कलमाच्या खंड (ख्) अन्वये केलेल्या नियमानुसार आवश्यक असलेले आराखडे व तपशीलवारी राज्य शासनाकडे किंवा मुख्य निरीक्षकाकडे नोंदणी डाकेने पाठविल्यानंतर जर, अर्ज अशा रीतीने ज्या तारखेस पाठविला असेल त्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत अर्जदाराला कोणताही आदेश देण्यात आला नाही तर, उक्त अर्जात मागण्यात आलेली परवानगी देण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

(३) राज्य शासन किंवा मुख्य निरीक्षक कारखान्याच्या जागेस, बांधकामास किंवा त्याचा विस्तार करण्यास किंवा त्याची नोंदणी करण्यास व त्यास लायसन देण्यास परवानगी नाकारील त्याबाबतीत अशी परवानगी नाकारल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत अर्जदारास, ज्या निर्णयाच्या विरुद्ध त्यास अपील करावयाचे तो निर्णय जर राज्य शासनाचा असेल तर, केंद्र शासनाकडे, व इतर कोणत्याही बाबतीत राज्य शासनाकडे अपील करता येईल.

---

१. १९८७ चा अधिनियम २० कलम ३ द्वारे, जादा दाखल करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. अनुकूलन आदेश १९५०, याद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ३ द्वारे, हे स्पष्टीकरण शेवटी समाविष्ट करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४(क्) द्वारे, हा खंड समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ४(क्), द्वारे मूळ खंड (क्) ला (कक्) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

६. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ४(ख्) द्वारे, "खंड (क्)" या मजकुराएवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

*स्पष्टीकरण*.—कारखान्यातील एखादे संयंत्र किंवा यंत्रसामग्री बदलून त्याजागी दुसरे संयंत्र किंवा यंत्रसामग्री बसवली किंवा विहित करण्यात येतील अशा मर्यादांच्या आत कोणतेही संयंत्र किंवा यंत्रसामग्री जादा बसवली [1][ असून, अशा प्रकारे पहिले संयंत्र किंवा यंत्रसामग्री बदलून त्याजागी दुसरे संयंत्र किंवा यंत्रसामग्री बसवल्यामुळे किंवा जादा संयंत्र किंवा यंत्रसामग्री बसवल्यामुळे तिच्या सभोवती निर्धोकपणे काम करण्यासाठी आवश्यक असलेली किमान मोकळी जागा कमी होत नसल्यास अथवा आरोग्यास अपायकारक अशी तिच्यामुळे निर्माण होणारी किंवा बाहेर टाकली जाणारी वाफ, उष्णता, रज:कण किंवा धूम यामुळे सभोवतालच्या परिसराबर अनिष्ट परिणाम होत नसेल] तर, केवळ असे संयंत्र किंवा यंत्र सामग्री यांच्या पुन:स्थापनामुळे किंवा जादा यंत्र वा यंत्रसामग्री बसवल्यामुळे या कलमाच्या अर्थानुसार उक्त कारखान्याचा विस्तार करण्यात आला आहे असे मानले जाणार नाही.

कार्यचालकाने नोटीस देणे.

७. (१) कोणत्याही परिवास्तूमध्ये कारखाना चालवण्यास किंवा त्या कामी त्या परिवास्तूचा वापर करण्यास सुरुवात करण्यापूर्वी कमीत कमी पंधरा दिवस अगोदर कार्यचालक पुढील मजकूर असलेली एक लेखी नोटीस मुख्य निरीक्षकाकडे पाठवील :—

(क) कारखान्याचे नाव व जागा ;

(ख) कार्यचालकाचे नाव व पत्ता ;

[2][ (खख) कलम ९३ मध्ये उल्लेख केलेल्या परिवास्तूच्या किंवा इमारतीच्या (प्रसीमा धरून) मालकाचे नाव व पत्ता ; ]

(ग) कारखान्यासंबंधीचा पत्रव्यवहार कोणत्या पत्त्यावर पाठवावा तो पत्ता ;

(घ) (एक) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या कारखान्यांच्या बाबतीत, मागील बारा महिन्यांत कारखान्यात चालविण्यात आलेल्या, आणि

(दोन) सर्व कारखान्यांच्या बाबतीत, पुढील बारा महिन्यांत कारखान्यात चालवण्यात यावयाच्या,

—निर्मितिप्रक्रियेचे स्वरूप ;

[3][ (ङ) कोणत्याही स्वतंत्र राखीव संयंत्राच्या निर्धारित अश्वशक्तीचा समावेश न करता अशा कारखान्यात उभारलेली किंवा उभारावयाची एकूण निर्धारित अश्वशक्ती ; ]

(च) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कारखान्याच्या व्यवस्थापकाचे नाव ;

(छ) कारखान्यात किती कामगार कामावर लावण्यात येण्याचा संभव आहे ती संख्या ;

(ज) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या कारखान्यांच्या बाबतीत, मागील बारा महिन्यांत कामावर लावलेल्या कामगारांची दर दिवशीची सरासरी संख्या ;

(झ) विहित करण्यात येईल असा इतर तपशील.

(२) या अधिनियमाच्या कक्षेत प्रथमच आलेल्या सर्व आस्थापनांच्या बाबतीत, कार्यचालक या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून [4][तीस दिवसांच्या आत,] पोटकलम (१) मध्ये नमूद केलेला तपशील असलेली लेखी नोटीस मुख्य निरीक्षकाकडे पाठवील.

(३) जी निर्मितिप्रक्रिया सामान्यत: वर्षातून एकशेऐंशीपेक्षा कमी कामाचे दिवस इतका काळ चालवली जाते ती चालवणाऱ्या कारखान्याचे काम पुन्हा सुरू करण्यापूर्वी त्याचा कार्यचालक पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील असलेली लेखी नोटीस मुख्य निरीक्षकाकडे काम सुरू करण्याच्या तारखेच्या [4][कमीत कमी तीस दिवस आधी] पाठवील.

(४) जेव्हा जेव्हा नवीन व्यवस्थापक नियुक्त करण्यात येईल तेव्हा तेव्हा ज्या तारखेस अशी व्यक्ती कामाची सूत्रे हाती घेईल, त्या तारखेपासून सात दिवसांच्या आत कार्यचालकाला [5][निरीक्षकाकडे लेखी नोटीस व मुख्य निरीक्षकाकडे तिची एक प्रत] पाठवावी लागेल.

(५) ज्या मुदतीसाठी कोणत्याही व्यक्तीस कारखान्याचा व्यवस्थापक म्हणून नेमण्यात आले नसेल अशा कोणत्याही मुदतीत किंवा नेमण्यात आलेली व्यक्ती ज्या मुदतीत कारखान्याची व्यवस्था पाहत नसेल अशा कोणत्याही मुदतीत, जी व्यक्ती व्यवस्थापक म्हणून काम करत असल्याचे आढळून येईल अशी कोणतीही व्यक्ती किंवा अशी कोणतीही व्यक्ती आढळून न आल्यास, स्वत: कार्यचालक हा या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी कारखान्याचा व्यवस्थापक असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ४(ग) द्वारे, मूळ मजकुरात हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२. १९५४ चा अधिनियम २५, कलम ४ द्वारे, हा खंड समाविष्ट करण्यात आला.

३. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ५ द्वारे, मूळ खंड (ङ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

४. १९४९ चा अधिनियम ४०, कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. १९५४ चा अधिनियम २५, कलम ४ द्वारे, "मुख्य निरीक्षकाकडे लेखी नोटीस" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[1][७ क. (एक) प्रत्येक कार्यचालक, जेथवर वाजवीरीत्या व्यवहार्य असेल तेथवर, सर्व कामगारांचे, [1][कार्यचालकाची सर्वसाधारण कर्तव्ये.] ते कारखान्यात काम करीत असतानाचे आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याण याबाबत, खातरजमा करून घेईल.

(दोन) पोट-कलम (१) च्या, उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, असे कर्तव्य ज्या प्रकरणांबाबत असेल त्यात पुढील बाबी असतील :—

(क) संयंत्रे आणि आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित व धोकाविरहित अशी कारखान्यातील कामाची पद्धती यांबाबत तरतूद करणे व परिरक्षा करणे ;

(ख) कारखान्यामधील वस्तूंचा व पदार्थांचा वापर, हाताळणी, साठवण आणि परिवहन, यासंबंधात सुरक्षितता राहावी व आरोग्यास धोका पोचू नये याची खातरजमा करण्यासाठी कारखान्यात व्यवस्था करणे ;

(ग) कामावरील सर्व कामगारांचे स्वास्थ्य आणि सुरक्षितता यांची सुनिश्चिती करण्यासाठी आवश्यक असेल अशी माहिती, सूचना प्रशिक्षण आणि पर्यवेक्षण यांची तरतूद करणे ;

(घ) कारखान्यामधील कामाची सर्व स्थळे, आरोग्यास धोका पोचणार नाही अशा रीतीने सुरक्षित अवस्थेत राखणे आणि अशा स्थळाकडे जाण्याच्या व तेथून बाहेर पडण्याच्या सुरक्षित व धोकारहित मार्गाची तरतूद करणे व ते तसे राखणे ;

(ङ) कारखान्यामधील कामगारांसाठी कामाचे वातावरण सुरक्षित व आरोग्यास धोकाविरहित राहावे आणि कामाच्या ठिकाणी त्यांच्या कल्याणाकरिता पर्याप्त सुविधा व व्यवस्था असावी, यासाठी तरतूद करणे, देखभाल करणे किंवा संनियंत्रण करणे.

(तीन) विहित करण्यात येतील अशी प्रकारणे खेरीजकरून एरव्ही, प्रत्येक कार्यचालक, कामावरील कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षितता या संबंधीच्या त्याच्या सर्वसाधारण धोरणाचे आणि ते धोरण अंमलात आणण्यासाठी त्यावेळी अंमलात असलेली संघटना व व्यवस्था यांचे लेखी विवरणपत्र तयार करील व योग्य असेल त्या त्यावेळी त्यात सुधारणा करील आणि ते विवरणपत्र व त्यातील कोणतीही सुधारणा, विहित करण्यात येईल अशा रीतीने सर्व कामगारांच्या निदर्शनास आणून देईल.

७ ख. (१) जी व्यक्ती कोणत्याही कारखान्यामध्ये वापरासाठी असलेल्या कोणत्याही वस्तूची संकल्पना, निर्मिती, आयात, किंवा पुरवठा करीत असेल, अशी प्रत्येक व्यक्ती— कारखान्यातील वापरासाठी असलेल्या वस्तू आणि पदार्थ यांच्या संबंधात निर्माते इत्यादींची सर्वसाधारण कर्तव्ये.

(क) जेथवर वाजवीरीत्या व्यवहार्य असेल तेथवर, अशी खातरजमा करून घेईल की, त्या वस्तूची अशा रीतीने संकल्पना व बांधणी केलेली आहे की, तिचा वापर योग्य रीतीने केल्यास कामगारांचे आरोग्य सुरक्षित व धोका-रहित राहील ;

(ख) खंड (क) च्या उपबंधांच्या परिणामकारक कार्यान्वियनासाठी आवश्यक वाटतील अशा चाचण्या व परीक्षा घेईल किंवा त्या घेण्याची व्यवस्था करील ;

(ग) (एक) कोणत्याही कारखान्यातील वस्तूच्या वापरासंबंधातील ;

(दोन) ज्यासाठी त्या वस्तूचे संकल्पचित्र तयार केले असेल व चाचणी घेतलेली असेल अशा वापरासंबंधातील ;

(तीन) ती वस्तू असा वापर करण्यासाठी सुरक्षित आहे आणि कामगारांच्या आरोग्यास त्यामुळे धोका नाही, याची खात्री करून घेण्यासाठी आवश्यक असलेल्या शर्ती संबंधातील,

पुरेशी माहिती उपलब्ध होण्याची खात्री करून घेण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करील :

परंतु, जेव्हा एखाद्या वस्तूचे संकल्पचित्र किंवा निर्मिती भारताबाहेर करण्यात आलेली असेल तेव्हा आयातकाराने पुढील बाबी लक्षात घेणे त्याच्यावर बंधनकारक असेल :—

(क) ती वस्तू जर भारतात निर्माण करण्यात आली असती तर ती ज्या दर्जाची झाली असती त्याच दर्जाशी अनुरुप अशी ही वस्तू आहे, किंवा

(ख) जर अशा वस्तूच्या निर्मितीसाठी बाहेरील देशात स्वीकारण्यात आलेले मानक हे भारतात स्वीकारण्यात आलेल्या मानकापेक्षा वरच्या दर्जाचे असेल तर ती वस्तू त्या मानकाशी अनुरूप आहे.

(२) कारखान्यात वापरण्यासाठी असलेल्या कोणत्याही वस्तूचे संकल्पचित्र तयार करण्याचे वा तिची निर्मिती करण्याचे काम जी हाती घेते अशी प्रत्येक व्यक्ती, त्या वस्तूमुळे कामगारांच्या आरोग्यास किंवा सुरक्षिततेस जो धोका उद्‌भवण्याचा संभव असेल तो धोका शोधून काढण्यासाठी आणि वाजवीरीत्या व्यवहार्य असेल तेथवर, तो स्वीकारण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी आवश्यक ते संशोधन करू शकेल किंवा संशोधन करण्याची व्यवस्था करू शकेल.

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ४ द्वारे, ही कलमे समाविष्ट करण्यात आली. (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून). मात्र ७ख हे नवीन कलम दिनांक १ जून, १९८८ रोजी व तेव्हापासून अंमलात आले.

(३) पोट-कलम (१) व (२) यातील कोणत्याही गोष्टींचा अर्थ असा लावण्यात येईल की, एखाद्या व्यक्तीने, उक्त पोट-कलमांच्या प्रयोजनांसाठी तिने न केलेल्या किंवा तिच्या सांगण्यावरूनही न करण्यात आलेल्या चाचणीच्या, तपासणीच्या किंवा संशोधनाच्या निष्कर्षांवर अवलंबून राहणे जेथवर, वाजवी ठरत असेल तेथवर ती चाचणी, तपासणी किंवा संशोधन त्या व्यक्तीस पुन्हा करण्यास भाग पाडले जाईल.

(४) पोट-कलम (१) व (२) यांद्वारे कोणत्याही व्यक्तीवर लादलेले कोणतेही कर्तव्य तो करीत असलेल्या कामधंद्याच्या अनुषंगाने केलेल्या गोष्टींना आणि त्याच्या नियंत्रणाखालील बाबींना लागू होईल.

(५) जेव्हा एखादी व्यक्ती, एखाद्या वस्तूंचे संकल्पचित्र, निर्मिती, आयात किंवा पुरवठा, ती वस्तू योग्यरीत्या वापरली असता सुरक्षित व कामगारांच्या आरोग्यास धोकारहित ठरेल, याची शक्य असेल तेथवर, खातरजमा करण्याकरिता उपाययोजना करण्याच्या, अशा वस्तूच्या उपयोगकर्त्याकडून देण्यात आलेल्या लेखी हमीपत्राच्या आधारे करीत असेल तेव्हा, त्या वस्तूंचे संकल्पचित्र, निर्मिती, आयात किंवा पुरवठा करणाऱ्या व्यक्तीला पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये त्या व्यक्तीवर लादण्यात आलेल्या कर्तव्यातून, त्या हमीपत्रात नमूद केलेल्या शर्ती लक्षात घेता, जेथवर शक्य असेल तेथवर, मुक्त करण्याचा परिणाम त्या हमीपत्राद्वारे साधला जाईल.

(६) या कलमाच्या प्रयोजनासाठी, एखादी वस्तू जर, जिने तिचे संकल्पचित्र तयार केले असेल, ती वस्तू निर्माण केली असेल, आयात केली असेल किंवा पुरवली असेल, त्या व्यक्तीने त्या वस्तूच्या वापराबाबत पुरवलेली माहिती किंवा सल्ला लक्षात न घेता वापरली गेली तर ती वस्तू योग्य रीतीने वापरण्यात आली आहे असे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ "वस्तू" यामध्ये संयंत्र व यंत्रसामग्री यांचा समावेश होतो.]

## प्रकरण दोन

## निरीक्षण कर्मचारीवर्ग

निरीक्षक. ८. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, विहित केलेली अर्हता असलेल्या व्यक्तींना या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी निरीक्षक म्हणून नियुक्त करू शकेल व त्यास योग्य वाटतील अशा स्थानिक मर्यादा त्यांना नेमून देऊ शकेल.

(२) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही व्यक्तीस मुख्य निरीक्षक म्हणून नियुक्त करू शकेल आणि ती व्यक्ती या अधिनियमान्वये मुख्य निरीक्षकास प्रदान केलेल्या अधिकारांच्या जोडीला, संपूर्ण राज्यभर निरीक्षकाच्या अधिकारांचाही वापर करील.

[1][(२क) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, मुख्य निरीक्षकास सहाय्य करण्यासाठी आणि अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, मुख्य निरीक्षकाच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी त्यास योग्य वाटतील इतक्या अपर मुख्य निरीक्षकांची, सह मुख्य निरीक्षकांची व उप मुख्य निरीक्षकांची तसेच अन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करू शकेल.

(२ख) पोट-कलम (२क) अन्वये नियुक्त केलेला प्रत्येक अपर मुख्य निरीक्षक, सह मुख्य निरीक्षक, उप मुख्य निरीक्षक आणि प्रत्येक अन्य अधिकारी, जिच्याद्वारे त्याची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या मुख्य निरीक्षकाच्या अधिकाराच्या जोडीला, संपूर्ण राज्यभर, निरीक्षकाच्या अधिकाराचाही वापर करील.]

(३) ज्या कोणत्याही व्यक्तीचा एखाद्या कारखान्यात किंवा त्यात चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही प्रक्रियेत किंवा धंद्यात किंवा त्या कारखान्यांशी संबंधित असलेल्या कोणत्याही पेटंटात किंवा यंत्रसामग्रीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीतीने हितसंबंध असेल किंवा तो निर्माण होत असेल, त्या व्यक्तीला पोटकलम (१), पोट-कलम (२), [2][पोटकलम (२क)] किंवा पोटकलम (५) अन्वये नियुक्त करता येणार नाही किंवा अशा व्यक्तीस अशा रीतीने नियुक्त केले असेल तर, तिला ते पद धारण करण्याचे चालू ठेवता येणार नाही.

(४) प्रत्येक जिल्हा दंडाधिकारी आपल्या जिल्ह्यापुरता निरीक्षक असेल.

(५) राज्य शासन, उपरोक्त अधिसूचनेद्वारे, त्यास योग्य वाटतील अशा लोक पदाधिकाऱ्यांची, त्यांना प्रत्येकी नेमून देण्यात येतील अशा स्थानिक मर्यादांच्या आत, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी अतिरिक्त निरीक्षक म्हणून नियुक्तीही करू शकेल.

(६) ज्या क्षेत्रात एकाहून अधिक निरीक्षक असतील, अशा कोणत्याही क्षेत्रात, राज्य शासनाला, उपरोक्त अधिसूचनेद्वारे, अशा निरीक्षकांनी अनुक्रमे कोणत्या अधिकारांचा वापर केला पाहिजे आणि कोणत्या निरीक्षकाकडे विहित केलेल्या नोटिसा पाठवाव्यात ते जाहीर करता येईल.

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ६ (क) द्वारे, ही पोटकलमे समाविष्ट करण्यात आली.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ (ख) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१८६० चा ४५. (७) [1][या कलमाखाली नियुक्त केलेला प्रत्येक मुख्य निरीक्षक, अपर मुख्य निरीक्षक, सह मुख्य निरीक्षक, उप मुख्य निरीक्षक, निरीक्षक आणि प्रत्येक अन्य अधिकारी] हे भारतीय दंड संहिता यात अभिप्रेत असल्याप्रमाणे लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल आणि राज्य शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्यास ते पदत: दुय्यम असतील.

**निरीक्षकांचे अधिकार.** ९. याबाबत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, निरीक्षक, त्यास ज्या स्थानिक मर्यादांकरिता नेमले असेल त्या स्थानिक मर्यादांच्या आत,—

(क) ज्या कोणत्याही जागेचा कारखाना म्हणून उपयोग करण्यात येत असेल किंवा तिचा तसा उपयोग करण्यात येत आहे असे त्यास सकारण वाटत असेल त्या जागेत, शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक किंवा इतर सार्वजनिक प्राधिकरणाच्या सेवेत असतील व त्यास योग्य वाटतील अशा सहायकांसह [2][किंवा तज्ज्ञांसह] प्रवेश करू शकेल ;

[3][(ख) जागा, संयंत्र, यंत्रसामग्री, वस्तू किंवा पदार्थ यांची तपासणी करू शकेल ;

(ग) कोणत्याही अपघातासंबंधी किंवा विघातक घटनेसंबंधी—मग त्यात शारीरिक जखम, अपंगता झालेली असो वा नसो—चौकशी करील आणि अशा चौकशीसाठी त्यास आवश्यक वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीची घटनास्थळी किंवा अन्यत्र जबानी घेऊ शकेल ;

(घ) कारखान्याशी संबंधित अशी कोणतीही विहित नोंदवही किंवा इतर दस्तऐवज सादर करण्यास फर्मावू शकेल ;

(ङ) या अधिनियमाखालील जो कोणताही अपराध घडला आहे, असे मानण्यात त्यास कारण असेल अशा कोणत्याही अपराधासंबंधात त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही नोंदवही, अभिलेख किंवा इतर दस्तऐवज किंवा त्याचा कोणताही भाग जप्त करू शकेल ;

(च) खंड (ख) खालील कोणत्याही तपासणीच्या प्रयोजनार्थ, जेथवर आवश्यक असेल तेथवर, कोणतीही जागा किंवा तिचा कोणताही भाग किंवा त्यात असणारी कोणतीही गोष्ट, तिला (सर्वसाधारणपणे किंवा विशिष्ट बाबींच्यादृष्टीने) धक्का न लावता, आहे तशीच ठेवण्याचा कार्यचालकाला निदेश देऊ शकेल ;

(छ) खंड (ख) खालील कोणत्याही तपासणीसाठी त्यास आवश्यक वाटतील अशी मोजमापे आणि छायाचित्रे घेऊ शकेल आणि अशा नोंदी करू शकेल व त्यासाठी कोणतीही आवश्यक उपकरणे किंवा साधनसामग्री सोबत नेऊ शकेल ;

(ज) एखाद्या जागेमध्ये आढळलेली कोणतीही वस्तू किंवा पदार्थ यामुळे कामगारांच्या आरोग्यास किंवा सुरक्षिततेस धोका पोहोचला आहे किंवा पोहोचण्याचा संभव आहे असे त्यास दिसून आल्यास, त्याबाबतीत तो, ती वस्तू किंवा पदार्थ मोडून टाकण्याचा किंवा त्यावर कोणतीही प्रक्रिया किंवा चाचणी करण्याचा निदेश देऊ शकेल (मात्र, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी ती वस्तू किंवा पदार्थ करणे वा नष्ट करणे परिस्थितीनुरुप आवश्यक असल्याखेरीज एरव्ही तसे करण्यात येणार नाही), आणि अशा कोणत्याही वस्तूचा किंवा पदार्थाचा किंवा त्याच्या भागाचा कब्जा घेऊ शकेल व अशी चाचणी घेण्यासाठी आवश्यक असेल तोपर्यंत ती वस्तू किंवा पदार्थ अडकवून ठेवू शकेल.

(झ) विहित करण्यात येतील अशा इतर शक्तीचा वापर करू शकेल :]

परंतु, एखाद्या व्यक्तीला गुन्ह्यात गोवण्याकडे ज्याचा रोख आहे अशा प्रकारच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास किंवा तशा प्रकारचा कोणताही पुरावा देण्यास या कलमान्वये तिला भाग पाडता येणार नाही.

**प्रमाणन शल्य-चिकित्सक.** १०. (१) राज्य शासन अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायींना, त्यांना प्रत्येकी नेमून देण्यात येईल अशा स्थानिक मर्यादांच्या आत किंवा अशा कारखान्यांसाठी किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांसाठी या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, प्रमाणन शल्यचिकित्सक म्हणून नियुक्त करू शकेल.

(२) प्रमाणन शल्यचिकित्सक, राज्य शासनाच्या संमतीने, तो विनिर्दिष्ट करील अशा मुदतीपर्यंत आणि ज्या शर्ती घालणे राज्य शासनाला योग्य वाटेल त्या शर्तींच्या अधीनतेने, कोणत्याही अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीस, या अधिनियमाखालील आपल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यास प्राधिकृत करू शकेल, आणि या अधिनियमातील प्रमाणन शल्यचिकित्सकासंबंधीच्या उल्लेखांत, कोणत्याही अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीस अशा रीतीने प्राधिकृत केलेले असल्यास, त्याच्या संबंधीच्या उल्लेखांचा समावेश होतो असे मानले जाईल.

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ६ (ग) द्वारे, "प्रत्येक मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. १९८७ चा अधिनियम २०, कलम ५ द्वारे, समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून)

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे, मूळ उपखंडांऐवजी दाखल करण्यात आले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(३) जी कोणतीही व्यक्ती एखाद्या कारखान्याचा कार्यचालक असेल किंवा होईल अथवा त्या कारखान्यात किंवा त्यात चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही प्रक्रियेत किंवा धंद्यात किंवा त्या कारखान्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही पेटंटात किंवा यंत्रसामग्रीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने जिचा हितसंबंध असेल किंवा तो निर्माण होईल किंवा अन्यथा कारखान्याच्या नोकरीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस प्रमाणन शल्यचिकित्सक म्हणून नियुक्त करण्यात येणार नाही किंवा प्रमाणन शल्यचिकित्सकाच्या अधिकारांचा वापर करण्यास प्राधिकृत करण्यात येणार नाही किंवा त्या व्यक्तीला अशा रीतीने नियुक्त करण्यात आले असेल किंवा प्राधिकृत करण्यात आले असेल तर, तिला अशा अधिकारांचा वापर करण्याचे चालू ठेवता येणार नाही:

[1][परंतु, राज्य शासन लेखी आदेशाद्वारे आणि आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, कोणत्याही व्यक्तीला किंवा कोणत्याही व्यक्तींच्या वर्गाला कोणताही कारखाना किंवा कोणत्याही वर्गाचे अथवा वर्णनाचे कारखाने यांच्या संबंधात या पोटकलमात असलेल्या उपबंधातून सूट देऊ शकेल.]

(४) प्रमाणन शल्यचिकित्सकाला पुढील बाबीसंबंधी विहित करण्यात येतील अशी कामे पार पाडावी लागतील,—

(क) या अधिनियमान्वये अल्पवयीन व्यक्तींची तपासणी करणे व त्यांना प्रमाणपत्रे देणे ;

(ख) कारखान्यांमधील विहित करण्यात येतील अशा धोक्याच्या कामात किंवा प्रक्रियांत कामावर असलेल्या व्यक्तींची तपासणी करणे ;

(ग) ज्या कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांत,—

(एक) माणसे आजारी असल्याचे आढळून आले असून, तेथे चालविण्यात येणाऱ्या निर्मितिप्रक्रियेच्या स्वरूपामुळे किंवा कामाच्या इतर विद्यमान परिस्थितीमुळे ती आजारी पडली असे वाटण्यास वाजवी कारण असेल ;

(दोन) त्या कारखान्यात चालवण्यात येणाऱ्या निर्मितिप्रक्रियेत किंवा त्या प्रक्रियेत वापरण्यात येणाऱ्या पदार्थात कोणताही बदल केल्यामुळे किंवा कोणत्याही नवीन प्रक्रियेचा अवलंब केल्यामुळे किंवा निर्मितिप्रक्रियेत वापरण्यासाठी कोणत्याही नवीन पदार्थांची योजना केल्यामुळे त्या निर्मितिप्रक्रियेत कामावर लावलेल्या कामगारांच्या आरोग्याला अपाय होण्याचा संभव असेल ;

(तीन) अल्पवयीन व्यक्तींच्या आरोग्याला अपाय होण्याचा संभव असेल, अशा कोणत्याही कामावर त्यांना लावले असेल किंवा लावण्यात येणार असेल;

—अशा कोणत्याही कारखान्याच्या, किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांच्या बाबतीत विहित करण्यात येईल अशी वैद्यकीय देखरेख ठेवणे.

**स्पष्टीकरण.**—या कलमात, "अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी" या संज्ञेचा अर्थ, भारतीय वैद्यकीय पदवी अधिनियम, १९१६, याच्या अनुसूचीत किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९३३[2], याच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाने दिलेली अर्हता धारण करणारी व्यक्ती, असा होतो. **१९१६ चा ७. १९३३ चा २७.**

## प्रकरण तीन

## आरोग्य

स्वच्छता. ११. (१) प्रत्येक कारखाना स्वच्छ राखला पाहिजे आणि कोणतीही मोरी, शौचकूप किंवा इतर घाण यापासून उत्पन्न होणाऱ्या दुर्गंधीपासून मुक्त ठेवला पाहिजे, आणि विशेषेकरून,—

(क) कामाच्या कक्षातील जमिनी व बाके आणि जिने व जाण्यायेण्याचे मार्ग या ठिकाणी साचणारी घाण व कचरा झाडलोट करून किंवा इतर कोणत्याही परिणामकारक पद्धतीने दररोज काढून टाकला पाहिजे आणि योग्य रीतीने त्याची विल्हेवाट लावली पाहिजे ;

(ख) कामाच्या प्रत्येक कक्षातील जमीन, प्रत्येक आठवड्यातून कमीत कमी एकदा आवश्यक असेल तेथे जंतुनाशक द्रव्य वापरून, धुऊन किंवा इतर कोणत्याही परिणामकारक रीतीने स्वच्छ केली पाहिजे ;

(ग) कोणतीही निर्मितिप्रक्रिया चालू असताना जमीन ओली होण्याची शक्यता असून, काही मर्यादेपर्यंत त्या ओलीचा निचरा करता येण्यासारखा असेल तेथे, निचऱ्यासाठी परिणामकारक अशी व्यवस्था केली पाहिजे आणि ती नीट राखली पाहिजे ;

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ७ द्वारे, पोटकलम (३) च्या शेवटी हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

२. आता, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०) पहा.

(घ) कक्षांच्या भिंतींच्या सर्व आतील बाजू व विभाजक भिंती, अशा कक्षांची सर्व छते किंवा माथे आणि जाण्यायेण्याचे मार्ग व जिने यांच्या सर्व भिंती, बाजू व माथे यांना,—

(एक) [1][धुण्याजोगा जलरंग खेरीजकरून अन्य पक्का रंग दिलेला] असेल किंवा रोगण लावलेले असेल तर, दर पाच वर्षांच्या मुदतीत कमीत कमी एकदा पुन्हा पक्का रंग दिला पाहिजे किंवा पुन्हा रोगण लावले पाहिजे ;

[2][ (एक-क) जेव्हा धुण्याजोगा जलरंग दिलेला असेल तेव्हा, दर तीन वर्षांच्या मुदती कमीत कमी एकदा अशा रंगाचा किमान एक हात पुन्हा दिला पाहिजे आणि दर सहा महिन्यांच्या मुदतीत किमान एकदा तो धुतला पाहिजे ; ]

(दोन) पक्का रंग दिलेला असेल किंवा रोगण लावलेले असेल किंवा त्यांचा पृष्ठ-भाग गुळगुळीत व अच्छिद्र असेल तर, विहित करण्यात येईल अशा रीतीने दर चौदा महिन्यांच्या मुदतीत कमीत कमी एकदा ते स्वच्छ केले पाहिजेत ;

(तीन) इतर कोणत्याही बाबतीत, त्यांना सफेत्याचा किंवा रंगाचा हात दिला पाहिजे, आणि सफेती किंवा रंगकाम प्रत्येक चौदा महिन्यांच्या मुदतीत कमीत कमी एकदा केले पाहिजे ;

[3][ (घघ) सर्व दरवाजे आणि खिडक्यांच्या चौकटी तसेच अन्य लाकडी किंवा धातूच्या चौकटी आणि शटर्स यांना पक्का रंग किंवा रोगण लावून ठेवले पाहिजे आणि पक्का रंग किंवा रोगण लावण्याचे काम प्रत्येक पाच वर्षांच्या मुदतीत कमीत कमी एकदा केले गेले पाहिजे ; ]

(ङ) खंड (घ) अन्वये आवश्यक असलेल्या प्रक्रिया ज्या तारखांस पार पाडण्यात आल्या असतील त्या तारखा विहित केलेल्या नोंदवहीत नमूद केल्या पाहिजेत.

(२) जर [4][कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यात किंवा कारखान्याच्या किंवा वर्गाच्या किंवा कोणत्याही वर्णनाच्या कारखान्यांच्या कोणत्याही भागात] चालविण्यात येणाऱ्या कामाच्या स्वरूपामुळे कार्यचालकाला पोटकलम (१) च्या सर्व किंवा त्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे पालन करणे शक्य नसेल तर, राज्य शासन आदेशाद्वारे असा कारखाना किंवा अशा कोणत्याही वर्गाचे किंवा वर्णनाचे कारखाने यांस [5][किंवा त्यांच्या भागास] त्या पोटकलमाच्या उपबंधांपकी कोणत्याही उपबंधांपासून सूट देऊ शकेल आणि असा कारखाना स्वच्छ स्थितीत ठेवण्यासाठी इतर पर्यायी पद्धती विनिर्दिष्ट करू शकेल.

१२. [6][ (१) प्रत्येक कारखान्यात, तेथे चालू असलेल्या निर्मितिप्रक्रियांमुळे उत्पन्न होणारा गाळसाळ व सांडपाणी यांना निरुपद्रवी करण्याच्या दृष्टीने त्यांच्यावर प्रक्रिया करण्यासाठी व त्यांची विल्हेवाट लावण्या-साठी परिणामकारक व्यवस्था केली पाहिजे.] गाळसाळ व सांडपाणी यांची विल्हेवाट लावणे.

(२) राज्य शासनाला पोटकलम (१) अन्वये करावयाची व्यवस्था विहित करणारे किंवा पोट कलम (१) ला अनुसरून केलेली व्यवस्था विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्यांकडून संमत करून घ्यावी लागेल असे आवश्यक करणारे नियम करता येतील.

१३. (१) प्रत्येक कारखान्यातील कामाच्या प्रत्येक कक्षास,— वायुवीजन व तपमान.

(क) ताजी हवा खेळती ठेवून पुरेशा प्रमाणात वायुवीजन, आणि

(ख) तेथील कामगारांना आरामप्रद असे योग्य वातावरण मिळेल व आरोग्यास अपाय होणार नाही असे तपमान,

उपलब्ध करून देण्यासाठी व राखण्यासाठी परिणामकारक व योग्य व्यवस्था केली पाहिजे आणि विशेषेकरून,—

(एक) भिंती व छपरे ही, जेणेकरून असे तपमान वाढणार तर नाहीच, परंतु शक्य तेथवर कमी राहील अशाच साहित्यापासून व अशाच तऱ्हेने बनविलेली असली पाहिजेत ;

---

१. **१९७६ चा अधिनियम** ९४, कलम ८ (१) (क) द्वारे, "पक्का रंग दिलेला" या मजकुरा-ऐवजी हा **मजकूर दाखल** करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८(१) (ख) द्वारे, हा उपखंड समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८(१) (ग) द्वारे, हा खंड समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम (८)२ (क) द्वारे, "कारखान्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ८(२) (ख) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ९ (क) द्वारे, आधीच्या पोटकलम (१) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

(दोन) कारखान्यात चालविलेल्या कामाच्या स्वरूपामुळे अत्याधिक तपमान निर्माण होत असेल किंवा होण्याचा संभव असेल तेथे, त्यापासून कामगारांचे संरक्षण करण्यासाठी, ज्या प्रक्रियेपासून असे तपमान निर्माण होते ती प्रक्रिया कामाच्या कक्षापासून अलग करणे, तापणारे भाग विसंवाहित करणे किंवा इतर परिणामकारक उपाय योजणे, यांसारख्या व्यवहार्य असतील अशा पुरेशा उपाययोजना केल्या पाहिजेत.

(२) राज्य शासन कोणत्याही कारखान्यासाठी किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांसाठी किंवा त्यांच्या भागांसाठी पुरेशी खेळती हवा व वाजवी तपमान यांचे मानक विहित करू शकेल आणि विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ठिकाणी व अशा स्थितीत [1][ उचित मापक साधने पुरविण्यात यावीत आणि विहित करण्यात येईल त्याप्रमाणे त्यांचा अभिलेख ठेवण्यात यावा] असे निदेश देऊ शकेल.

[2][ (३) जर मुख्य निरीक्षकाला असे आढळून येईल की, कोणत्याही कारखान्यातील अतिउच्च तपमान, योग्य ती उपाययोजना करून कमी करता येईल, तर तो पोटकलम (२) अन्वये केलेल्या नियमांना बाध न येता, कार्यचालकावर, त्याच्या मते जिचा अंगिकार करण्यात यावा ती उपाययोजना विनिर्दिष्ट करणारा लेखी आदेश बजावू शकेल आणि विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी ती उपाययोजना अंमलात आणण्यास फर्मावू शकेल.]

**रजःकण व धूम.** १४. (१) ज्या कारखान्यात तेथे चालविण्यात येणाऱ्या निर्मितिप्रक्रियेमुळे तेथे काम करणाऱ्या कामगारांना अपायकारक किंवा त्रासदायक होण्याचा संभव असेल अशा स्वरूपात व अशा प्रमाणात कोणत्याही प्रकारचे रजःकण किंवा धूम किंवा इतर अशुद्ध पदार्थ बाहेर पडत असतील, किंवा मोठ्या प्रमाणात कोणत्याही प्रकारचे रजःकण साचत असतील अशा प्रत्येक कारखान्यातील कोणत्याही कामाच्या कक्षात ते रजःकण, धूम किंवा अशुद्ध पदार्थ श्वासाबरोबर आत जाऊ नयेत व साचू नयेत म्हणून परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे आणि या कारणासाठी कोणतेही बहिःसर्जक उपसाधन आवश्यक असेल तर, रजःकण, धूम किंवा इतर अशुद्ध पदार्थ उत्पन्न होणाऱ्या जागेच्या शक्य तितक्या जवळ त्या बहिःसर्जक उपसाधनाची योजना केली पाहिजे आणि ती जागा शक्य तितकी बंदिस्त असली पाहिजे.

(२) कोणत्याही कारखान्यात कोणतेही स्थिर अंतर्ज्वलन इंजिन, त्यापासून निर्माण होणारी अशुद्ध हवा खुल्या वातावरणात सोडण्याची व्यवस्था केलेली असल्याखेरीज चालविता कामा नये आणि कोणत्याही कक्षात तेथे काम करीत असलेल्या कामगारांना अपायकारक होण्याचा संभव असेल असा, अंतर्ज्वलन इंजिनापासून उत्पन्न होणारा धूम साचू न देण्यासाठी परिणामकारक उपाययोजना केलेली असल्याखेरीज त्या कक्षात दुसरे कोणतेही अंतर्ज्वलन इंजिन चालविता कामा नये.

**कृत्रिम आर्द्रीकरण.** १५. (१) ज्या कारखान्यात हवेची आर्द्रता कृत्रिम रीतीने वाढविण्यात येत असेल अशा सर्व कारखान्यांच्या संबंधात, पुढील गोष्टींसंबंधी राज्य शासनाला नियम करता येतील :—

(क) आर्द्रीकरणाची मानके विहित करणे ;

(ख) हवेची आर्द्रता कृत्रिम रीतीने वाढविण्यासाठी उपयोगात आणावयाच्या पद्धतींचे विनियमन करणे ;

(ग) हवेची आर्द्रता निश्चित करण्यासाठी विहित केलेल्या चाचण्या बिनचूकरीत्या पार पाडून त्याची नोंद ठेवण्याविषयी निदेश देणे ;

(घ) कामाच्या कक्षांमध्ये पुरेशी हवा खेळती राहण्यासाठी व हवा थंड ठेवण्यासाठी ज्या पद्धतींचा अवलंब करावयाचा त्या पद्धती विहित करणे.

(२) ज्या कोणत्याही कारखान्यात हवेची आर्द्रता कृत्रिम रीतीने वाढविण्यात येत असेल त्या कारखान्यात, त्या प्रयोजनासाठी वापरावयाचे पाणी सार्वजनिक साठ्यातून किंवा पिण्याच्या पाण्याच्या इतर स्रोतांमधून घेतले पाहिजे किंवा ते अशा रीतीने वापरण्यापूर्वी परिणामकारकरीत्या शुद्ध केले पाहिजे.

(३) आर्द्रता वाढविण्यासाठी कारखान्यात वापरण्यात येणारे जे पाणी पोटकलम (२) अन्वये परिणामकारकरीत्या शुद्ध करणे आवश्यक आहे ते तशा प्रकारे शुद्ध करण्यात येत नाही असे निरीक्षकास दिसून आले तर तो, त्या कारखान्याच्या व्यवस्थापकावर लेखी आदेश बजावून, त्याद्वारे, आपल्या मते ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या उपाययोजना त्यात विनिर्दिष्ट करू शकेल व विनिर्दिष्ट केलेल्या तारखपूर्वी त्या अंमलात आणण्यास फर्मावू शकेल.

**अतिगर्दी.** १६. (१) कोणत्याही कारखान्यातील कोणत्याही कक्षात, त्यात कामावर असलेल्या कामगारांच्या आरोग्यास अपायकारक होईल इतकी गर्दी होऊ देता कामा नये.

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ६ द्वारे, मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे, मूळ पोटकलमाऐवजी समाविष्ट करण्यात आले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) च्या व्यापकतेस बाध न येता, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या कारखान्याच्या कामाच्या प्रत्येक कक्षात, कामावर लावलेल्या प्रत्येक कामगारासाठी कमीत कमी [१][९.९ घनमीटर] आणि या अधिनियमाच्या प्रारंभानंतर बांधलेल्या, कारखान्यातील कामाच्या प्रत्येक कक्षात कामावर लावलेल्या प्रत्येक कामगारासाठी कमीत कमी [१][१४.२ घनमीटर] जागा असली पाहिजे, आणि या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी कक्षातील जमिनीच्या पातळीपासून [१][४.२ मीटर-हून] अधिक उंचीवर असलेली कोणतीही जागा हिशबात घेतली जाणार नाही.

(३) जर मुख्य निरीक्षकाने लेखी आदेशाद्वारे तसे फर्माविले तर, कारखान्यातील कामाच्या प्रत्येक कक्षात, या कलमाच्या उपबंधांनुसार त्या कक्षात जास्तीत जास्त किती कामगार कामावर लावता येतील ती संख्या विनिर्दिष्ट करणारी नोटीस लावली पाहिजे.

(४) कोणत्याही कामाच्या कक्षाच्या संबंधात, या कलमाच्या उपबंधांचे पालन करणे त्या कक्षात कामावर लावलेल्या कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने अनावश्यक आहे अशी मुख्य निरीक्षकाची खात्री झाली तर, तो लेखी आदेशाद्वारे, ज्या कोणत्याही शर्ती घालणे त्यास योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीनतेने, अशा कोणत्याही कक्षाच्या बाबतीत या कलमाच्या उपबंधापासून सूट देऊ शकेल.

१७. (१) कारखान्यातील ज्या भागात कामगार काम करीत असतील किंवा ये-जा करीत असतील, अशा प्रत्येक भागात पुरेसा व योग्य प्रकारचा नैसर्गिक किंवा कृत्रिम प्रकाश किंवा दोन्ही प्रकारचा प्रकाश मिळण्याची व्यवस्था केली पाहिजे व ती नीट राखली पाहिजे. **प्रकाशयोजना.**

(२) प्रत्येक कारखान्यातील कामाच्या कक्षात प्रकाश येण्यासाठी योजलेल्या काचेच्या सर्व खिडक्या व साणी (स्कायलाइट्स) यांचे आतील व बाहेरील असे दोन्हीही पृष्ठभाग स्वच्छ ठेवले पाहिजेत आणि कलम १३, पोटकलम (३) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधांचे पालन करणे शक्य असेल तेथवर, ते अडथळारहित ठेवले पाहिजेत.

(३) प्रत्येक कारखान्यात,—

(क) प्रकाशाच्या उगमस्थानापासून प्रत्यक्षपणे अथवा गुळगुळीत किंवा पॉलिश केलेल्या भागावरील परावर्तनामुळे डोळ्यांवर प्रकाशाची तिरीप येऊ नये म्हणून ;

(ख) ज्यायोगे कोणत्याही कामगाराच्या डोळ्यांवर ताण पडेल किंवा कोणत्याही कामगाराला अपघात होण्याचा धोका निर्माण होईल इतक्या प्रमाणात सावल्या पडू नयेत म्हणून ;

—शक्य असेल तेथवर परिणामकारक व्यवस्था केली पाहिजे.

(४) राज्य शासनाला कारखान्यांसाठी किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांसाठी किंवा कोणत्याही निर्मितिप्रक्रियेसाठी पुरेशा व योग्य अशा प्रकाशयोजनेचे मानक विहित करता येईल.

१८. (१) प्रत्येक कारखान्यात, तेथे कामावर लावलेल्या सर्व कामगारांना योग्य व सोईस्कर होईल त्या त्या ठिकाणी आरोग्यप्रद अशा पिण्याच्या पाण्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून तो सुस्थितीत ठेवण्यासाठी परिणामकारक व्यवस्था केली पाहिजे. **पिण्याचे पाणी.**

(२) अशा सर्व ठिकाणी "पिण्याचे पाणी" असे सुवाच्च अक्षरात व कारखान्यात कामावर लावलेल्या बहुसंख्य कामगारांना समजणाऱ्या भाषेत लिहिले पाहिजे आणि असे कोणतेही ठिकाण हे [२][कोणतीही धुण्याची जागा, मुतारी, शौचकूप, थुंकीपात्र, मैला किंवा कचरा वाहून नेणारे उघडे गटार किंवा दूषित होण्याचा अन्य कोणताही मार्ग यापासून सहा मीटर] अंतराच्या आत असता कामा नये—मात्र, त्याहून कमी अंतर ठेवण्यास मुख्य निरीक्षकाने लेखी मान्यता दिलेली असेल तर गोष्ट वेगळी.

(३) ज्या कारखान्यात सामान्यपणे अडीचशेपेक्षा अधिक कामगार कामावर लावण्यात येतात अशा प्रत्येक कारखान्यात, उन्हाळ्यात पिण्याचे पाणी परिणामकारक साधनांनी थंड करण्याची व त्याचे वाटप करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(४) राज्य शासनाला सर्व कारखान्यांच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांच्या संबंधात पोटकलम (१), (२) व (३) यांच्या उपबंधांचे पालन करवून घेण्याबाबत आणि कारखान्यातील पिण्याच्या पाण्याच्या साठ्याची व वाटपाची तपासणी विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडून करवून घेण्याबाबत नियम करता येतील.

१९. (१) प्रत्येक कारखान्यात,—

(क) विहित पद्धतीचे शौचकूप व मुताऱ्या यांच्यासाठी पुरेशा जागेची व्यवस्था केली पाहिजे आणि ते अशा सोईस्कर ठिकाणी असावेत की कामगार कारखान्यात असतील तेव्हा कोणत्याही वेळी त्यांना तेथे जाता यावे ; **शौचकूप व मुताऱ्या.**

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ७ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(ख्) पुरुष कामगारांसाठी व स्त्री कामगारांसाठी निरनिराळ्या बंदिस्त कक्षांची सोय केली पाहिजे ;

(ग्) अशा ठिकाणी पुरेसा प्रकाश व खेळती हवा असली पाहिजे आणि कोणत्याही शौच-कूपाकडे किंवा मुतारीकडे जाण्याचा मार्ग, मुख्य निरीक्षकाने खास लेखी सूट दिली नसल्यास, कोणत्याही कामाच्या कक्षाला जोडून असता कामा नये; मात्र, ही दोन्हीही गोष्टींमध्ये मोकळी जागा ठेवून किंवा हवेशीर मार्गाद्वारे त्या जोडल्या असतील तर ती गोष्ट वेगळी ;

(घ्) अशी सर्व ठिकाणे ही नेहमी स्वच्छ व आरोग्यकारी स्थितीत ठेवली पाहिजेत ;

(ङ) सफाईगारांना कामावर ठेवले पाहिजे— शौचकूप, मुताऱ्या व धुण्याच्या जागा स्वच्छ ठेवणे हे त्यांचे प्रमुख काम असेल.

(२) ज्या कारखान्यात सामान्यपणे अडीचशेपेक्षा अधिक कामगार कामावर लावण्यात येत असतील अशा प्रत्येक कारखान्यात,—

(क्) सर्व शौचकूप व मुताऱ्या विहित स्वच्छता पद्धतीच्या असल्या पाहिजेत;

(ख्) शौचकूपांच्या व मुताऱ्यांच्या आणि स्वच्छता कक्षांच्या जमिनी आणि जमिनीपासून [१][९० सें. मी.] उंचीपर्यंत भिंतीच्या आतील बाजू यांचा पृष्ठभाग गुळगुळीत, चकचकीत व अभेद्य होण्यासाठी त्यामध्ये झिलईदार फरशा बसवल्या पाहिजेत किंवा त्यांची अन्य प्रकारे ओपवणी केली असली पाहिजे;

(ग्) पोट-कलम (१) च्या खंड (घ्) व (ङ्) च्या उपबंधास बाध न येता, अशारीतीने तयार केलेल्या किंवा ओपवलेल्या जमिनी, भिंतीचे भाग व स्वच्छताकक्ष आणि शौचकूपांतील व मुताऱ्यांतील शौचपात्रे योग्य त्या मलनाशक किंवा संसर्गनाशक द्रव्याने किंवा या दोन्ही पदार्थांनी दर सात दिवसांच्या मुदतीत कमीत कमी एकदा धुतली पाहिजेत व स्वच्छ केली पाहिजेत.

(३) राज्य शासनाला, कोणत्याही कारखान्यात तेथे सामान्यपणे जितके पुरुष व स्त्री कामगार कामावर लावण्यात येतात त्यांच्या संख्येच्या प्रमाणात किती शौचकूपांची व मुताऱ्यांची व्यवस्था करावी ते विहित करता येईल आणि तेथे कामावर लावलेल्या कामगारांच्या आरोग्याच्यादृष्टीने कारखान्यांतील स्वच्छतेबाबत यासंबंधी कामगारांवर बंधनकारक असलेली कर्तव्ये धरून, त्यास आवश्यक वाटतील अशा आणखी इतर बाबींची तरतूद करता येईल.

थुंकपात्रे. २०. (१) प्रत्येक कारखान्यात सोईस्कर ठिकाणी पुरेशी थुंकपात्रे ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि ती स्वच्छ व आरोग्यकारी स्थितीत ठेवली पाहिजेत.

(२) राज्य शासनाला, कोणत्याही कारखान्यात ठेवावयाच्या थुंकपात्रांचे प्रकार व संख्या व त्यांची जागा विहित करण्याबाबत नियम करता येतील आणि ती पात्रे स्वच्छ व आरोग्यकारी स्थितीत ठेवण्या-संबंधीच्या आणखी इतर बाबींची तरतूद करता येईल.

(३) कोणत्याही व्यक्तीने, थुंकण्यासाठी पुरविलेल्या थुंकपात्रांव्यतिरिक्त कारखान्याच्या परिवास्तूतील इतर ठिकाणी थुंकता कामा नये आणि हा उपबंध व त्याच्या उल्लंघनाबाबतची शिक्षा निर्दिष्ट करणारी नोटीस कारखान्याच्या जागेत ठळकपणे दिसेल अशा योग्य ठिकाणी लावली पाहिजे.

(४) पोटकलम (३) चे उल्लंघन करून जो कोणी थुंकेल तो, पाच रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

## प्रकरण चार

## सुरक्षितता

यंत्रसामग्रीस कुंपण घालणे. २१. (१) प्रत्येक कारखान्यातील पुढील यंत्रसामग्रीच्या पुढील निदर्शित भागांना मजबूत बांधणी-च्या संरक्षक साधनांचे पक्के कुंपण घातले पाहिजे आणि अशा प्रकारे कुंपण घातलेले यंत्रसामग्रीचे भाग चालू असताना किंवा वापरण्यात येत असताना [२][या साधनांची सतत देखभाल करण्यात आली पाहिजे आणि ती जागच्या जागी ठेवली पाहिजेत.] ते भाग असे :—

(एक) मूल गतिचालकाचा (प्राइम मूव्हर) प्रत्येक फिरता भाग व मूल गतिचालकाला जोडलेले प्रत्येक जडचक्र (फ्लाय व्हील), मग मूल गतिचालक किंवा जडचक्र इंजिनगृहात असो वा नसो ;

(दोन) प्रत्येक पाणचक्की (वॉटर व्हील) व पाण टरबाईन (वॉटर टरबाईन) यांचा माथा पन्हळ (हेड रेस) व पायथा पन्हळ (टेल रेस);

(तीन) खरात यंत्राच्या (लेथ) अग्रसंधाबाहेर (हेड स्टॉक) डोकावणारा स्टॉकबारचा कोणताही भाग ; आणि

(चार) पुढील यंत्रसामग्रीच्या निर्देशित भागांना पक्के कुंपण घातले असताना कारखान्यात कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीने ते भाग जितके बिनधोक बनतील तितकेच बिनधोक असणाऱ्या स्थितीत असे भाग असतील किंवा त्यांची बांधणी तशाच प्रकारे करण्यात आली असेल तर ती गोष्ट वगळून,—

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ९ द्वारे, मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम ९४, कलम १०(क्) द्वारे, "ती जागच्या जागी राहिली पाहिजेत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(क्) विद्युतजनित्र (इलेक्ट्रिक जनरेटर), गतियंत्र (मोटार) किंवा चक्रावर्ती परिवर्तक (रोटरी कन्व्हर्टर) यांचा प्रत्येक भाग ;

(ख्) पारेषण यंत्रसामग्रीचा प्रत्येक भाग; आणि

(ग्) इतर कोणत्याही यंत्रसामग्रीचा प्रत्येक धोकादायक भाग :

[1][परंतु, यंत्रसामग्रीचा कोणताही भाग हा उपरोक्ताप्रमाणे बिनधोक राहील अशा स्थितीत किंवा अशा बांधणीचा आहे किंवा कसे हे ठरविण्याच्या प्रयोजनार्थ,—

(एक) जेव्हा पूर्वोक्त यंत्रसामग्रीचा कोणताही भाग चालू असताना त्याची तपासणी करणे आवश्यक असेल किंवा अशा तपासणीचा परिणाम म्हणून यंत्रसामग्री चालू असताना यंत्रांना वंगण देणे किंवा ती बरोबर बसवणे—ही तपासणी किंवा बरोबर बसवावयाचे काम म्हणजे यंत्रसामग्रीचा तो विशिष्ट भाग चालू असताना करणे आवश्यक असते अशी तपासणी किंवा काम असेल— आवश्यक असेल, किंवा

(दोन) विहित करण्यात येईल अशा (यंत्रसामग्रीचा तो भाग बंद पडण्यामुळे जी प्रक्रिया चालू ठेवण्याच्या कामात मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप होईल किंवा होण्याची शक्यता असेल अशी अखंड चालू राहणारी प्रक्रिया असलेल्या) प्रक्रियेमध्ये वापरण्यात येणाऱ्या पारेषण यंत्रसामग्रीच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत यंत्रसामग्रीचा असा भाग चालू असताना त्याची तपासणी करणे किंवा अशा तपासणीचा परिणाम म्हणून यंत्रसामग्री चालू असताना पट्टे चढविणे किंवा सरकविणे किंवा यंत्रांना वंगण देणे किंवा ती बरोबर बसविणे आवश्यक असेल आणि तशी तपासणी किंवा काम कलम २२, पोटकलम (१) च्या उपबंधानुसार करण्यात किंवा पार पाडण्यात येत असेल, असा कोणताही प्रसंग हिशेबात घेतला जाणार नाही.]

(२) राज्य शासन, नियमांद्वारे, कोणतीही विशिष्ट यंत्रसामग्री किंवा तिचा भाग याबाबत त्यास आवश्यक वाटेल अशी अधिक कोणती खबरदारी घ्यावी ते विहित करू शकेल किंवा कामगारांस सुरक्षितत्तेची हमी देण्याकरिता विहित करण्यात येईल अशा शर्तींच्या अधीनतेने कोणतीही विशिष्ट यंत्रसामग्री किंवा तिचा भाग यास या कलमाच्या उपबंधापासून सूट देऊ शकेल.

२२. (१) [2][कोणत्याही कारखान्यात कलम २१ मध्ये उल्लेखिलेल्या यंत्रसामग्रीचा कोणताही भाग, चालू असलेल्या अशी यंत्रसामग्री चालू असताना तपासणे आवश्यक होईल त्या प्रसंगी, किंवा अशा तपासणीचा परिणाम यंत्रांवर किंवा म्हणून अशी यंत्रसामग्री चालू असताना,— यंत्राजवळ काम करणे.

(क्) कलम २१, पोट-कलम (१) च्या परंतुकामधील खंड (एक) मध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणी, यंत्रांना वंगण देणे किंवा ती बरोबर बसवणे, किंवा

(ख्) पूर्वोक्त परंतुकाच्या खंड (दोन) मध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणी, कोणतेही कडीपट्टे चढविणे किंवा उतरविणे, त्यांस तेल देणे किंवा ते बरोबर बसवणे,

—आवश्यक होईल त्याप्रसंगी, ज्याचे नांव याबाबत विहित केलेल्या नोंदवहीत नोंदलेले असेल आणि ज्याला त्याच्या नेमणुकीचे प्रमाणपत्र देण्यात आलेले असेल अशा खास प्रशिक्षण मिळालेल्या प्रौढ पुरुष कामगाराने, अंगाला व्यवस्थित बसणारे कपडे (हे कपडे त्याला कार्यचालकाकडून पुरविण्यात येतील) घालून, अशी तपासणी केली पाहिजे किंवा असे काम पार पाडले पाहिजे आणि तो अशा प्रकारच्या कामात असताना,—

(क्) (एक) कडीपटट्याची रुंदी पंधरा सेंटीमीटरपेक्षा अधिक नाही;

(दोन) कप्पी ही सामान्यपणे गती देण्यासाठी असून नुसते जडचक्र किंवा तोलचक्र नाही (तसे असल्यास त्याबाबतीत कडीपट्टा अनुज्ञेय असणार नाही);

(तीन) पट्टयाचा जोड वादीने बांधलेला असेल किंवा तो कडीपट्टयाशी समपातळीत आणलेला आहे ;

(चार) जोड आणि कप्पीची कडा यांसह कडीपट्टा चांगल्या दुरुस्त स्थितीत आहे;

(पाच) कप्पी आणि कोणतेही पक्के बसवलेले संयंत्र किंवा संरचना यांच्यामध्ये पुरेशी मोकळी जागा आहे;

(सहा) चालकासाठी पायाला पक्का आधार मिळण्याची व आवश्यक तेथे हाताला पक्का आधार मिळण्याची सोय केलेली आहे ; आणि

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम १० (ख्) द्वारे, मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे, पोटकलम (१) मधील प्रारंभीचा मजकूर आणि खंड (क्) याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(सात) पूर्वोक्त अशी कोणतीही तपासणी करण्यासाठी किंवा काम पार पाडण्यासाठी वापरात असलेली कोणतीही शिडी पक्की बसलेली आहे किंवा बांधून ठेवलेली आहे किंवा दुसऱ्या व्यक्तीने घट्ट धरून ठेवलेली आहे,

—असे असल्याशिवाय अशा कामगाराने चालत्या कप्पीवरील कडीपट्टा हाताळता कामा नये ; ]

(ख) यंत्रसामग्रीला कुंपण घालण्यासंबंधी या अधिनियमात असलेल्या इतर कोणत्याही उपबंधास बाध येऊ न देता, कोणतीही फिरती लाट (शाफ्ट), चाती, चाक किंवा दंतचक्र यावर बसवलेला प्रत्येक पेचखिळा (सेट स्क्रू), बोल्ट व कळ आणि अशा कामगारांचा इतर प्रकारे ज्याच्याशी संपर्क येण्याचा संभव असेल अशी सर्व कंटकचक्रे (स्पर), सर्पिलयंत्रे (वर्म) आणि इतर गतिमान दंतुर किंवा घर्षण गिअरसाधने यांस, असा संपर्क येऊ नये म्हणून पक्के कुंपण घालण्यात आले पाहिजे.

[1][ (२) कोणत्याही स्त्रीस किंवा अल्पवयीन व्यक्तीस, मूल गतिचालक किंवा कोणतीही पारेषण यंत्रसामग्री चालू असताना, अशा मूल गतिचालकाचा किंवा पारेषण यंत्रसामग्रीचा कोणताही भाग साफ करण्याचे, त्यात तेल घालण्याचे किंवा तो जागच्या जागी आणून बसविण्याचे काम, अथवा, कोणत्याही यंत्राचा कोणताही भाग साफ करताना, त्यात तेल घालताना किंवा तो जागच्या जागी आणून बसविताना त्या स्त्रीस किंवा अल्पवयीन व्यक्तीस त्या यंत्राच्या किंवा कोणत्याही संलग्न यंत्राच्या कोणत्याही फिरत्या भागापासून इजा होण्याचा धोका असेल तर, तिला तो भाग साफ करण्याचे, त्यात तेल घालण्याचे किंवा तो जागच्या जागी आणून बसविण्याचे काम करण्याची परवानगी देता कामा नये. ]

(३) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विनिर्दिष्ट कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यात यंत्राचे विशिष्ट भाग, ते चालू असताना, कोणत्याही व्यक्तीकडून साफ केले जाण्यास, त्यांना तेल दिले जाण्यास किंवा जागच्या जागी आणून बसवले जाण्यास मनाई करू शकेल.

**धोक्याच्या यंत्रांवर अल्पवयीन व्यक्तींना कामावर लावणे.**

२३. (१) कोणत्याही अल्पवयीन [2][व्यक्तीस] ज्या यंत्रास हे कलम लागू आहे अशा यंत्राच्या संबंधात उत्पन्न होणारा धोका आणि घ्यावयाची खबरदारी याविषयी तिला संपूर्ण शिक्षण मिळाल्याशिवाय आणि,—

(क) त्या यंत्रावर काम करण्याचे पुरेसे प्रशिक्षण मिळाल्याशिवाय, किंवा

(ख) त्या यंत्राचे संपूर्ण ज्ञान व अनुभव असलेल्या व्यक्तीची तिच्यावर पुरेशी देखरेख असल्याशिवाय,

—अशा कोणत्याही यंत्रावर [2][काम करण्यास भाग पाडण्यात येणार नाही किंवा परवानगी दिली जाणार नाही.]

(२) राज्य शासनाच्या मते पूर्वोक्त आवश्यकतांचे पालन केल्याशिवाय ज्यांवर अल्पवयीन व्यक्तींनी काम करता कामा नये अशी धोक्याच्या स्वरुपाची यंत्रे म्हणून राज्य शासन विहित करील अशा यंत्रांना हे पोटकलम (१) लागू असेल.

**वीजप्रवाह बंद करण्यासाठी स्ट्राईकिंग गिअर व साधने.**

२४. (१) प्रत्येक कारखान्यात,—

(क) योग्य स्ट्राईकिंग गिअर किंवा इतर कार्यक्षम यांत्रिक साधने यांची व्यवस्था केली पाहिजे, ती नीट राखली पाहिजेत आणि पारेषण यंत्रसामुग्रीचा भाग असलेल्या, पक्क्या बसविलेल्या व सुटया कप्प्यांकडे व कप्प्यांपासून दूर गतिदायक पट्टे हलविण्यासाठी त्यांचा उपयोग केला पाहिजे आणि पक्क्या बसविलेल्या कप्पीवर पट्टा पाठीमागे सरकण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने अशा स्ट्राईकिंग गिअरची किंवा यांत्रिक साधनांची रचना केली पाहिजे, ती अशा ठिकाणी बसविली पाहिजेत व ती अशा रीतीने नीट राखली पाहिजेत ;

(ख) गतिदायक पट्टे जेव्हा वापरात नसतील तेव्हा, चालू असलेल्या दांड्यांवर ते स्थिरावता किंवा फिरविता कामा नयेत.

(२) प्रत्येक कारखान्यात कामाच्या प्रत्येक कक्षात, निकडीच्या प्रसंगी, चालू असलेल्या यंत्रसामग्रीतील वीजप्रवाह बंद करण्यासाठी योग्य साधनांची व्यवस्था केली पाहिजे व ती नीट राखली पाहिजेत :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी चालू असलेल्या कारखान्यांच्या बाबतीत या पोटकलमाचे उपबंध हे कामाच्या ज्या कक्षांत वीज ही शक्ती (पॉवर) म्हणून वापरण्यात येत असेल केवळ अशाच कक्षांना लागू होतील.

[3][ (३) जें साधन अनवधानाने "बंद" स्थितीतून "चालू" स्थितीमध्ये बदलले जाऊ शकते अशा साधनाची कारखान्यामध्ये वीजप्रवाह बंद करण्यासाठी व्यवस्था करण्यात आली असेल तेथे, ते साधन जिला जोडलेले असेल ती पारेषण यंत्रसामग्री किंवा इतर यंत्रे चुकून चालू केली जाऊ नयेत यासाठी ते साधन सुरक्षित स्थितीत पाशित (लॉक) करून ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली पाहिजे. ]

---

१. १९५४ चा अधिनियम २५, कलम ६ द्वारे, पोटकलम (२) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

२. १९८७ चा अधिनियम २०, कलम १० द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल केले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ९४, कलम १२ द्वारे, पोटकलम (२) नंतर हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

२५. कोणत्याही कारखान्यातील स्वयंचलित यंत्राचा कोणताही फिरता भाग व त्यावर वाहून नेण्यात येणारे कोणतेही सामान ज्या जागेवरून जात असेल त्या जागी जर कोणतीही व्यक्ती, ती कामावर असताना किंवा अन्यथा ये-जा करण्याचा संभव असेल तर, अशा यंत्राच्या त्या भागाची व त्या सामानाची बाहेरून आत किंवा आतून बाहेर फिरण्याची कक्षा यंत्राचे अंग नसलेल्या कोणत्याही कायम स्वरूपाच्या बांधकामापासून [1][४५ सें. मी.] अंतराच्या परिसरात असता कामा नये : **स्वयंचलित यंत्रे.**

परंतु, मुख्य निरीक्षक, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी उभारलेले जे यंत्र या कलमाच्या आवश्यकतांनुसार नसेल अशा एखाद्या यंत्राचा वापर, सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यास ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तींवर करू देण्यास परवानगी देऊ शकेल.

२६. (१) शक्तीच्या सहाय्याने चालणाऱ्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणत्याही कारखान्यात उभारलेल्या सर्व यंत्रातील— **नवीन यंत्रसामग्रीला आवरण घालणे.**

(क) कोणतीही फिरती लाट (शाफ्ट), चाती (स्पिंडल), चाक (व्हील) किंवा दंतचक्र (पिनियन) यावर बसवलेला प्रत्येक पेचखिळा (सेट स्क्रू), बोल्ट किंवा कळ (की) धोकादायक ठरणार नाही अशा रीतीने आत बसविली पाहिजे, त्यावर आवरण घातले पाहिजे किंवा अन्यथा परिणामकारक रीतीने सुरक्षित ठेवली पाहिजे ;

(ख) यंत्र चालू असताना जी वारंवार जागच्या जागी आणून बसविणे आवश्यक नसते अशी सर्व कंटकचक्रे, (स्पर), सर्पिलयंत्रे (वर्म) व इतर प्रकारचे दंतूर किंवा घर्षण गिअरसाधने (गियरिंग) यांना, ती पूर्णपणे आवरण घातल्याप्रमाणे सुरक्षित राहतील अशा जागी नसतील तर, पूर्णपणे आवरण घातले पाहिजे.

(२) जो कोणी व्यक्ती, [2][पोटकलम (१) च्या उपबंधानुसार किंवा पोटकलम (३) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमानुसार] नसणारी, शक्तीच्या सहाय्याने चालणारी कोणतीही यंत्रसामग्री कारखान्यात उपयोग करण्यासाठी विकील किंवा भाड्याने देईल किंवा विक्रेत्याचा किंवा भाड्याने देणाऱ्याचा अभिकर्ता म्हणून विकावयास किंवा भाड्याने द्यावयास लावील किंवा विकण्यासाठी किंवा भाड्याने देण्यासाठी पैदा करील ती व्यक्ती, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

[3][(३) राज्य शासनास, कोणत्याही विशिष्ट यंत्राच्या किंवा विशिष्ट वर्गाच्या किंवा वर्णनाच्या यंत्रांच्या इतर कोणत्याही धोकादायक भागासंबंधात, आणखी कोणती खबरदारी घ्यावी ते विनिर्दिष्ट करणारे नियम करता येतील.]

२७. कोणत्याही स्त्रीस किंवा बालकास कापूस दाबणी कारखान्याच्या ज्या कोणत्याही भागात कापूस खोलणी यंत्र चालू असेल त्या भागात कामावर लावता येणार नाही : **कापूस खोलणी यंत्राजवळ स्त्रियांस व बालकांस कामावर लावण्यास मनाई.**

परंतु, कापूस खोलणी यंत्राचे भरणद्वार (फीड एन्ड), ज्या खोलीत असेल ती खोली व निकासद्वार (डिलीव्हरी एंड) यांच्यामध्ये, छपरापर्यंत, किंवा एखाद्या विवक्षित बाबतीत निरीक्षक लेखी विनिर्दिष्ट करील अशा उंचीपर्यंत विभाजक भिंत घातलेली असेल तर, विभाजक भिंतीच्या ज्या बाजूस भरणद्वार असेल त्या बाजूकडे स्त्रिया व मुले ह्यांना कामावर लावता येईल.

२८. (१) प्रत्येक कारखान्यातील,— **पाळणे व लिफ्ट.**

(क) प्रत्येक पाळणा व लिफ्ट ही,—

(एक) चांगल्या यांत्रिक रचनेची, उत्कृष्ट सामग्रीपासून केलेली व पुरेशी बळकट असली पाहिजे ;

(दोन) त्यांची योग्य तऱ्हेने देखभाल करण्यात आली पाहिजे व प्रत्येक सहा महिन्यांच्या मुदतीत कमीत कमी एकदा सक्षम व्यक्तीने त्यांची संपूर्ण तपासणी केली पाहिजे आणि अशा प्रत्येक तपासणीचा विहित करण्यात येईल असा तपशील असणारी एक नोंदवही ठेवली पाहिजे ;

(ख) प्रत्येक पाळण्याचा व लिफ्टचा मार्ग हा, दरवाजे असलेले कुंपण घालून पुरेशा प्रमाणात संरक्षित केला पाहिजे आणि पाळण्याची किंवा लिफ्टची व अशा प्रत्येक कुंपणाची अशा तऱ्हेने रचना केली पाहिजे की, त्यायोगे पाळण्याचा किंवा लिफ्टचा कोणताही भाग व कोणतीही स्थिर संरचना किंवा फिरता भाग यामध्ये कोणतीही व्यक्ती किंवा वस्तू अडकता कामा नये ;

(ग) प्रत्येक पाळणा किंवा लिफ्ट ही सुरक्षित कार्यार्थ किती कमाल भार उचलू शकेल ते त्यावर स्पष्टपणे लिहिण्यात आले पाहिजे, आणि अशा भारापेक्षा अधिक भार त्यातून वाहून नेता कामा नये;

(घ) माणसांना नेण्यासाठी उपयोग करण्यात येणाऱ्या प्रत्येक पाळण्याच्या किंवा लिफ्टच्या पिंजऱ्याला (केज) ज्या बाजूकडे उतरण्याची सोय केलेली असेल त्या प्रत्येक बाजूला दरवाजा केलेला असला पाहिजे;

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ११ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९५४ चा अधिनियम २५, याच्या कलम ७ द्वारे, "पोटकलम (१) च्या उपबंधानुसार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे, पोटकलम (३) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

(ङ) पाळण्यामधून किंवा लिफ्टमधून बाहेर पडण्याच्या जागी पिंजरा असल्याशिवाय, दरवाजा उघडू शकणार नाही आणि दरवाजा बंद केल्याखेरीज पिंजरा हलू शकणार नाही अशी सोय करून घेण्यासाठी खंड (ख) किंवा खंड (घ) मध्ये उल्लेख केलेल्या प्रत्येक दरवाजाला आंतरपाशक किंवा इतर कार्यक्षम साधनाची योजना केलेली असली पाहिजे.

(२) माणसांना नेण्यासाठी उपयोग करण्यात येणाऱ्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कारखान्यात बसवलेल्या किंवा पुनर्बांधणी केलेल्या पाळण्यांना व लिफ्टसना पुढील आणखी आवश्यक बाबी लागू असतील :—

(क) जेथे पिंजरा दोरखंडावर किंवा साखळदंडावर चालत असेल तेथे, पिंजऱ्याशी व संतुलन भाराशी स्वतंत्रपणे जोडलेले कमीत कमी दोन दोरखंड किंवा दोन साखळदंड असले पाहिजेत, आणि जोडलेल्या भागांसह प्रत्येक दोरखंड किंवा साखळदंड पिंजऱ्याचे संपूर्ण वजन व त्यातील कमाल भार वाहून नेण्याइतका मजबूत असला पाहिजे ;

(ख) दोरखंड, साखळदंड किंवा त्याला जोडलेले भाग तुटल्यास त्या प्रसंगी, पिंजरा व त्यातील कमाल भार सांभाळण्यास समर्थ अशा कार्यक्षम साधनांची योजना केली पाहिजे व ती साधने सुस्थितीत ठेवली पाहिजेत ;

(ग) पिंजरा मर्यादेच्या बाहेर जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी कार्यक्षम स्वयंचलित साधनाची व्यवस्था केली पाहिजे व ते सुस्थितीत ठेवले पाहिजे.

(३) एखाद्या कारखान्यात या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी बसवलेला जो पाळणा किंवा लिफ्ट पोटकलम (१) च्या उपबंधांचे पूर्णपणे पालन होईल अशा प्रकारची नसेल, अशा कोणत्याही पाळण्याचा किंवा लिफ्टचा उपयोग चालू ठेवण्यास मुख्य निरीक्षक सुरक्षिततेच्या दृष्टीने ज्या शर्ती लादणे त्यास योग्य वाटेल अशा शर्तींवर परवानगी देऊ शकेल.

(४) कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या पाळण्याच्या किंवा लिफ्टच्या संबंधात पोटकलमे (१) व (२) यांखालील कोणतीही आवश्यक बाब अंमलात आणणे गैरवाजवी होईल असे जर राज्य शासनाचे मत असेल तर, ते आदेशाद्वारे अशी आवश्यक बाब अशा वर्गाच्या किंवा वर्णनाच्या पाळण्यांना किंवा लिफ्टसना लागू होणार नाही असा निदेश देऊ शकेल.

[1][**स्पष्टीकरण.**—या कलमांच्या प्रयोजनार्थ, ज्या उचलयंत्राची किंवा उपयंत्राची, दिशा किंवा हालचाल मार्गदर्शकाद्वारे किंवा मार्गदर्शकांद्वारे निर्बंधित केलेली आहे, अशा उचलयंत्राला किंवा उपयंत्राला चौथरा किंवा पिंजरा असल्याखेरीज त्याला पाळणा किंवा लिफ्ट समजण्यात येणार नाही.]

उचलयंत्रे, साखळदंड, दोरखंड व उचलतेगार.

[2][२९. (१) कोणत्याही कारखान्यात माणसे, माल किंवा सामान उचलण्याच्या किंवा उतरविण्याच्या प्रयोजनासाठी असलेले प्रत्येक उचलयंत्र (पाळणा व लिफ्ट खेरीज करून इतर प्रकारचे) आणि प्रत्येक साखळदंड, दोरखंड व उचलतेगार (लिफ्टिंग टॅगल) यांच्या बाबतीत पुढील उपबंधांचे पालन केले पाहिजे :—

(क) प्रत्येक उचलयंत्राचे वर्किंग गिअर धरून—मग ते स्थिर बसविलेले असो किंवा चल असो—सर्व भाग व प्रत्येक साखळदंड व दोरखंड किंवा उचलतेगार,—

(एक) चांगल्या बांधणीचे, उत्कृष्ट सामग्रीचे व पुरेसे बळकट व निर्दोष असले पाहिजेत ;

(दोन) योग्य तऱ्हेने राखलेले असले पाहिजेत ; आणि

(तीन) प्रत्येक बारा महिन्यांच्या मुदतीत कमीत कमी एकदा किंवा मुख्य निरीक्षक लेखी विनिर्दिष्ट करील अशा ठराविक कालांतरागणिक सक्षम व्यक्तीकडून पूर्णपणे तपासून घेण्यात आले पाहिजेत, आणि अशा प्रत्येक तपासणीचा विहित करण्यात येईल असा तपशील असणारी एक नोंदवही ठेवली पाहिजे;

(ख) कोणत्याही उचलयंत्रावर व कोणताही साखळदंड, दोरखंड किंवा उचलतेगार यावर चाचणीच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्यथा, सुरक्षित कार्यार्थ असलेल्या भारापेक्षा अधिक भार लादता कामा नये व असा सुरक्षित कार्यार्थ असलेला भार अशा यंत्रावर स्पष्टपणे लिहिलेला असला पाहिजे व त्यावर ओळखता येण्यासाठी निशाणी असली पाहिजे व ती विहित केलेल्या नोंदवहीत रीतसर नोंदलेला असला पाहिजे, आणि जेथे असे करणे व्यवहार्य नसेल तेथे, वापरात असलेल्या प्रत्येक प्रकारच्या व आकाराच्या उचलयंत्राचा किंवा साखळदंडाचा, दोरखंडाचा किंवा उचलतेगाराचा सुरक्षित कार्यार्थ असलेला भार दर्शविणारा तक्ता त्या परिवास्तूमधील प्रमुख ठिकाणी लावला पाहिजे ;

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम १२, द्वारे समाविष्ट करण्यात आले (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९५४ चा अधिनियम २५, कलम ८ द्वारे, मूळ कलम २९ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(ग) कोणतीही व्यक्ती, तिला यारीचा धक्का लागण्याचा संभव असेल अशा कोणत्याही जागेत फिरत्या यारीच्या चाकाच्या मार्गावर किंवा त्या मार्गाजवळ कामावर लावण्यात आली असेल तेव्हा किंवा काम करीत असेल तेव्हा, अशा जागेपासून [1][सहा मीटरच्या] आत यारी न पोहोचण्याची खबरदारी घेण्यासाठी परिणामकारक उपाययोजना केली पाहिजे.

(२) राज्य शासनास, कारखान्यांत वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही उचलयंत्राच्या किंवा कोणत्याही साखळदंडाच्या, दोरखंडाच्या किंवा उचलतेगाराच्या संबंधात,—

(क) या कलमात नमूद केलेल्या आवश्यक गोष्टींच्या जोडीला ज्यांचे पालन केले पाहिजे अशा आणखी आवश्यक गोष्टी विहित करणारे;

(ख) या कलमातील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही आवश्यक गोष्टींचे पालन करणे राज्य शासनाच्या मते अनावश्यक किंवा अव्यवहार्य असेल तेव्हा, अशा सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही गोष्टींचे पालन करण्याबाबत सूट देणारे;

नियम करता येतील.

(३) या कलमाच्या प्रयोजनांसाठी, उचलयंत्राची किंवा साखळदंडाची, दोरखंडाची वि उचलतेगाराची प्रत्यक्ष तपासणी ही तपासलेले भाग सुरक्षित असल्याबद्दल निश्चित खात्री करून घेण्यासाठी परिस्थितीनुसार शक्य असेल तेवढी काळजीपूर्वक आणि आवश्यक असल्यास इतर साधनांनी व गिअरचे भाग सुटे करून केलेली असेल तर, अशी तपासणी संपूर्णपणे करण्यात आली आहे असे समजण्यात येईल

**स्पष्टीकरण.**—या कलमात,—

(क) "उचलयंत्र" याचा अर्थ, यारी (क्रेन), खेकडा (क्रॅब), यंत्री रहाट (विंच), टीगल, कप्प्यांची चौकट (पुली ब्लॉक), तिपाईयारी चक्र (जिन व्हील), परिवाहित्र (ट्रॅन्सपोर्टर) किंवा धावपट्टी (रनवे), असा होतो;

[2][ (ख) "उचलतेगार" याचा अर्थ, उचलयंत्राच्या साह्याने व्यक्तींना किंवा मालाला वर किंवा खाली नेण्या-आणण्यासाठी वापरण्यात येणारे अचल किंवा चल असे, कोणत्याही साखळीचे ओळकंबे, दोराचे ओळकंबे, आकडा, यंत्री सापळा, भोवरकड्या, कप्लिंग, खोबण, चिमटे, धानी (ट्रे) किंवा त्यासारखे उपयंत्र, असा आहे.] ]

३०. (१) [3][प्रत्येक कारखान्यात] घासणाची प्रक्रिया चालवली जाते अशा प्रत्येक कक्षात प्रत्येक घासणी दगडाचा किंवा घर्षक चक्राचा सुरक्षित कार्यार्थ कमाल परिधीय वेग, चाक ज्यावर बसवले आहे त्या लाटेचा (शॅफ्ट) किंवा चातीचा वेग, आणि असा सुरक्षित कार्यार्थ परिधीय वेग साधण्यासाठी आवश्यक असा त्या लाटेवरील किंवा चातीवरील कप्पीचा व्यास दर्शविणारी नोटीस, वापरात असलेल्या प्रत्येक यंत्रावर कायमची चिकटवण्यात किंवा त्याच्या जवळपास लावून ठेवण्यात आली पाहिजे. वर्तुळाकार फिरणारी यंत्रसामग्री.

(२) पोटकलम (१) खालील नोटिशींमध्ये दर्शविलेल्या वेगापेक्षा अधिक वेग देता कामा नये.

(३) वर्तुळाकार फिरणारे प्रत्येक पात्र, पिंजरा, टोपली, जडचक्र (फ्लाय व्हील), कप्पी, चकती किंवा शक्तीच्या सहाय्याने चालणारे तत्सम उपयंत्र यांचा सुरक्षित कार्यार्थ परिधीय वेग वाढविला जाणार नाही अशी खात्रीलायक व्यवस्था करण्यासाठी प्रत्येक कारखान्यात परिणामकारक उपाय योजले पाहिजेत.

३१. [4][(१) कोणत्याही कारखान्यात, कोणतेही संयंत्र किंवा यंत्रसामग्री किंवा तिचा कोणताही भाग येत असेल तर, असे संयंत्र, यंत्रसामग्री किंवा तिचा भाग चालवताना तो सुरक्षिततेच्या मर्यादेपेक्षा अधिक दाबावर चालविला जाणार नाही याची खातरजमा करण्यासाठी परीणामकारक उपाय योजण्यात येतील.] दाब संयंत्र.

(२) राज्य शासनास, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या कोणत्याही संयंत्राची किंवा यंत्राची तपासणी करण्याची किंवा चाचणी घेण्याची व्यवस्था करण्याबाबत आणि कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांत याबाबत राज्य शासनाच्या मते आवश्यक असतील अशा इतर सुरक्षाविषयक उपाययोजना विहित करण्याबाबत नियम करता येतील.

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम १३ द्वारे, मूळ मजकुराऐवजी घातले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे, मूळ खंडाऐवजी दाखल करण्यात आला (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे, मूळ पोटकलमाऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[१][ (३) राज्य शासन, नियमाद्वारे, त्यांत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही संयंत्राच्या किंवा यंत्रसामग्रीच्या कोणत्याही भागाला या कलमाच्या उपबंधांपासून सूट देऊ शकेल.]

मजले, जमिनी, जिने व प्रवेशमार्ग.

३२. प्रत्येक कारखान्यात,—

(क्) सर्व मजले, जमिनी, पायऱ्या, जिने, मार्ग व मार्गिका मजबूत बांधणीच्या व सुस्थितीत ठेवलेल्या असल्या पाहिजेत, [२][आणि त्यांच्यामध्ये कोणतेही अडथळे व ज्यामुळे माणसे घसरू शकतील असे पदार्थ नसले पाहिजेत,] आणि सुरक्षिततेची खालीलायक व्यवस्था करणे आवश्यक असेल तेव्हा, पायऱ्या, जिने, मार्ग व मार्गिका यांचा उपयोग करताना धरावयासाठी मजबूत कठड्यांची सोय केली पाहिजे ;

(ख्) ज्या ठिकाणी कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही वेळी काम करणे भाग असेल अशा ठिकाणी वाजवी रीत्या व्यवहार्य असेल तेथवर, सुरक्षित प्रवेशमार्गांची योजना करून ते सुस्थितीत राखले पाहिजेत ;

[३][ (ग्) जेव्हा कोणत्याही व्यक्तीला, जिथून ती पडू शकेल इतक्या उंचावरून काम करावे लागते तेव्हा जेथवर व्यवहार्य असेल तेथवर, तेथे कुंपण घालून किंवा अन्य व्यवस्था करून तेथे काम करणाऱ्या व्यक्तीच्या सुरक्षिततेची खातरजमा करण्याची तरतूद करण्यात येईल.]

फरशीमधील खड्डे, डबरे, विवरे, वगैरे.

३३. (१) प्रत्येक कारखान्यात, जमिनीत किंवा एखाद्या फरशीवर कायम बसविलेले पात्र, डबरे (सम्प्स्), टाकी, खड्डा किंवा विवर हे त्याच्या खोलीमुळे, स्थितिस्थानामुळे, रचनेमुळे किंवा तीत असलेल्या वस्तूंमुळे धोकादायक झाले असेल किंवा होण्याचा संभव असेल तर, ते सुरक्षितपणे झाकले पाहिजे किंवा त्याला पक्के कुंपण घातले पाहिजे.

(२) राज्य शासन, लेखी आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशा शर्तीवर, कोणतेही पात्र, डबरे, टाकी, खड्डा किंवा विवर ह्यांच्या संबंधात, कोणत्याही कारखान्यास किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यास या कलमाच्या उपबंधांचे पालन करण्याबाबत सूट देऊ शकेल.

अति वजनाची ओझी.

३४. (१) कोणत्याही कारखान्यात, कोणत्याही व्यक्तीस, तिला इजा होण्याचा संभव असेल असे अति वजनाचे कोणतेही ओझे उचलण्याच्या, वाहून नेण्याच्या किंवा हलवण्याच्या कामावर लावता कामा नये.

(२) राज्य शासनास, कारखान्यांत किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांत किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रियेत कामावर लावलेले प्रौढ पुरुष, प्रौढ स्त्रिया, किशोरवयीन मुले व बालके यांजकडून किती कमाल वजनाची ओझी उचलण्यात, वाहून नेण्यात किंवा हलविण्यात यावीत हे विहित करणारे नियम करता येतील.

डोळ्यांचे संरक्षण.

३५. विहित करण्यात येईल अशी जी निर्मितिप्रक्रिया एखाद्या कारखान्यात चालत असेल त्या प्रक्रियेत,—

(क्) अशा प्रक्रियेच्या ओघात उडालेल्या कणांनी किंवा तुकड्यांनी डोळ्यांना इजा होण्याचा धोका असेल तर, किंवा

(ख्) अति प्रखर उजेडाकडे पहावे लागल्यामुळे डोळ्यांना धोका पोहोचत असेल तर,

—अशा निर्मिति प्रक्रियेच्या बाबतीत, राज्य शासन, नियमांद्वारे, त्या प्रक्रियेत किंवा त्या ठिकाणाच्या अगदी जवळ, कामावर लावलेल्या व्यक्तीच्या संरक्षणासाठी परिणामक्षम पडद्याची किंवा योग्य गॉगल पुरविण्याची व्यवस्था करणे आवश्यक करू शकेल.

अपायकारक धूम, वायू इत्यादी यांच्या बाबतीत बाळगावयाची सावधगिरी.

[४][ ३६. (१) कोणत्याही कारखान्यात, जेथे माणसांच्या जीवाला धोका होईल इतक्या प्रमाणात कोणताही घातक वायू, धूम, वाफ किंवा धूळ असण्याचा संभव असेल असा कोणताही कक्ष, टाकी, पिंप, खड्डा, धुरांडे किंवा इतर बंदिस्त जागा यात कोणत्याही व्यक्तीला, पुरेशा आकाराच्या मॅनहोलची किंवा बाहेर पडण्यासाठी दुसऱ्या परिणामकारक साधनाची व्यवस्था केली असल्याखेरीज, प्रवेश करण्यास भाग पाडण्यात येणार नाही किंवा प्रवेश करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम १३ द्वारे, पोटकलम (२) नंतर हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ (१) द्वारे, खंड (क्) मधील "असल्या पाहिजेत" या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. १९८७ चा अधिनियम २०, कलम १६ द्वारे, मूळ खंड (ग्) ऐवजी घातले.

४. १९८७ चा अधिनियम २०, कलम १७ द्वारे, मूळ कलमाऐवजी समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देश केल्याप्रमाणे, कोणत्याही कारखान्यातील कोणत्याही बंदिस्त जागेत, तीत असलेला कोणताही वायू, धूम, वाफ किंवा धूळ यांचे प्रमाण अनुज्ञेय मर्यादेच्या आत आणण्याच्या दृष्टीने ती काढून टाकण्यासाठी व ती पुन्हा आत येऊ न देण्यासाठी शक्य असतील ते सर्व उपाय करण्यात येईपर्यंत, व एकतर—

(क) अशा जागेत घातक वायू, धूम, वाफ आणि धूळ नसून ती जागा व्यक्तींनी प्रवेश करण्यास योग्य आहे, अशा अर्थाचे सक्षम व्यक्तीने, तिने स्वत: घेतलेल्या चाचणीवर आधारलेले, लेखी प्रमाणपत्र दिलेले असल्याशिवाय; किंवा

(ख) कामगाराने योग्य असा श्वसन उपकरणसंच परिधान केलेला असल्याशिवाय व एका दोरीला पक्का बांधलेला पट्टा परिधान केला असून त्याचे मोकळे टोक बंदिस्त जागेबाहेर उभ्या असलेल्या व्यक्तीने धरलेले असल्याशिवाय;

कोणत्याही व्यक्तीला प्रवेश करण्यास भाग पाडण्यात येणार नाही किंवा प्रवेश करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.]

[1][ ३६क. कोणत्याही कारखान्यात,— हातवाही विजेच्या दिव्याच्या वापराबाबत बाळगावयाची सावधगिरी.

(क) कोणताही कोष्ठ, टाकी, पिंप, खड्डा, नळ, धुरांडे किंवा इतर बंदिस्त जागा यात [2][ सुरक्षिततेसाठी पुरेशा साधनांची व्यवस्था केल्याशिवाय,] चोवीस व्होल्टपेक्षा अधिक व्होल्टता (व्होल्टेज) असलेला हातवाही विजेचा दिवा किंवा विजेचे इतर कोणतेही उपसाधन वापरण्यास परवानगी देता कामा नये; आणि

(ख) असा कोष्ठ, टाकी, पिंप, खड्डा, नळ, धुरांडे किंवा इतर बंदिस्त जागा यात कोणताही ज्वालाग्राही वायू, गॅस, धूम किंवा रज:कण असण्याची शक्यता असेल अशा बाबतीत, तेथे ज्वालारोधी (फ्लेमप्रुफ) रचना असलेल्या दिव्याव्यतिरिक्त कोणताही दिवा किंवा बत्ती वापरण्याची परवानगी देता कामा नये.]

३७. (१) कोणत्याही कारखान्यात, कोणत्याही निर्मिती प्रक्रियेमुळे, प्रज्वलन (इग्नीशन) होताच स्फोट होण्याचा संभव असेल, अशा स्वरुपाचे व अशा प्रमाणात कोणतेही रज:कण, वायू, धूम किंवा वाफ निर्माण होत असेल तेथे,— स्फोटक किंवा ज्वालाग्राही धूळ, वायू, वगैरे.

(क) त्या प्रक्रियेत वापरण्यात येणाऱ्या संयंत्राला किंवा यंत्रसामग्रीला परिणामकारक कुंपण घालून;

(ख) असे रज:कण, वायू, धूम किंवा वाफ बाहेर घालवून किंवा ती साचण्यास प्रतिबंध करून;

(ग) प्रज्वलनाची शक्यता असेल अशी सर्व प्रकारची साधने वगळून, किंवा त्यांस परिणामकारक कुंपण घालून;

—असा स्फोट होण्यास प्रतिबंध करण्यासाठी शक्य असतील ते सर्व उपाय योजले पाहिजेत.

(२) कोणत्याही कारखान्यात पोटकलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या अशा कोणत्याही प्रक्रियेत वापरण्यात येणाऱ्या संयंत्राची किंवा यंत्रसामग्रीची रचना वर उल्लेखिलेल्या स्फोटामुळे तो दाब निर्माण होण्याचा संभव असेल त्या दाबापुढे ते संयंत्र किंवा ती यंत्रसामग्री टिकाव धरील, अशा प्रकारची नसेल तेथे, असे संयंत्र किंवा यंत्रसामग्री यात चोक, बाधिका (बॅफल), निकासछिद्र यांची किंवा इतर परिणामकारक उप साधनाची योजना करून स्फोटाचा फलाव व परिणाम यांना प्रतिबंध करण्यासाठी शक्य असतील ते सर्व उपाय योजले पाहिजेत.

(३) एखाद्या कारखान्यातील संयंत्राच्या किंवा यंत्रसामग्रीच्या कोणत्याही भागात वातावरणीय दाबापेक्षा अधिक दाबाखाली कोणताही स्फोटक किंवा ज्वालाग्राही वायू किंवा वाफ असेल तेथे, पुढील उपबंधांचे अनुसरण केल्याखेरीज अन्यथा तो भाग उघडता कामा नये:—

(क) त्या भागाला जोडलेल्या कोणत्याही नळाच्या कोणत्याही सांध्याची खिळणी किंवा त्या भागात उघडणाऱ्या कोणत्याही मुखावरील झाकणाची खिळणी सैल करण्यापूर्वी, त्या भागातील किंवा अशा कोणत्याही नळामधील वायूचा किंवा वाफेचा प्रवाह, बंद झडपेच्या सहाय्याने (स्टॉप व्हॉल्व्ह) किंवा इतर साधनाने परिणामकारक रीतीने थांबविला पाहिजे;

(ख) उपरोक्ताप्रमाणे अशी कोणतीही खिळणी काढून टाकण्यापूर्वी, त्या भागातील किंवा नळातील वायुचा किंवा वाफेचा दाब वातावरणीय दाबाइतका कमी करण्यासाठी शक्य असतील तेवढे सर्व उपाय योजले पाहिजेत ;

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम १६ द्वारे, कलम ३६ नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले.

२. १९८७ चा अधिनियम २०, कलम १८ द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला. (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(ग) उपरोक्ताप्रमाणे अशी कोणतीही खिळणी सैल करण्यात किंवा काढून टाकण्यात आली असेल तेथे, ती खिळणी पुन्हा घट्ट जोडण्यात किंवा, प्रकरणपरत्वे, पुन्हा बसविण्यात येईपर्यंत कोणताही स्फोटक अगर ज्वालाग्राही वायू किंवा वाफ यंत्राच्या त्या भागात किंवा नळामध्ये जाण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी परिणामकारक उपाय योजले पाहिजेत :

परंतु, खुल्या हवेत उभारलेल्या संयंत्राच्या किंवा यंत्रसामग्रीच्या बाबतीत, या पोटकलमाचे उपबंध लागू होणार नाहीत.

(४) ज्या कोणत्याही संयंत्रामध्ये, टाकीमध्ये किंवा पात्रामध्ये कोणताही स्फोटक अगर ज्वालाग्राही पदार्थ असेल किंवा पूर्वी ठेवलेला असेल अशा कोणत्याही संयंत्रामधील, टाकीमधील किंवा पात्रामधील तो पदार्थ आणि त्यापासून निर्माण होणारा धूम नाहीसा करण्यासाठी किंवा असा पदार्थ आणि त्यापासून निर्माण होणारा धूम अस्फोटक किंवा अज्वलनशील करण्यासाठी पुरेशा उपाययोजना केलेल्या असल्याखेरीज कोणत्याही कारखान्यात, त्या संयंत्रावर, टाकीवर किंवा पात्रावर, उष्णता देण्याची प्रक्रिया अंतर्भूत असलेल्या वेल्डिंगच्या, पिळेने झाळण्याच्या (ब्रेझिंगच्या), झाळणीच्या (सॉल्डरिंगच्या) किंवा कापण्याच्या (कटिंगच्या) प्रक्रिया करता कामा नयेत, आणि असा कोणताही पदार्थ अशा कोणत्याही प्रक्रियेनंतर असे संयंत्र, टाकी किंवा पात्र यात, तो पेट घेण्याचा धोका उद्‌भवणार नाही इतके ते थंड होईपर्यंत जाऊ देता कामा नये

(५) राज्य शासन, नियमांद्वारे विहित करण्यात येतील, अशा शर्तींवर, कोणत्याही कारखान्यास किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांना, या कलमाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधापासून सूट देऊ शकेल.

**आगीच्या प्रसंगी बाळगावयाची सावधगिरी.**

[१][ ३८. (१) प्रत्येक कारखान्यामध्ये आतील बाजूस व बाहेरील बाजूस आगीचा उद्रेक आणि फैलाव होण्यास प्रतिबंध करण्याकरिता, आणि—

(क) आगीच्या प्रसंगी, सर्व व्यक्तींना बाहेर पडण्यास सुरक्षित साधनांची, आणि

(ख) आग विझविण्याकरिता आवश्यक साधनांची व सुविधांची, तरतूद करण्याकरिता व त्या सज्ज ठेवण्याकरिता, सर्व व्यवहार्य उपाययोजना करण्यात येतील.

(२) प्रत्येक कारखान्यातील सर्व कामगारांना आगीच्या प्रसंगी सुटका करून घ्यावयाच्या साधनांची माहिती आहे व अशा प्रसंगी अनुसरावयाच्या पद्धतीचे पुरेसे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले आहे याची खातरजमा करण्यासाठी परिणामकारक उपाय योजण्यात येतील.

(३) राज्य शासन, कोणत्याही कारखान्याच्या किंवा कारखान्याच्या वर्गाच्या किंवा कोणत्याही वर्णनाच्या कारखान्याच्या संबंधात, पोट-कलम (१) आणि (२) चे उपबंध अंमलात आणण्यासाठी उपाय योजण्यात भाग पाडणारे नियम करू शकेल.

(४) खंड (क्) च्या पोट-कलम (१) चा खंड (क्) किंवा पोट-कलम (२) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर मुख्य निरीक्षकाचे कारखान्यात चालणाऱ्या कामाचे स्वरुप, अशा कारखान्याचे बांधकाम, जीवितास किंवा सुरक्षिततेस संभवणारा विशेष धोका, किंवा इतर कोणतीही परिस्थिती विचारात घेतल्यानंतर असे मत झाले की, पोट-कलम (१) चा खंड (क्) किंवा पोट-कलम (२) याच्या प्रयोजनार्थ, कारखान्यात करण्यात आलेली व्यवस्था मग ती विहित केल्यानुसार असो वा नसो पुरेशी नाही, तर ती लेखी आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी कारखान्यामध्ये, त्यास आवश्यक व रास्त वाटतील अशा जादा उपायांची व्यवस्था करण्यात यावी, असे फर्मावू शकेल.]

**सदोष भागांची तपशीलवारी देण्यास किंवा त्यांच्या मजबुतीची चाचणी घेण्यास फर्मावण्याचा अधिकार.**

३९. कारखान्यातील कोणतीही इमारत किंवा इमारतीचा भाग किंवा रस्त्यांचा, यंत्रसामग्रीचा किंवा संयंत्राचा कोणताही भाग हा, मानवी जीवितास किंवा सुरक्षिततेस धोका पोहोचेल अशा स्थितीत असल्याचे निरीक्षकास दिसून आले तर, तो कारखान्याच्या [२][कार्यचालकावर किंवा व्यवस्थापकावर किंवा दोघांवर] लेखी आदेश बजावून, विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी,—

(क) अशी इमारत, रस्ते, यंत्रसामग्री, किंवा संयंत्र यांचा सुरक्षितपणे उपयोग करता येईल किंवा काय हे निश्चित करण्यासाठी आवश्यक असतील अशी आरेखने, तपशीलवारी आणि इतर तपशील सादर करण्यास, किंवा

(ख) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रितीने चाचणी करून तिचा निष्कर्ष निरीक्षकास कळविण्यास,

—फर्मावू शकेल.

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम १९ द्वारे, मूळ कलमाऐवजी समाविष्ट करण्यात आले (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून.)

२. १९७६ चा अधिनियम ९४, कलम १८ द्वारे, "व्यवस्थापक" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४०. (१) कारखान्यातील कोणतीही इमारत किंवा इमारतीचा भाग किंवा रस्त्यांचा, यंत्र-सामग्रीचा किंवा संयंत्राचा कोणताही भाग हा, मानवी जीवितास किंवा सुरक्षिततेस धोका पोहोचेल अशा स्थितीत असल्याचे निरीक्षकास दिसून आले तर, त्यास ज्या उपाययोजना करणे त्याच्या मते आवश्यक आहे त्या उपाययोजना विनिर्दिष्ट करणारा आणि अशा उपाययोजना विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेपूर्वी अंमलात आणण्यास फर्मावणारा लेखी आदेश कारखान्याच्या [1][कार्यचालकावर किंवा व्यवस्थापकावर किंवा दोघांवर] बजावता येईल. इमारतीची व यंत्र-सामग्रीची सुरक्षितता.

(२) कारखान्यातील कोणत्याही इमारतीचा किंवा इमारतीच्या भागाचा किंवा रस्त्यांच्या, यंत्र-सामग्रीच्या किंवा संयंत्राच्या कोणत्याही भागाचा उपयोग केल्यामुळे मानवी जीवितास किंवा सुरक्षिततेस निकटवर्ती धोका आहे असे जर निरीक्षकास दिसून आले तर, त्यास तो भाग यथोचितरीत्या दुरुस्त करण्यात येईपर्यंत किंवा बदलण्यात येईपर्यंत त्याचा उपयोग करण्यास मनाई करणारा लेखी आदेश कारखान्याच्या व्यवस्थापकावर बजावता येईल.

[2][४०क. कारखान्यातील कोणतीही इमारत किंवा इमारतीचा भाग इतका नादुरुस्त झालेला आहे की, त्यामुळे कामगारांचे आरोग्य व कल्याण यांच्या दृष्टीने हानिकारक अशी स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे असे निरीक्षकास दिसून आले तर, त्याला ज्या उपाययोजना करणे त्याच्या मते आवश्यक आहे त्या उपाययोजना विनिर्दिष्ट करणारा आणि आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अशा तारखेपूर्वी त्या उपाययोजना अंमलात आणण्यात फर्मावणारा लेखी आदेश कारखान्याच्या कार्यचालकावर किंवा व्यवस्थापकावर किंवा त्या दोघांवर बजावता येईल. इमारतींची देखभाल.

४०ख. (१) (एक) जेथे सर्वसाधारणपणे एक हजार किंवा त्याहून अधिक कामगार कामावर लावण्यात येतात, किंवा सुरक्षा अधिकारी.

(दोन) ज्या निर्मिती प्रक्रियेमध्ये किंवा कामात, राज्य शासनाच्या मते, कारखान्यात कामावर लावलेल्या व्यक्तींना शारीरिक इजा पोहोचण्याचा, विषबाधा होण्याचा किंवा रोग होण्याचा धोका किंवा आरोग्यास इतर कोणताही धोका संभवतो अशी कोणतीही निर्मिती प्रक्रिया किंवा काम जेथे चालवण्यात येत असेल,

—अशा प्रत्येक कारखान्यात, राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील इतक्या सुरक्षा अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यास फर्मावले तर, कार्यचालकास तसे करावे लागेल.

(२) सुरक्षा अधिकाऱ्यांची कर्तव्ये, अर्हता व सेवेच्या शर्ती राज्य शासन विहित करील अशा असतील.]

४१. राज्य शासनास, कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांमध्ये कामावर लावलेल्या व्यक्तींना सुरक्षिततेची हमी देण्यासाठी, त्यास आवश्यक वाटतील अशा आणखी काही [3][साधनांची व उपाययोजनांची] व्यवस्था करण्यास भाग पाडण्याबाबत नियम करता येतील. या प्रकरणास पूरक म्हणून नियम करण्याचा अधिकार.

[4][प्रकरण चार क

## धोक्याच्या प्रक्रियेशी संबंधित उपबंध

४१ क. (१) राज्य शासन, धोक्याची प्रक्रिया अंतर्भूत असलेल्या कारखान्याच्या प्रारंभिक स्थानासाठी किंवा अशा कोणत्याही कारखान्यांच्या विस्तारासाठी परवानगी मागण्याकरिता केलेला अर्ज विचारात घेण्याबाबत सल्ला देण्याच्या प्रयोजनार्थ स्थळमूल्यन समिती नियुक्त करू शकेल व त्यात— स्थळ मूल्यन ठरवणाऱ्या समितीची स्थापना.

(क) राज्याचा मुख्य निरीक्षक, जो त्या समितीचा अध्यक्ष असेल ;

(ख) जल (प्रदुषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम, १९७४ याच्या कलम ३ अन्वये
१९७४ चा ६ केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या केंद्रीय जल प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण मंडळाचा एक प्रतिनिधी ;

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम १८ द्वारे, "व्यवस्थापकावर" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे, कलम ४० नंतर ४०क व ४०ख ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

३. वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे, "साधनांची" या शब्दाऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

४. १९८७ चा अधिनियम २०, कलम २० द्वारे, हे प्रकरण समाविष्ट करण्यात आले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून) (मात्र नवीन कलम ४१-ख हे १ जून, १९८८ रोजी व तेव्हापासून अंमलात आले).

(ग्) वायू (प्रदुषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम, १९८१ याच्या कलम ३ मध्ये उल्लेखिलेल्या केंद्रीय वायू प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण मंडळाचा प्रतिनिधी ; १९८१ चा १४.

(घ्) जल (प्रदुषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम, १९७४ याच्या कलम ४ अन्वये नियुक्त केलेला राज्य मंडळाचा प्रतिनिधी ; १९७४ चा ६.

(ङ) वायू (प्रदुषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम, १९८१ याच्या कलम ५ मध्ये निर्देशिलेल्या राज्य वायू प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण मंडळाचा प्रतिनिधी ;

(च्) राज्याच्या पर्यावरण विभागाचा प्रतिनिधी ;

(छ्) भारत सरकारच्या हवामान शास्त्रीय विभागाचा प्रतिनिधी ;

(ज्) व्यावसायिक आरोग्याच्या क्षेत्रातील तज्ञ; आणि

(झ्) राज्य शासनाच्या नगररचना विभागाचा प्रतिनिधी ;

आणि राज्य शासनाने स्वीकृत केलेले याचापेक्षा अधिक नसतील असे पुढील अन्य सदस्य.

(एक) कारखान्यामध्ये चालणाऱ्या धोक्याच्या प्रक्रियेचे विशेष ज्ञान असलेला शास्त्रज्ञ ;

(दोन) ज्याच्या अधिकारितेत कारखाना स्थापित झाला आहे अशा स्थानिक प्राधिकारणाचा प्रतिनिधी ;

(तीन) राज्य शासनाला योग्य वाटतील अशा तीनपेक्षा अधिक नसतील इतक्या अन्य व्यक्ती.

(२) धोक्याची प्रतिक्रिया अंतर्भूत असलेल्या कारखान्याच्या स्थापनेसाठी केलेल्या अर्जाची स्थल मूल्यन समिती तपासणी करील आणि विहित नमुन्यातील असा अर्ज मिळाल्यापासून नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत राज्य शासनाकडे आपली शिफारस करील.

(३) केंद्र सरकारच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील एखाद्या कारखान्याच्या संबंधातील प्रक्रिया असेल ते किंवा, केंद्र सरकारच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील एखाद्या महामंडळाच्या किंवा कंपनीच्या संबंधातील कोणतीही प्रक्रिया असेल तेव्हा केंद्र सरकारद्वारे त्या समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी, राज्य शासन स्वीकृत करून घेईल.

(४) धोक्याची प्रक्रिया अंतर्भूत असलेल्या कारखान्याच्या स्थापनेसाठी किंवा विस्तारासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीकडून कोणतीही माहिती मागविण्याचा स्थळमूल्यन समितीला अधिकार असेल.

(५) धोक्याची प्रक्रिया अंतर्भूत असलेल्या कारखान्याच्या स्थापनेसाठी किंवा विस्तारासाठी राज्य शासनाने अर्जास मान्यता दिली असेल तेथे अर्जदारास, जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ आणि वायू (प्रदुषण व नियंत्रण) अधिनियम, १९८१ अन्वये स्थापन झालेल्या केंद्रीय मंडळाची किंवा राज्य मंडळाची आणखी मंजुरी मिळवण्याची आवश्यकता असणार नाही. १९७४ चा ६. १९८१ चा १४.

कार्यचालकाने माहिती उघड करणे सक्तीचे असणे

४१ ख. (१) धोक्याची प्रक्रिया अंतर्भूत असलेल्या अशा प्रत्येक कारखान्याचा कार्यचालक, विहित केलेल्या रीतीने, धोक्यासंबंधीची तसेच आरोग्यास असलेल्या धोक्यासंबंधीची सर्व माहिती, आणि निर्मिती, परिवहन, साठवण व अन्य प्रक्रिया करताना, त्यातील सामग्री किंवा पदार्थ हाताळल्यामुळे किंवा त्यांच्या संपर्कात आल्याने उद्भवणाऱ्या अशा धोक्यावर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना कारखान्यात कामाला असलेल्या कामगारांना, मुख्य निरीक्षकाला आणि ज्याच्या अधिकारितेत असा कारखाना असेल त्या स्थानिक प्राधिकरणाला व आसपासच्या सर्वसाधारण जनतेला उघड करील.

(२) धोक्याची प्रक्रीया अंतर्भूत असलेल्या कारखान्याची नोंदणी करतेवेळी कार्यचालक त्या कारखान्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता यांच्या बाबतीतील धोरण तपशीलवार नमूद करील, आणि ते धोरण मुख्य निरीक्षकास आणि स्थानिक प्राधिकरणास कळवील आणि त्यानंतर विहित करण्यात येईल एवढ्या कालांतराने उक्त धोरणात कोणतेही बदल केल्यास त्याबाबत मुख्य निरीक्षकास आणि स्थानिक प्राधिकरणास कळवील.

(३) पोटकलम (१) अन्वये पुरविलेल्या माहितीमध्ये, टाकाऊ पदार्थाचे परिमाण, विशिष्ट वर्णन आणि इतर गुणधर्म यांची आणि त्यांची विल्हेवाट लावण्याची रीत याची अचूक माहिती समाविष्ट करील.

(४) मुख्य निरीक्षकाच्या मान्यतेने प्रत्येक कार्यचालक त्याच्या कारखान्याकरिता, स्थळनिहाय आणीबाणी योजना आणि अनर्थ निवारणाची तपशीलवार उपाययोजना तयार करील आणि अपघाताच्या प्रसंगी करावयाच्या सुरक्षा विषयक उपाययोजनेची त्या कारखान्यात नोकरीला असलेल्या कामगारांना आणि कारखान्याच्या आसपास राहात असलेल्या सामान्य जनतेला माहिती देईल.

(५) कारखान्याचा प्रत्येक कार्यचालक,—

(क्) कारखाना (विशोधन) अधिनियम, १९८७ याच्या प्रारंभी अशा कारखान्यात धोक्याच्या प्रक्रियेचे काम होत असेल तर अशा प्रारंभापासून तीस दिवसांच्या कालावधीत; आणि

(ख्) अशा प्रारंभानंतर कोणत्याही वेळी तो कारखाना धोक्याच्या प्रक्रियेचे काम सुरु करणार असेल तर अशा प्रक्रियेच्या प्रारंभापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, विहित केलेल्या नमुन्यात व तशा रीतीने त्या प्रक्रियेचे स्वरूप आणि तपशील मुख्य निरीक्षकाला कळवील.

१४. (६) जेव्हा कारखान्याचा कोणताही कार्यचालक पोटकलम (५) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करील, तेव्हा पोटकलम (६) अन्वये अशा कारखान्याला दिले गेलेले लायसन, या अधिनियमाच्या उपबंधान्वये त्या कार्यचालकाला कोणतीही शास्ती देण्यात आली असली तरीही, रद्दबातल ठरण्यास पात्र असेल.

६.

(७) धोक्याची प्रक्रिया अंतर्भूत असलेल्या कारखान्याचा कार्यचालक, मुख्य निरीक्षकाच्या पूर्व-मान्यतेने, कारखान्याच्या आतील भागात, धोकादायक पदार्थ हाताळण्यासाठी, वापरण्यासाठी त्याचे परिवहन करण्यासाठी आणि साठवण करण्यासाठी आणि अशा पदार्थांची कारखान्याच्या बाहेर विल्हेवाट लावण्यासाठी, अनुसरावयाचे उपाय ठरवून देईल आणि कामगारांमध्ये कारखान्याच्या सान्निध्यात राहत असलेल्या सामान्य जनतेमध्ये ते उपाय विहित केलेल्या रीतीने प्रसिद्ध करील.

**धोक्याच्या प्रक्रियेसंबंधात कार्यचालकाची विवक्षित जबाबदारी.**

**४१ ग.** कोणतीही धोक्याची प्रक्रिया अंतर्भूत असलेल्या कारखान्याचा प्रत्येक कार्यचालक,—

(क) कारखान्यातील जो कोणी कामगार, निर्माण करण्यात येणारे, साठवलेले, हाताळण्यात येणारे किंवा परिवहन केले जाणारे कोणतेही रसायन, विषारी पदार्थ किंवा अन्य कोणताही हानीकारक पदार्थ यांच्या सान्निध्यात येत असेल त्या कामगाराच्या आरोग्यविषयक नोंदी, किंवा प्रकरणपरत्वे, वैद्यकीय नोंदी अचूकपणे ठेवील आणि अशा नोंदी, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने कामगारांना पाहण्यासाठी खुल्या असतील ;

(ख) ज्यांच्याकडे धोकादायक पदार्थ हाताळण्याची अर्हता आणि अनुभव आहे आणि ज्या कारखान्याच्या आत अशा हाताळणीच्या कामावर देखरेख करण्यास आणि कामाच्या जागी कामगारांच्या संरक्षणासाठी आवश्यक त्या सुविधा विहित केलेल्या रीतीने पुरविण्यास सक्षम आहेत, अशा व्यक्तींची नियुक्ती करील :

परंतु, अशा नियुक्त केलेल्या व्यक्तींची अर्हता आणि अनुभव याविषयी काही प्रश्न उद्भवल्यास मुख्य निरीक्षकाचा निर्णय अंतिम राहील ;

(ग) प्रत्येक कामगाराच्या वैद्यकीय परीक्षेसाठी,—

(क) धोक्याचे पदार्थ हाताळण्याचे किंवा त्याच्याशी संबंधित प्रक्रिया करण्याचे काम त्या कामगाराकडे सोपविण्यापूर्वी, आणि

(ख) अशा कामावर तो असताना व असे काम करण्याचे बंद केल्यावर, बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालांतराने व विहित करण्यात येईल अशा रीतीने तरतूद करील.

ा ६.
ा १४.

**चौकशी समिती नेमण्याची केंद्र शासनाची शक्ती.**

**४१ घ.** (१) धोक्याची प्रक्रिया जेथे चालते अशा कारखान्याच्या संबंधात असाधारण परिस्थिती उद्भवल्यास, केंद्र शासन, त्या कारखान्यात कामावर असलेल्या कामगारांच्या आरोग्याबाबत आणि सुरक्षेबाबत विहित केलेल्या उपाययोजना किंवा मानके स्वीकारण्यात कोणतीही चूक किंवा हयगय झाली असल्यास किंवा अशा चुकीमुळे वा हयगयीमुळे बाधा पोचलेल्या किंवा पोचण्याची शक्यता असलेल्या सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याबाबत आणि सुरक्षेबाबत विहित केलेल्या उपाययोजना किंवा मानके स्वीकारण्यात कोणतीही चूक किंवा हयगय झाल्यास त्याची कारणे शोधून काढण्याच्या दृष्टीने, आणि अशा कारखान्यात किंवा अन्यत्र तशा प्रकारची असाधारण परिस्थिती भविष्यात पुन्हा उद्भवू नये म्हणून प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने त्या कारखान्यात अनुसरण्यात येणाऱ्या आरोग्यविषयक व सुरक्षाविषयक मानकांबाबत चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नियुक्त करु शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या समितीमध्ये एक अध्यक्ष व दोन इतर सदस्य असतील आणि समितीचे विचारार्थ विषय आणि तिच्या सदस्यांचा पदावधी प्रसंगाच्या आवश्यकतेनुसार केंद्र शासनाकडून निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) समितीची शिफारस सल्ल्याच्या स्वरूपाची असेल.

**आणीबाणीविषयक मानके.**

**४१ ङ.** (१) जेथे केंद्र शासनाची अशी खात्री झाली असेल की, धोक्याची प्रक्रिया किंवा धोक्याच्या प्रक्रियेच्या वर्गासंबंधात कोणतीही सुरक्षिततेची मानके विहित करण्यात आलेली नाहीत, किंवा जेथे अशी मानके अपुरी आहेत, तेथे केंद्र शासन, कारखाना सल्लागार सेवा व कामगार संस्था महासंचालक यांस किंवा धोक्याच्या प्रक्रियेबाबतच्या सुरक्षा विषयक मानकांसंबंधातील प्रकरणांमध्ये तज्ञ असणाऱ्या कोणत्याही संस्थेस, अशा धोक्याच्या प्रक्रियेसंबंधात, योग्य ती मानके अंमलात आणण्यासाठी आणीबाणीविषयक मानके ठरवून देण्याचा निर्देश देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये ठरवून दिलेली आणीबाणीविषयक मानके, या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमात अंतर्भूत केली जाईपर्यंत ती या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमात जणु काही समाविष्ट असल्याप्रमाणे अंमलात आणण्याजोगी असतील व तशीच परिणामक असतील.

**विषारी पदार्थ यांच्या उद्भासनाची अनुज्ञेय मर्यादा.**

**४१ च.** (१) कोणत्याही कारखान्यातील निर्मिती प्रक्रियेमधील (मग ती धोक्याची असो किंवा रसायने आणि अन्य प्रकारची असो) रासायनिक पदार्थांच्या उद्भासनाची कमाल अनुज्ञेय मर्यादा दुसऱ्या अनुसूचीमध्ये निर्देशिलेल्या मूल्याइतकी असेल.

(२) विज्ञान क्षेत्रातील कोणतीही तज्ज्ञ संस्था किंवा तज्ज्ञ व्यक्ती यांच्याकडून मिळालेले कोणतेही शास्त्रीय सिद्धतत्व अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही वेळी, उक्त अनुसूचीमध्ये योग्य तो बदल करू शकेल.

सुरक्षा व्यवस्थेमधील कामगारांचा सहभाग.

४१ छ. (१) जेथे धोक्याची प्रक्रिया चालू असते, किंवा जेथे धोक्याचे पदार्थ वापरले किंवा हाताळले जातात अशा प्रत्येक कारखान्यातील कार्यचालक, तेथील कामाच्या ठिकाणी योग्य ती सुरक्षा आणि आरोग्य राखण्याकरिता आणि व्यवस्थापन यांच्यात सहकार्याची भावना वाढविण्यासाठी आणि त्यासंदर्भात केलेल्या उपाययोजनांचा नियतकालिक आढावा घेण्यासाठी कामगारांचे आणि व्यवस्थापनाचे समान संख्येत प्रतिनिधी असलेली एक सुरक्षा समिती स्थापन करील :

परंतु, राज्य शासन, लेखी आदेशाद्वारे आणि नमूद करण्यात येतील अशा कारणांसाठी, कोणत्याही कारखान्याचा किंवा कारखान्याच्या वर्गाच्या कार्यचालकास अशी समिती स्थापन करण्यापासून सूट देऊ शकेल.

(२) सुरक्षा समितीची रचना, तिच्या सदस्यांचा कालावधी आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये, विहित केल्याप्रमाणे असतील.

निकटवर्ती धोक्यासंबंधी इशारा देण्याचा कामगारांचा अधिकार.

४१ ज. (१) जेव्हा धोक्याच्या प्रक्रियेचे काम करणाऱ्या कोणत्याही कारखान्यात कामावर असलेल्या कामगारांना वाजवीरीत्या अशी धास्ती वाटत असेल की, एखाद्या अपघातामुळे त्यांच्या जीवास आणि आरोग्यास निकटच्या काळात धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, तेव्हा ते ती गोष्ट, कार्यचालकाच्या, एजंटांच्या किंवा कारखान्याची प्रभारी असलेल्या संबंधित प्रक्रियेची प्रत्यक्षपणे किंवा सुरक्षा समितीमधील तिच्या प्रतिनिधींमार्फत प्रभारी असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या निदर्शनास आणून देऊ शकतील आणि त्याचवेळी ती गोष्ट निरीक्षकाच्या निदर्शनास आणून देऊ शकतील.

(२) कार्यचालक, एजंट, व्यवस्थापक किंवा कारखान्याची वा प्रक्रियेची प्रभारी व्यक्ती यांची जर असा निकटवर्ती धोका असल्याबद्दल खात्री झाली तर त्याबाबत ताबडतोब उपाययोजनात्मक कारवाई करणे आणि केलेल्या कारवाईचा अहवाल तात्काळ जवळच्या निरीक्षकाकडे पाठविणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

(३) जर कामगारांना धास्ती वाटत असल्याप्रमाणे कोणताही निकटवर्ती धोका असल्याबद्दल कार्यचालक, एजंट, व्यवस्थापक किंवा पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेली प्रभारी व्यक्ती यांची खात्री पटली नसली तरीसुद्धा, ते सदर प्रकरण तात्काळ जवळच्या निरीक्षकाकडे पाठवतील व असा निकटवर्ती धोका आहे किंवा कसे या प्रश्नावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.]

## प्रकरण पाच

## कल्याण कार्य

धुण्याच्या सोयी.

४२. (१) प्रत्येक कारखान्यात,—

(क) तेथील कामगारांच्या उपयोगासाठी पुरेशा व योग्य प्रकारच्या धुण्याच्या सोयींची व्यवस्था केली पाहिजे व त्या नेहमी सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत ;

(ख) पुरुष व स्त्री कामगारांच्या उपयोगासाठी स्वतंत्र व पुरेसा आडोसा असलेल्या जागेची व्यवस्था केली पाहिजे ;

(ग) अशा सोयी केलेल्या जागेत सोयीस्करपणे जाता आले पाहिजे व त्या जागा स्वच्छ ठेवल्या पाहिजेत.

(२) राज्य शासन, कोणत्याही कारखान्याच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांच्या किंवा कोणत्याही निर्मिती प्रक्रियेच्या संबंधात, धुण्याच्या पुरेशा व योग्य सोयीची मानके विहित करु शकेल.

कपडे ठेवण्यासाठी व सुकविण्यासाठी सोयी.

४३. राज्य शासनास, कोणत्याही कारखान्याच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांच्या संबंधात, कामाच्या वेळी न घालावयाचे कपडे ठेवण्यासाठी व ओले कपडे सुकविण्यासाठी योग्य जागांची व्यवस्था करण्यास भाग पाडण्याबाबत नियम करता येतील.

बसण्याच्या सोयी.

४४. (१) प्रत्येक कारखान्यात, ज्यांना उभे राहून काम करावे लागते अशा सर्व कामगारांसाठी, त्यांच्या कामाच्या दरम्यान विश्रांतीची जी कोणतीही संधी मिळेल तिचा त्यांना फायदा घेता यावा म्हणून, बसण्यासाठी योग्य व्यवस्था केली पाहिजे व ती नीट राखली पाहिजे.

(२) कोणत्याही कारखान्यात, एखादा विशिष्ट निर्मिती प्रक्रियेत कामास लागलेले किंवा एखाद्या विशिष्ट कक्षात काम करणारे कामगार आपले काम बसलेल्या स्थितीत कार्यक्षम रीतीने करू शकतील असे जर मुख्य निरीक्षकाचे मत असेल तर, तो लेखी आदेशाद्वारे, अशा कारखान्याच्या कार्यचालकास अशा रीतीने कामास लावलेल्या किंवा काम करीत असलेल्या सर्व कामगारांसाठी व्यवहार्य असेल अशी बसण्याची सोय विनिर्दिष्ट तारखेपूर्वी करण्यास फर्मावू शकेल.

(३) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पोटकलम (१) चे उपबंध हे एखाद्या विनिर्दिष्ट कारखान्यास किंवा एखाद्या वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांस किंवा एखाद्या विनिर्दिष्ट निर्मिती प्रक्रियेस लागू होणार नाहीत असे जाहीर करता येईल.

४५. (१) प्रत्येक कारखान्यात, सर्व कामाच्या वेळांत चटकन मिळू शकतील अशा विहित वस्तू असलेल्या प्रथमोपचाराच्या पेट्या किंवा कपाटे पुरवली पाहिजेत व ती सुस्थितीत ठेवली पाहिजेत आणि पुरवावयाच्या व राखावयाच्या अशा पेट्यांची किंवा कपाटांची संख्या, कारखान्यात सामान्यतः [१][कोणत्याही एका वेळी] कामावर लावण्यात आलेल्या दर दीडशे कामगारांसाठी किमान एक एवढी असावी. **प्रथमोपचाराची साधने.**

[२][(२) प्रथमोपचाराच्या पेटीत किंवा कपाटात विहित वस्तूंखेरीज इतर काहीही ठेवता कामा नये.

(३) प्रत्येक प्रथमोपचाराची पेटी किंवा कपाट हे, [३][राज्य शासनाने मान्यता दिलेले प्रथमोपचाराचे प्रमाणपत्र घेतलेल्या] व कारखान्याच्या कामाच्या वेळांत नेहमी चटकन भेटू शकेल अशा स्वतंत्र जबाबदार व्यक्तीच्या ताब्यात ठेवले पाहिजे.]

[४][(४)] जेथे [५][सामान्यतः] पाचशेपेक्षा अधिक कामगार [५][कामावर लावण्यात येतात] अशा प्रत्येक कारखान्यात, विहित केलेली साधनसामग्री ठेवलेल्या आणि विहित करण्यात येईल अशा वैद्यकीय व शुश्रुषा कर्मचारी वर्गाच्या ताब्यात असलेल्या विहित आकाराच्या उपचार कक्षाची व्यवस्था केली पाहिजे व तो सुस्थितीत ठेवला पाहिजे. [६][आणि कारखान्याच्या कामाच्या वेळी या सोयी नेहमी चटकन उपलब्ध करून देण्यात आल्या पाहिजेत.]

४६. (१) राज्य शासनास, जेथे अडीचशेपेक्षा अधिक कामगार सामान्यतः कामावर लावण्यात येतात अशा कोणत्याही विनिर्दिष्ट कारखान्यात कामगारांच्या उपयोगासाठी एका किंवा अनेक आहार-गृहांची व्यवस्था करण्यास व ती चालवण्यास कार्यचालकाला फर्मावणारे नियम करता येतील. **आहारगृहे.**

(२) पूर्ववर्ती अधिकाराच्या व्यापकतेला बाधा न येता अशा नियमांद्वारे पुढील गोष्टीसाठी उपबंध करता येतील,--

(क) कोणत्या तारखेपर्यंत अशा आहारगृहाची व्यवस्था केली पाहिजे;

(ख) आहारगृहाची रचना, जागा, फर्निचर व इतर साधनसामग्री यांच्या बाबतीतील मानके ;

(ग) त्या ठिकाणी खाण्यासाठी पुरवावयाचे खाद्यपदार्थ व त्याबद्दल आकारावयाचे दर ;

(घ) आहारगृहासाठी व्यवस्थापन समिती स्थापन करणे आणि आहारगृहाच्या व्यवस्थापक-वर्गात कामगारांना प्रतिनिधित्व देणे;

[७][(घघ) खाद्यपदार्थांची किंमत ठरवताना जो खर्च हिशेबात घ्यायचा नसतो व जो नियोक्त्याला सोसावा लागतो अशा आहारगृह चालवावयाच्या व खर्चाच्या बाबी ;]

(ङ) विहित करण्यात येतील अशा शर्तींवर खंड (ग) अन्वये नियम करण्याचा अधिकार मुख्य निरीक्षकाला प्रदान करणे.

४७. (१) जेथे सामान्यतः दीडशेपेक्षा अधिक कामगार कामावर लावण्यात येतात अशा प्रत्येक कारखान्यात, कामगारांच्या उपयोगासाठी पुरेशा व योग्य निवाऱ्याच्या जागांची किंवा विश्रांतीकक्षांची आणि जेथे कामगार घरून आणलेले जेवण घेऊ शकतील व पिण्याच्या पाण्याची सोय असेल अशा सोयी-स्कर भोजनकक्षांची व्यवस्था केली पाहिजे व ते सुस्थितीत ठेवले पाहिजेत : **निवाऱ्याच्या जागा, विश्रांतीकक्ष आणि भोजनकक्ष.**

परंतु, कलम ४६ च्या उपबंधानुसार चालवावयाचे कोणतेही आहारगृह या पोटकलमाच्या आवश्यक बाबीचा एक भाग म्हणून समजण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जेथे भोजनकक्ष असेल अशा कारखान्यात कोणत्याही कामगाराने कामाच्या कक्षात कोणतेही खाद्यपदार्थ खाता कामा नयेत.

(२) पोटकलम (१) अन्वये तरतूद करावयाच्या निवाऱ्याच्या जागा किंवा विश्रांतीकक्ष किंवा भोजनकक्ष यांत पुरेसा प्रकाश व खेळती हवा असली पाहिजे आणि ते थंड व स्वच्छ ठेवण्यात आले पाहिजेत.

---

१. १९५४ चा अधिनियम २५, कलम ९ द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे, मूळ पोटकलम (२) ऐवजी ही पोटकलमे दाखल करण्यात आली.

३. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २१(क) द्वारे, "प्रथमोपचारात प्रशिक्षित असलेल्या" या मजकुराऐवजी, हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. १९५४ चा अधिनियम २५, कलम ९ द्वारे, पोटकलम (३) ला पोटकलम (४) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

५. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २१ (ख) (एक) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम २१ (ख) (दोन) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे, खंड (घ) नंतर हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(३) राज्य शासन,—

(क) या कलमान्वये ज्यांची व्यवस्था करावयाची अशा निवाऱ्याच्या जागा, विश्रांतीकक्ष आणि भोजनकक्ष यांची रचना, जागा, फर्निचर व इतर साधनसामग्री यांचा दर्जा विहित करू शकेल;

(ख) शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही कारखान्याला किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांना या कलमाच्या आवश्यक बाबींपासून सूट देऊ शकेल.

पाळणाघरे. ४८. (१) जेथे सामान्यतः [1][तीसपेक्षा] अधिक स्त्री कामगार कामावर लावण्यात येतात अशा प्रत्येक कारखान्यात, अशा स्त्रियांच्या सहा वर्षांच्या आतील वयाच्या बालकांच्या उपयोगासाठी योग्य अशी एखादी खोली किंवा खोल्या पुरवल्या पाहिजेत व त्या सुस्थितीत ठेवल्या पाहिजेत.

(२) अशा या खोल्यांत पुरेशा जागेची सोय असली पाहिजे व त्यांत पुरेसा प्रकाश व खेळती हवा असली पाहिजे, त्या स्वच्छ व आरोग्यदायक स्थितीत ठेवल्या पाहिजेत आणि त्या बालके व अर्भके यांच्या संगोपनाचे प्रशिक्षण घेतलेल्या स्त्रियांच्या ताब्यात असल्या पाहिजेत.

(३) राज्य शासनास पुढील प्रकारचे नियम करता येतील :—

(क) या कलमान्वये पुरवावयाच्या खोल्या कोठे असाव्यात ते आणि त्यांची रचना, जागा, फर्निचर व इतर साधनसामग्री या संबंधात मानके विहित करणारे ;

(ख) ज्या कारखान्यास हे कलम लागू असेल त्या कारखान्यात, स्त्री कामगारांच्या बालकांची काळजी घेण्यासाठी, त्यांचे कपडे धुण्याच्या व बदलण्याच्या सोयी धरून, इतर आणखी सोयी पुरविणे आवश्यक करणारे;

(ग) कोणत्याही कारखान्यात अशा बालकांसाठी मोफत दूध किंवा अल्पोपाहार किंवा दोन्ही पुरवणे आवश्यक करणारे ;

(घ) कोणत्याही कारखान्यात अशा बालकांच्या माता त्या बालकांना आवश्यक तितक्या कालांतरागणिक दूध पाजू शकतील अशा सोयी उपलब्ध केल्या जाव्यात असे आवश्यक करणारे.

कल्याणकार्य अधिकारी. ४९. (१) जेथे सामान्यतः पाचशे किंवा त्यापेक्षा अधिक कामगार कामावर लावण्यात येतात अशा कोणत्याही कारखान्यात, कार्यचालकाने विहित करण्यात येतील इतके कल्याणकार्य अधिकारी नेमले पाहिजेत.

(२) राज्य शासनास, पोटकलम (१) अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये, अर्हता व त्यांच्या सेवेच्या शर्ती विहित करता येतील.

या प्रकरणास पूरक म्हणून नियम करण्याचा अधिकार. ५०. राज्य शासनास पुढील प्रकारचे नियम करता येतील :—

(क) कोणत्याही कारखान्यास किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांना या प्रकरणाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यापासून सूट द्यावयाची झाली तर कामगारांच्या कल्याणासाठी विहित करण्यात येईल अशी पर्यायी व्यवस्था त्या कारखान्यांनी केली पाहिजे अशा शर्तीवर तशी सूट देणारे;

(ख) कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांत तेथे कामावर लावलेल्या कामगारांच्या प्रतिनिधींना कामगारांच्या कल्याणकार्य व्यवस्थेशी संलग्न करून घ्यावे असे आवश्यक करणारे.

## प्रकरण सहा

### प्रौढ व्यक्तींचे कामाचे तास

आठवड्याचे तास. ५१. कोणत्याही प्रौढ कामगारास कारखान्यात कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासाहून अधिक तास काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही.

आठवडी सुट्या. ५२. (१) कोणत्याही प्रौढ कामगारास आठवड्याच्या पहिल्या दिवशी (त्याचा यात यापुढे 'उक्त दिवस' असा उल्लेख केला आहे), कारखान्यात काम करावयास लावावयाचे किंवा तशी मुभा द्यायची झाली तर,—

(क) त्यास उक्त दिवसाच्या लगतपूर्वीच्या किंवा लगतनंतरच्या तीन दिवसांपैकी एक संबंध दिवस सुटी मिळालेली आहे किंवा मिळणार आहे, आणि

(ख) कारखान्याच्या व्यवस्थापकाने, उक्त दिवस किंवा खंड (क) अन्वये द्यावयाची बदली सुटी यांपैकी जो आधीचा असेल त्या दिवसापूर्वी,—

(एक) त्या कामगाराला उक्त दिवशी काम करावयास लावण्याचा आपला उद्देश असल्याची आणि त्याऐवजी द्यावयाच्या बदली सुटीसंबंधीची नोटीस निरीक्षकाच्या कार्यालयात दिलेली आहे, आणि

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २३ द्वारे, "पन्नासपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दोन) त्या कारखान्यात तशा अर्थाची नोटीस लावलेली आहे,

—असे झाल्याशिवाय त्याला याप्रमाणे उक्त दिवशी काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही :

परंतु, ज्यायोगे मध्ये सबंध दिवसाची सुटी न मिळता लागोपाठ दहा दिवसांहून अधिक दिवसांपर्यंत कोणत्याही कामगारास काम करावे लागेल असा कोणताही दिवस बदली सुटी म्हणून देता येणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये दिलेल्या नोटिसा ह्या, उक्त दिवस किंवा रद्द करावयाचा सुटीचा दिवस या दोहोंपैकी जो आधीचा असेल त्या दिवसापूर्वी येणाऱ्या दिवसापेक्षा अधिक उशीरा होणार नाही अशा बेताने निरीक्षकाच्या कार्यालयात एक नोटीस देऊन आणि कारखान्यात एक नोटीस लावून रद्द करता येतील.

(३) जेव्हा पोटकलम (१) मधील उपबंधांनुसार कोणत्याही कामगाराने उक्त दिवशी काम केले असेल व त्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या तीन दिवसांपैकी एका दिवशी त्यास सुटी मिळाली असेल तेव्हा, तो उक्त दिवस त्याचे आठवड्याचे कामाचे तास मोजण्याच्या प्रयोजनासाठी मागील आठवड्यात समाविष्ट करावा लागेल.

५३. (१) या अधिनियमाच्या उपबंधांन्वये एखाद्या कारखान्याला किंवा त्या कारखान्यातील कामगारांना कलम ५२ च्या उपबंधांपासून सूट देणारा आदेश दिल्यामुळे किंवा नियम केल्यामुळे, जर त्या कलमाच्या पोटकलम (१) अन्वये ज्यांसाठी उपबंध करण्यात आला आहे अशा आठवडी सुट्यांपैकी कोणत्याही सुट्यांना एखाद्या कामगारास मुकावे लागले तर, अशा रीतीने त्याचे सुटीचे जितके दिवस फुकट गेले असतील तितके भरपाई सुटीचे दिवस, ज्या महिन्यात त्यास सुट्या देय होत्या त्या महिन्यात किंवा त्या महिन्याच्या लगतनंतरच्या दोन महिन्यांत त्यास द्यावे लागतील. भरपाई सुट्या.

(२) ज्यांच्यासाठी पोटकलम (१) मध्ये उपबंध केलेला आहे अशा सुट्या कशा रीतीने देण्यात याव्यात ते राज्य शासनाला विहित करता येईल.

५४. कलम ५१ च्या उपबंधांच्या अधीनतेने, कोणत्याही प्रौढ कामगारास कारखान्यात कोणत्याही दिवशी नऊ तासांहून अधिक तास काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही : दररोजचे कामाचे तास.

[1][परंतु, मुख्य निरीक्षकाच्या पूर्वमान्यतेच्या अधीनतेने, या कलमात विनिर्दिष्ट केलेले दररोजचे कामाचे जास्तीत जास्त तास पाळी बदलण्याच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून वाढविता येतील.]

५५. [2][(१)] प्रत्येक दिवशी कारखान्यात प्रौढ कामगारांच्या [3][कामाचे अवधी] अशा रीतीने ठरविण्यात यावेत की, कोणताही अवधी पाच तासांपेक्षा जास्त असणार नाही आणि कोणत्याही कामगारास निदान अर्धा तास तरी विश्रांतीचे मध्यंतर मिळाल्यावाचून पाच तासांहून अधिक वेळ काम करावे लागणार नाही. विश्रांतीसाठी मध्यंतरे.

[4][(२) राज्य शासन किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने मुख्य निरीक्षक, लेखी आदेशाद्वारे व त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कारणांसाठी कोणत्याही कारखान्यास पोटकलम (१) च्या उपबंधांपासून सूट देऊ शकेल; —मात्र, एखाद्या कामगाराने मध्यंतर न घेता करावयाच्या कामाचे एकूण तास सहापेक्षा अधिक होऊ नयेत.]

५६. कारखान्यातील प्रौढ कामगारांच्या कामाचे अवधी अशा तऱ्हेने योजले जावेत की, कलम ५५ खालील त्याच्या विश्रांतीच्या मध्यंतरासह त्यांचा विस्तार कोणत्याही दिवशी साडेदहा तासांहून अधिक होणार नाही : कार्यकाल विस्तार.

परंतु, मुख्य निरीक्षकास, कारण लेखी विनिर्दिष्ट करून त्यासाठी [5][कार्यकाल विस्तार बारा तासांपर्यंत] वाढविता येईल.

५७. कारखान्यातील एखादा कामगार मध्यरात्रीनंतरही चालू राहणाऱ्या पाळीवर काम करीत असेल तर,— रात्रपाळ्या.

(क) कलमे ५२ व ५३ यांच्या प्रयोजनांसाठी, त्या कामगारांच्या बाबतीत, एका संपूर्ण दिवसाची सुटी याचा अर्थ, त्याची पाळी संपेल त्या वेळेपासून सुरू होणारा लागोपाठ चोवीस तासांचा अवधी, असा होईल ;

---

१. १९५४ चा अधिनियम २५, कलम १० द्वारे, हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे, कलम ५५ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३. १९४९ चा अधिनियम ४०, कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे, "अवधी" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४. १९५४ चा अधिनियम २५, कलम ११ द्वारे, हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

५. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २४ द्वारे, "कार्यकाल विस्तार बारा तास इतका" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) त्याच्या बाबतीत पुढील दिवस म्हणजे अशी पाळी संपेल त्या वेळेपासून सुरू होणारा चोवीस तासांचा अवधी, असे समजण्यात येईल आणि मध्यरात्रीनंतर त्याने जितके तास काम केले असेल तितके तास आधीच्या दिवसात मोजण्यात येतील.

परस्परव्यापी पाळीस मनाई. ५८. (१) कोणत्याही कारखान्यात, कामगारांच्या एकाहून अधिक टप्पागटास एकाच वेळी एकाच प्रकारचे काम कामगारांना करावे लागेल अशा पाळी पद्धतीने काम चालविता येणार नाही.

[1][(२) राज्य शासन किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने मुख्य निरीक्षक, लेखी आदेशाद्वारे व त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कारणांकरिता, त्यास इष्ट वाटतील अशा शर्तींवर, कोणत्याही कारखान्यास किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांस किंवा कारखान्यातील कोणत्याही खात्यास किंवा उप शाखेस किंवा त्यातील कोणत्याही प्रवर्गाच्या किंवा प्रकारच्या कामगारांस पोटकलम (१) च्या उपबंधांपासून सूट देऊ शकेल.]

अतिकालिक कामाबद्दल जादा वेतन. ५९. (१) जेव्हा कोणत्याही कारखान्यात कामगाराला कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा अधिक तास किंवा कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांहून अधिक तास काम करावे लागेल तेव्हा, त्यास अतिकालिक कामाबद्दल त्याच्या सामान्य वेतन दराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्याचा हक्क असेल.

[2][(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनांकरिता "सामान्य वेतन दर" याचा अर्थ, मूळ वेतन अधिक कामगाराला अन्नधान्य व इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे त्याला उपार्जित होणाऱ्या फायद्याचे रोख सममूल्य धरून, कामगारांना त्या त्या वेळी जे भत्ते मिळण्याचा हक्क असेल ते भत्ते, असा होतो; परंतु, त्यात बोनसचा आणि अतिकालिक कामाबद्दलच्या वेतनाचा समावेश होत नाही.

(३) एखाद्या कारखान्यातील कोणत्याही कामगारांना कामावारी दराच्या तत्त्वावर वेतन देण्यात येत असेल तेव्हा, ज्यावेळी अतिकालिक काम करण्यात आले होते त्या कॅलेंडर महिन्याच्या लगतपूर्वीच्या महिन्यामध्ये ज्या दिवशी कामगारांनी तेच किंवा तसेच काम प्रत्यक्षात पार पाडले असेल त्या दिवसांच्या त्यांच्या पूर्ण वेळ कमाईच्या दैनिक सरासरीशी वेळेवारी दर हा सममूल्य असल्याचे मानण्यात येईल आणि असे वेळेवारी दर हे त्या कामगारांचे सामान्य वेतन दर असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, ज्याने निकटपूर्वीच्या कॅलेंडर महिन्यात तसेच किंवा तशा प्रकारचे काम केले नसेल अशा कामगारांच्या बाबतीत, वेळेवारी दर हा ज्या आठवड्यात अतिकालिक काम करण्यात आले त्या आठवड्यात त्याने प्रत्यक्षात जितके दिवस काम केले असेल तितक्या दिवसांच्या त्याच्या कमाईच्या दैनिक सरासरीशी सममूल्य असल्याचे मानले जाईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी, ज्या दिवशी कामगाराने प्रत्यक्षात काम केले त्या दिवसांच्या कमाईची संगणना करताना, कामगाराला अन्नधान्य व इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे त्याला उपार्जित होणाऱ्या फायद्याचे सममूल्य धरून, कामगारास त्या त्या वेळी जे भत्ते मिळण्याचा हक्क असेल ते भत्ते समाविष्ट करावे लागतील परंतु, त्यात कोणत्याही बोनसचा किंवा ज्या कालावधीच्या संदर्भात कमाईची संगणना करण्यात येत असेल त्या कालावधीसाठी प्रदेय असलेल्या अतिकालिक कामांबद्दलच्या वेतनाचा समावेश होणार नाही.]

[3][(४) कामगाराला अन्नधान्य व इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे त्याला उपार्जित होणाऱ्या फायद्याचे रोख सममूल्य हे, जेव्हा जेव्हा विहित करण्यात येईल तेव्हा तेव्हा एका प्रमाण कुटुंबास जास्तीत जास्त जितके अन्नधान्य व इतर वस्तू अनुज्ञेय असतील तितक्या कमाल मर्यादेच्या आधारे संगणित केले जाईल.

**स्पष्टीकरण१.**—"प्रमाण कुटुंब" याचा अर्थ, कामगार, त्याचा किंवा तिचा विवाहसाथी आणि चौदा वर्षांखालील वयाची दोन मुले मिळून एकूण तीन प्रौढ उपभोग युनिटांचे बनलेले कुटुंब, असा होतो.

**स्पष्टीकरण२.**—"प्रौढ उपभोग युनिट" याचा अर्थ, चौदा वर्षांवरील वयाच्या पुरुषास लागणारे उपभोग युनिट, असा होतो, आणि चौदा वर्षांवरील वयाच्या स्त्रीसाठी आणि चौदा वर्षांखालील वयाच्या मुलांसाठी लागणारे उपभोग युनिट हे प्रौढ उपभोग युनिटाच्या अनुक्रमे .८ व .६ या दरांनी परिगणित केले जाईल.

---

१. १९५४ चा अधिनियम २५, कलम १२ द्वारे, मूळ पोटकलम (२) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

२. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २५ द्वारे, पोटकलमे (२) व (३) ऐवजी ही पोटकलमे दाखल करण्यात आली.

३. १९५४ चा अधिनियम २५, कलम १३ द्वारे, पोटकलम (४) ऐवजी ही पोटकलमे दाखल करण्यात आली.

(५) राज्य शासन,—

(क) कामगाराला अन्नधान्य व इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे त्याला उपार्जित होणाऱ्या फायद्याचे रोख सममूल्य कशा रीतीने संगणित करावे ; आणि

(ख) या कलमाच्या उपबंधांचे पालन करण्याच्या प्रयोजनासाठी कारखान्यामध्ये कोणत्या नोंदवह्या राखाव्या ;

—ते विहित करणारे नियम करू शकेल.]

६०. ज्या कोणत्याही दिवशी एखादा प्रौढ कामगार कोणत्याही कारखान्यात आधीच काम करीत असेल, त्यास त्याच दिवशी इतर कोणत्याही कारखान्यात काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही,—मात्र, विहित करण्यात येईल अशी परिस्थिती याला अपवाद असेल. दोन ठिकाणी कामास लावण्यावर निर्बंध.

६१. (१) प्रत्येक दिवशी कोणकोणत्या अवधींमध्ये प्रौढ कामगारांना काम करावे लागेल ते स्पष्टपणे दर्शविणारी, प्रौढ कामगारांच्या कामाच्या अवधींबाबतची नोटीस, कलम १०८, पोटकलम (२) मधील उपबंधांनुसार प्रत्येक कारखान्यात लावावी लागेल व ती बिनचूक ठेवावी लागेल. प्रौढ कामगारांकरिता कामाच्या अवधीं-बाबतची नोटीस.

(२) पोटकलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या नोटिशीत दर्शवावयाचे अवधी या कलमातील पुढील उपबंधांनुसार आगाऊ निश्चित करावे लागतील आणि त्या अवधींत कामगारांना काम करावे लागल्यास, तशा कामामुळे कलमे ५१, ५२, ५४, [1][५५, ५६ व ५८] यांतील उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण होणार नाही अशा प्रकारचे ते असावे लागतील.

(३) कारखान्यातील सर्व प्रौढ कामगारांना सारख्याच अवधींमध्ये काम करावे लागणार असेल तेथे, कारखान्याच्या व्यवस्थापकाला ते अवधी अशा कामगारांच्या बाबतीत सरसकट ठरवावे लागतील.

(४) कारखान्यातील सर्व प्रौढ कामगारांना सारख्याच अवधींमध्ये काम करावे लागणार नसेल तेथे, कारखान्याच्या व्यवस्थापकाला त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार त्यांचे गट करून वर्गीकरण करावे लागेल आणि प्रत्येक गटातील कामगारांची संख्या दर्शवावी लागेल.

(५) ज्या ज्या गटाला पाळी पद्धतीने काम करावे लागत नाही, अशा प्रत्येक गटासाठी कारखान्याच्या व्यवस्थापकाला त्या गटास केव्हा केव्हा काम करावे लागणार असेल त्या वेळा ठरवाव्या लागतील.

(६) कोणत्याही गटास पाळी पद्धतीने काम करावे लागणार असेल, आणि त्याचे टप्पागट (रिले) आगाऊ ठरविलेल्या नियतकालिक पाळीबदलास अधीन राहणार नसतील तेथे, कारखान्याच्या व्यवस्थापकाला कोणकोणत्या अवधींत त्या गटाच्या प्रत्येक टप्पागटास काम करावे लागेल ते ठरवावे लागेल.

(७) कोणत्याही गटास पाळी पद्धतीने काम करावयाचे असेल, आणि त्याचे टप्पागट आगाऊ ठरविलेल्या नियतकालिक पाळीबदलास अधीन राहावयाचे असतील तेथे, कारखान्याच्या व्यवस्थापकाला अशा प्रकारे पाळीयोजना तयार करावी लागेल की जेणेकरून कोणत्याही दिवशी कोणत्याही टप्पागटाला कोणकोणत्या अवधींमध्ये काम करावे लागणार आणि त्या दिवशी कोणत्या वेळी कोणता टप्पागट काम करणार आहे हे कळू शकेल.

(८) राज्य शासनास, पोटकलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या नोटिशीचे नमुने आणि ती कशा रीतीने ठेवण्यात आली पाहिजे ते विहित करता येईल.

(९) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर काम सुरू करणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नोटिशीच्या दोन प्रती, ज्या दिवशी कारखान्यात काम सुरू करण्यात येणार असेल त्या दिवसापूर्वी निरीक्षकाकडे पाठवाव्या लागतील.

(१०) कोणत्याही कारखान्यातील कामाच्या पद्धतीत जेणेकरून पोटकलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या नोटिशीत बदल करणे आवश्यक होईल अशा तऱ्हेचा कोणताही बदल करण्याचा विचार असल्यास बदल करण्यापूर्वी त्यासंबंधीच्या दोन प्रती निरीक्षकास पाठवून ते कळवावे लागेल आणि मागील बदलाच्या तारखेपासून एक आठवडा उलटून जाईपर्यंत निरीक्षकाच्या पूर्वमंजुरीशिवाय असा कोणताही बदल करता येणार नाही.

६२. (१) प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापकाला प्रौढ कामगारांची एक नोंदवही राखावी लागेल व ती कामाच्या वेळेत किंवा कारखान्यात कोणतेही काम चालू असेल तेव्हा सर्व वेळी निरीक्षकाला उपलब्ध झाली पाहिजे आणि तीत पुढील गोष्टी दर्शविल्या पाहिजेत :— प्रौढ कामगारांची नोंदवही.

(क) कारखान्यातील प्रत्येक प्रौढ कामगाराचे नाव ;

(ख) त्याच्या कामाचे स्वरूप ;

(ग) त्याचा समावेश असेल असा कोणताही गट असल्यास, तो गट ;

---

१. १९५४ चा अधिनियम २५, कलम १४ द्वारे, "५५ व ५६" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(घ) त्याचा गट पाळी पद्धतीने काम करीत असेल तेव्हा, त्यास नेमून देण्यात आलेला टप्पागट;

(ङ) विहित करण्यात येईल असा इतर तपशील :

परंतु, कारखान्याच्या नित्याच्या कामाचा भाग म्हणून राखण्यात येणाऱ्या कोणत्याही हजेरीपत्रका-वरून किंवा नोंदवहीवरून कारखान्यातील कोणत्याही किंवा सर्व कामगारांबाबत या कलमाखाली आवश्यक असलेला तपशील मिळू शकतो असे निरीक्षकाचे मत असेल तर, तो लेखी आदेशाद्वारे असे हजेरीपत्रक किंवा अशी नोंदवही तेवढ्या मर्यादेपर्यंत त्या कारखान्यातील प्रौढ कामगारांच्या नोंदवहीऐवजी राखण्यात यावी अशी नोंदवही म्हणून समजण्यात यावी असा निदेश देऊ शकेल.

[1][ (१क) कोणत्याही प्रौढ कामगाराच्या नावाची व इतर तपशिलाची नोंद प्रौढ कामगारांच्या नोंदवहीत करण्यात आल्याखेरीज, त्याला कोणत्याही कारखान्यात काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही.]

(२) राज्य शासनास, प्रौढ कामगारांच्या नोंदवहीचा नमुना, ती कशा रीतीने ठेवली पाहिजे ती रीत आणि किती मुदतीपर्यंत ती जपून ठेवली पाहिजे ती मुदत या गोष्टी विहित करता येतील.

**कामाचे तास हे, कलम ६१ खालील नोटीस व कलम ६२ खालील [नोंदवही या दोहोंशी अनुरुप असणे.**

६३. कोणत्याही कारखान्यात कोणत्याही प्रौढ कामगारास, प्रौढ कामगारांसाठी कामाच्या अवधीसंबंधी त्या कारखान्यात लावलेली नोटीस आणि कारखान्यातील प्रौढ कामगारांच्या नोंदवहीत त्याच्या नावासमोर आगाऊ करण्यात आलेल्या नोंदी यांस अनुसरून असेल ते खेरीजकरून एरव्ही काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही.

**सूट देण्याबाबत नियम करण्याचा अधिकार.**

६४. (१) राज्य शासनास, एखाद्या कारखान्यात कोणत्या व्यक्ती पर्यवेक्षी किंवा व्यवस्थापकीय पदे धारण करीत आहेत किंवा गोपनीय स्वरुपाचे काम करण्याच्या पदावर नेमलेल्या आहेत असे समजावे, ते ठरवणारे [2][किंवा मुख्य निरीक्षकाच्या मते अशा नियमांद्वारे व्याख्या करण्यात आलेल्या व्यक्ती खेरीज-करून अन्य कोणतीही व्यक्ती कारखान्यात पर्यवेक्षी किंवा व्यवस्थापकीय पद धारण करीत असेल किंवा गोपनीय स्वरूपाचे काम करण्याच्या पदावर नेमलेली असेल तर, अशी व्यक्ती असे पद धारण करणारी किंवा अशा रीतीने नेमलेली व्यक्ती म्हणून घोषित करण्याचे अधिकार मुख्य निरीक्षकाला प्रदान करणारे] नियम करता येतील आणि कलम ६६, पोटकलम (१), खंड (ख्) चे उपबंध आणि त्या पोटकलमाच्या परंतुकाचे उपबंध खेरीजकरून, या प्रकरणाचे इतर उपबंध, अशा रीतीने व्याख्या केलेल्या [3][किंवा घोषित केलेल्या] कोणत्याही व्यक्तीस लागू असणार नाहीत :

[4][परंतु, अशा रीतीने व्याख्या करण्यात आलेल्या किंवा घोषित करण्यात आलेल्या व्यक्तीचा सामान्य वेतन दर [5][वेळोवेळी सुधारण्यात आल्याप्रमाणेच्या वेतन प्रदान अधिनियम, १९३६ ह्याच्या कलम १ पोटकलम ६ ह्यात विनिर्दिष्ट केलेल्या वेतन मर्यादेपेक्षा अधिक नसेल.] त्या बाबतीत, अशी व्यक्ती कलम ५९ खालील अतिकालिक कामाच्या संबंधातील जादा वेतनास हक्कदार असेल.]

(२) राज्य शासनास, कारखान्यातील प्रौढ कामगारांसाठी नियम करून, अशा नियमांद्वारे विहित करण्यात येईल तेथवर व अशा विहित शर्तींच्या अधीनतेने, पुढीलप्रमाणे सूट देण्याचा उपबंध करता येईल—

(क्) निकडीच्या दुरुस्त्या करण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांना कलमे ५१, ५२, ५४ ५५ व ५६ च्या उपबंधांपासून ;

(ख्) जे कोणतेही पूर्वतयारीचे किंवा पूरक स्वरूपाचे काम, कारखान्याच्या सर्वसाधारण कामाकरिता नेमून दिलेल्या मर्यादांच्या बाहेर जाऊन करणे अपरिहार्य असेल त्या कामावर लावलेल्या कामगारांना, कलमे ५१, ५४, ५५ व ५६ च्या उपबंधांपासून ;

(ग्) जे काम अपरिहार्यपणेच इतके वारंवार खंडीत होणारे असेल की, कामावर असताना ज्या मध्यंतरामध्ये कामगार काम करीत नाहीत ती मध्यंतरे कलम ५५ अन्वये अगर तद्नुसार आवश्यक असलेल्या विश्रांतीच्या मध्यंतराहून सामान्यतः अधिक असतील, अशा कामावर लावलेल्या कामगारांना कलमे ५१, ५४, ५५ व ५६ च्या उपबंधांपासून;

(घ्) जे काम तांत्रिक कारणांसाठी [6]* * * * सतत चालू ठेवलेच पाहिजे अशा कोणत्याही कामावर लावलेल्या कामगारांना, कलमे ५१, ५२, ५४, ५५ व ५६ च्या उप-बंधांपासून;

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २६ द्वारे, हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २७ (क्) (एक) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २७ (क्) (दोन) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २७ (क्) (तीन) द्वारे, हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

५. १९८७ चा अधिनियम २०, कलम २१ द्वारे, मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

६. १९५४ चा अधिनियम २५, कलम १५ द्वारे, "दिवसभर" हा मजकूर वगळण्यात आला.

(ड्) जे जिन्नस दररोज बनवले पाहिजेत किंवा पुरविले पाहिजेत असे अत्यावश्यक जिन्नस तयार करण्याच्या किंवा पुरविण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांना [1][कलम ५१ व कलम-५२ च्या] उपबंधांपासून;

(च्) जी निर्मिती प्रक्रिया ठराविक हंगाम खेरीजकरून इतर वेळी करता येणे शक्य नाही अशी प्रक्रिया करण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांना, [2][कलम ५१, कलम ५२ व कलम ५४ च्या] उपबंधांपासून;

(छ्) निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असणाऱ्या वेळांखेरीज इतर वेळी जी निर्मिती प्रक्रिया करता येणे शक्य नसेल अशी प्रक्रिया करण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांना, कलमे ५२ व ५५ च्या उपबंधांपासून;

(ज्) इंजिनघरे किंवा बाष्पगृहे यांमध्ये काम करणाऱ्या किंवा शक्ति-संयंत्राचे किंवा पारेषण यंत्रसामग्रीचे काम पाहण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांना, [1][कलम ५१ व कलम ५२ च्या] उपबंधांपासून;

[3][(झ्) वृत्तपत्रे छापण्याच्या कामावर लावलेल्या ज्या कामगारांना यंत्रसामग्री बंद पडल्यामुळे कामाशिवाय बसून राहावे लागत असेल अशा कामगारांना कलमे ५१, ५४ व ५६ च्या उपबंधांपासून];

१८६७ चा २५. **स्पष्टीकरण.**—या खंडातील "वृत्तपत्र" या संज्ञेला मुद्रण व पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७ यात नेमून दिल्याप्रमाणे तोच अर्थ आहे ;

(ञ्) रेल्वेच्या वाघिणीमध्ये [4][किंवा लॉऱ्यांमध्ये किंवा मालमोटारींमध्ये माल चढवण्याच्या किंवा त्यातून माल उतरवण्याच्या कामावर लावलेल्या कामगारांना, कलमे ५१, ५२, ५४, ५५ व ५६ च्या उपबंधांपासून; ]

[5][(ट्) राज्य शासनाने **शासकीय राजपत्रात** राष्ट्रीय महत्त्वाचे काम म्हणून अधिसूचित केलेल्या कोणत्याही कामावर लावलेल्या कामगारांना, कलमे ५१, ५२, ५४, ५५ किंवा ५६ च्या उपबंधांपासून].

(३) कोणतीही सूट देण्याचा उपबंध करण्याकरिता पोटकलम (२) अन्वये केलेल्या नियमांत, कलम ६१ च्या उपबंधापासून जी कोणतीही आनुषंगिक सूट देणे राज्य शासनास इष्ट वाटेल अशी सूट ते ठरवील अशा शर्तींवर देण्याबद्दलही उपबंध करता येईल.

[6][(४) ह्या कलमान्वये नियम करताना, राज्य शासनास, पोटकलम (२), खंड (क्) खालील सूट देण्याची बाब खेरीजकरून एरव्ही, अतिकालिक कामाचे तास धरून, कामाच्या खालील मर्यादा अधिक वाढविता येणार नाहीत, म्हणजे—

(एक) कोणत्याही दिवशी कामाचे एकूण तास दहा तासांपेक्षा अधिक असता कामा नयेत;

(दोन) विश्रांतीची मध्यंतरे धरून कार्यकालविस्तार कोणत्याही एका दिवशी बारा तासांपेक्षा अधिक असता कामा नये :

परंतु, राज्य शासनास, पोटकलम (२), खंड (घ्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कामगारांच्या कोणत्याही किंवा सर्व प्रवर्गांच्या संबंधात, एखाद्या पाळी कामगारास, पुढील पाळीतील जो कामगार कामावर आला नसेल त्याच्या गैरहजेरीत, पुढील संपूर्ण पाळीचे किंवा तिच्या भागाचे काम करणे शक्य व्हावे, म्हणून खंड (एक) व खंड (दोन) अन्वये लादण्यात आलेले निर्बंध कोणत्या परिस्थितीत व कोणत्या शर्तींच्या अधीनतेने, लागू होणार नाहीत ते विहित करण्यासाठी नियम करता येतील ;

[7][(तीन) आठवड्यातील अतिकालिक कामासुद्धा कामाचे एकूण आठ तास साठ तासांपेक्षा अधिक असता कामा नयेत ];

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २७ (ख्) (एक) द्वारे, "कलम ५२" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २७ (ख्) (दोन) द्वारे, "कलम ५२" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९५४ चा अधिनियम २५, कलम १५ द्वारे, हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २७ (ख्) (तीन) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २७ (ख्) (चार) द्वारे, खंड (ञ्) नंतर हा खंड समाविष्ट करण्यात आला.

६. १९५४ चा अधिनियम २५ या द्वारे, पोटकलम (४) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

७. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २७(ग्) द्वारे, मूळ खंड (तीन) ऐवजी नवीन (तीन) दाखल करण्यात आला.

[१][ (चार) ] कोणत्याही एका तिमाहीत, अतिकालिक कामाचे एकूण तास पन्नास तासांपेक्षा अधिक असता कामा नयेत.

**स्पष्टीकरण.**—"तिमाही" याचा अर्थ, दिनांक १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै अथवा १ ऑक्टोबर रोजी सुरू होणारा लागोपाठ तीन महिन्यांचा कालावधी, असा होतो.]

(५) या कलमान्वये केलेले नियम जास्तीत जास्त [२][पाच वर्षे] इतक्या कालावधीपर्यंत अंमलात राहतील.

**सूट देण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार.**

६५. (१) चालविण्यात येत असलेल्या कामाच्या स्वरुपामुळे किंवा इतर परिस्थितीमुळे, कोणत्याही कारखान्यातील किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांतील कोणत्याही प्रौढ कामगाराच्या कामाचे अवधी आगाऊ ठरवून घेणे गैरवाजवी आहे अशी राज्य शासनाची खात्री झाली तर, त्यास लेखी आदेशाद्वारे, योग्य वाटेल त्या मर्यादेपर्यंत व त्या रीतीने, आणि कामाच्या अवधीवर खात्रीपूर्वक नियंत्रण घालता येण्यासाठी इष्ट वाटतील अशा शर्तींच्या अधीनतेने, त्या कारखान्यातील अशा कामगारांच्या संबंधात, कलम ६१ मधील उपबंध शिथिल करता येतील किंवा त्यांत फेरबदल करता येतील.

(२) एखाद्या कारखान्याला किंवा एखाद्या गटातील अगर वर्गातील अगर एखाद्या वर्णनाच्या कारखान्यांत कामाचा अत्यंतिक ताण हलका करता यावा म्हणून त्या कारणासाठी राज्य शासन किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने मुख्य निरीक्षक, लेखी आदेशाद्वारे, त्यास आवश्यक वाटतील अशा शर्तींवर त्या कारखान्यातील किंवा कारखान्यांतील कोणत्याही किंवा सर्व प्रौढ कामगारांस कलमे ५१, ५२, ५४ व ५६ यांच्या उपबंधांपैकी कोणत्याही किंवा सर्व उपबंधांपासून सूट देऊ शकेल.

[३][(३) पोटकलम (२) अन्वये दिलेली कोणतीही सूट पुढील शर्तींच्या अधीन असेल :—

(एक) कोणत्याही दिवशी कामाचे एकूण तास बारा तासांपेक्षा अधिक असता कामा नयेत;

(दोन) विश्रांतीची मध्यंतरे धरून कार्यकालविस्तार कोणत्याही एका दिवशी तेरा तासांपेक्षा अधिक असता कामा नये ;

(तीन) आठवड्यातील अतिकालिक कामासुद्धा कामाचे एकूण तास साठ तासांपेक्षा अधिक असता कामा नयेत;

(चार) कोणत्याही कामगाराला सलग सात दिवसांपेक्षा अधिक काल काम करण्याची मुभा देण्यात येऊ नये आणि कोणत्याही एका तिमाहीतील अतिकालिक कामाचे एकूण तास पंचाहत्तर तासांपेक्षा अधिक असता कामा नयेत.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमामध्ये "तिमाही" यास कलम ६४, पोटकलम (४) मध्ये त्यास असेल तोच अर्थ आहे.]

[४]* * * * *

**स्त्रियांना कामावर लावण्यावर आणखी निर्बंध.**

६६. (१) कारखान्यांतील स्त्री कामगारांना ह्या प्रकरणाचे उपबंध लागू करताना त्यांच्या जोडीला आणखी पुढील निर्बंध घातले जातील, उदाहरणार्थ—

(क) कोणत्याही स्त्री कामगारास कलम ५४ च्या उपबंधापासून सूट देता येणार नाही;

(ख) कोणत्याही स्त्री कामगारास कोणत्याही कारखान्यात सकाळी ६ ते संध्याकाळी ७ या वेळेखेरीज एरव्ही [५][काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही ]:

परंतु, राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे [६][कोणत्याही कारखान्याच्या किंवा गटाच्या किंवा वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांच्या] संबंधात खंड (ख) मध्ये घालून दिलेल्या मर्यादांच्या बाबतीत बदल करता येईल, परंतु अशा बदलामुळे कोणत्याही स्त्री कामगारास रात्री १० ते पहाटे ५ च्या दरम्यान कामावर लावणे अधिकृत ठरणार नाही अशा रीतीने तो बदल करण्यात आला पाहिजे;

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम २७ (ग) द्वारे, मूळ खंड (तीन) ला "खंड (चार)" असा नवीन क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २७(घ) द्वारे, "तीन वर्षे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २८ (क) द्वारे, मूळ पोटकलम (३) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम २८(ख) द्वारे, पोटकलम (४) वगळण्यात आले.

५. वरील अधिनियमाच्या कलम २९ (एक) द्वारे, "कोणत्याही कारखान्यात कामावर लावता येणार नाही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम २९ (दोन) द्वारे, "कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (ग) आठवड्याच्या सुटीनंतर किंवा इतर कोणत्याही सुटीनंतर करावयाच्या पाळीबदला-व्यतिरिक्त, पाळयांमध्ये कोणताही बदल करता येणार नाही.]

(२) राज्य शासनास नियम करून त्यांद्वारे, ते विहित करील तेथवर व तशा विहित शर्तींवर मासे खारवण्याच्या किंवा मासे डब्यात भरण्याच्या ज्या कारखान्यात कोणत्याही कच्च्या मालाची हानी होऊ नये म्हणून किंवा तो खराब होऊ नये म्हणून, स्त्रियांना पोटकलम (१) मधील निर्बंधात नमूद केलेल्या तासांपेक्षा जास्त काळ कामावर लावणे आवश्यक असेल अशा कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रियांना उक्त निर्बंधापासून सूट देण्याबद्दलचा उपबंध करता येईल.

(३) पोटकलम (२) अन्वये केलेले नियम एकावेळी तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदती-पर्यंत अंमलात राहतील.

## प्रकरण सात

## अल्पवयीन व्यक्तींना कामावर लावणे

**अल्पवयीन बालकांना कामावर लावण्यास मनाई.**

६७. ज्या बालकाला चौदावे वर्ष पूर्ण झालेले नाही अशा कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही.

**प्रौढ नसलेल्या कामगारांनी टोकने बाळगणे.**

६८. ज्या बालकास चौदावे वर्ष पूर्ण झालेले आहे अशा कोणत्याही बालकास किंवा कोणत्याही किशोरास—

(क) कलम ६९ अन्वये त्यास अनुलक्षून दिलेले स्वास्थ्य प्रमाणपत्र कारखान्याच्या व्यवस्थाप-काच्या ताब्यात असल्याशिवाय, आणि

(ख) अशा बालकाने किंवा अशा किशोराने कामावर असताना अशा प्रमाणपत्राचे संदर्भ-दर्शक टोकन जवळ बाळगले असल्याशिवाय,

कोणत्याही कारखान्यात काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही.

**स्वास्थ्य प्रमाणपत्रे.**

६९. (१) एखादी अल्पवयीन व्यक्ती कारखान्यात काम करण्यास लायक असल्याबद्दल प्रमाणित करण्यात आल्यास त्या व्यक्तीला कारखान्यात कामावर लावण्यात येईल अशा अर्थाचा व्यवस्थापकाच्या सहीचा कागद सोबत जोडून, त्या अल्पवयीन व्यक्तीने किंवा तिच्या आई-वडिलांपैकी कोणीही किंवा पालकाने अर्ज केल्यानंतर, किंवा ज्या कारखान्यात काम करण्याची कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीची इच्छा असेल त्या कारखान्याच्या व्यवस्थापकाने अर्ज केल्यानंतर, प्रमाणन शल्यचिकित्सक अशा व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करून, ती व्यक्ती कारखान्यात काम करण्यास योग्य आहे याविषयी खात्री करून घेईल.

(२) प्रमाणन शल्यचिकित्सकाने तपासणी केल्यानंतर—

(क) जर त्याची अशी खात्री झाली की, अशा अल्पवयीन व्यक्तीला चौदावे वर्ष पूर्ण झालेले असून तिला विहित केलेली शारीरिक प्रमाण पातळी प्राप्त झाली आहे व असे काम करण्यास ती लायक आहे तर, ती व्यक्ती बालक म्हणून कारखान्यात काम करण्यास योग्य असल्याबद्दलचे प्रमाणपत्र ; किंवा

(ख) अशा अल्पवयीन व्यक्तीला पंधरावे वर्ष पूर्ण झालेले असून, कारखान्यात पूर्ण दिवसाचे काम करण्यास ती लायक आहे अशी त्याची खात्री पटल्यास, ती व्यक्ती प्रौढ म्हणून कारखान्यात काम करण्यास योग्य असल्याबद्दलचे प्रमाणपत्र ;

प्रमाणन शल्यचिकित्सक विहित नमुन्यात मंजूर करू शकेल किंवा त्याचे नूतनीकरण करू शकेल :

परंतु, त्या अल्पवयीन व्यक्तीने जेथे काम करण्याचे ठरविले असेल त्या जागेबाबत आणि ज्या निर्मितिप्रक्रियेत तिला कामावर लावण्यात येईल त्या प्रक्रियेबाबत प्रमाणन शल्यचिकित्सकाला जातीने माहिती नसेल तर, अशा जागेची तपासणी करीतोपर्यंत त्याला या पोटकलमान्वये प्रमाणपत्र मंजूर करता येणार नाही किंवा त्याचे नूतनीकरण करून देता येणार नाही.

(३) पोटकलम (२) अन्वये मंजूर करावयाचे किंवा नूतनीकरण करून द्यावयाचे स्वास्थ्य प्रमाणपत्र हे—

(क) त्यावरील तारखेपासून फक्त बारा महिन्यांच्या मुदतीपर्यंत विधिग्राह्य असेल ;

(ख) त्या अल्पवयीन व्यक्तीस ज्या कामावर लावण्यात येईल त्या कामाच्या स्वरूपासंबंधीच्या शर्तीवर किंवा बारा महिन्यांची मुदत संपण्यापूर्वी त्या अल्पवयीन व्यक्तीची पुन्हा तपासणी करावी लागेल या शर्तीवर मंजूर करता येईल.

(४) पोटकलम (२) अन्वये मंजूर केलेले किंवा नूतनीकरण करून दिलेले कोणतेही प्रमाणपत्र धारण करणारी व्यक्ती, त्यात नमूद केलेल्या पदावर काम करण्यास यापुढे लायक नाही असे प्रमाणन शल्यचिकित्सकाचे मत झाले तर, ते प्रमाणपत्र तो रद्द करील.

---

१. १९५४ चा अधिनियम २५, कलम १७ द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(५) प्रमाणन शल्यचिकित्सक एखादे प्रमाणपत्र मंजूर करण्याचे किंवा त्याचे नूतनीकरण करून देण्याचे किंवा विनंती करण्यात आल्याप्रकारचे प्रमाणपत्र देण्याचे नाकारील किंवा प्रमाणपत्र रद्द करील त्या बाबतीत जी व्यक्ती त्या प्रमाणपत्रासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करून मिळण्यासाठी अर्ज करू शकली असती अशा कोणत्याही व्यक्तीने तशी विनंती केल्यास, प्रमाणपत्र नाकारण्याबद्दलची किंवा ते रद्द करण्याबद्दलची आपली कारणे त्याला लेखी द्यावी लागतील.

(६) कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीसंबंधीचे या कलमाखालील प्रमाणपत्र पोटकलम (३) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शर्तीवर मंजूर करण्यात किंवा त्याचे नूतनीकरण करून देण्यात आले असेल त्या बाबतीत, त्या शर्तीअन्वये असेल ते खेरीजकरून एरव्ही, त्या अल्पवयीन व्यक्तीस कोणत्याही कारखान्यात काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही.

(७) या कलमाखालील प्रमाणपत्रासाठी द्यावयाची कोणतीही फी, कारखान्याच्या कार्यचालकाला भरावी लागेल आणि, ती अल्पवयीन व्यक्ती, तिचे आईवडील किंवा पालक यांजकडून ती वसूल करता येणार नाही.

**किशोरास दिलेल्या स्वास्थ्य प्रमाणपत्राचा परिणाम.** ७०. (१) ज्या किशोरास कलम ६९, पोटकलम (२) खंड (ख) अन्वये प्रौढ म्हणून कारखान्यात काम करण्यासाठी स्वास्थ्य प्रमाणपत्र देण्यात आले असेल आणि जो कारखान्यात कामावर असताना प्रमाणपत्राचे संदर्भदर्शक टोकन जवळ बाळगीत असेल असा किशोर, प्रकरण सहा व आठ यांच्या सर्व प्रयोजनांकरिता प्रौढ म्हणून समजण्यात येईल :

[१] *  *  *  *  *

[२][ (१क्) जिने वयाची सतरा वर्षे पूर्ण केलेली नाहीत परंतु ज्यांना प्रौढ व्यक्तीप्रमाणे कारखान्यात काम करण्याचे परवाना प्रमाणपत्र देण्यात आले आहे अशा, पौगंडावस्थेतील स्त्रीला किंवा पुरुषाला कोणत्याही कारखान्यात सकाळी ६ ते संध्याकाळी ७ या वेळाव्यतिरिक्त एरव्ही काम करण्यास भाग पाडण्यात येणार नाही किंवा परवानगी देण्यात येणार नाही :

परंतु, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही कारखान्याच्या संबंधात किंवा कोणत्याही गटाच्या किंवा वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांच्या संबंधात,—

(एक) या पोटकलमामध्ये यासाठी निर्धारित केलेली मर्यादा कमी अधिक करू शकेल तथापि, अशा कलमामुळे पौगंडावस्थेतील कोणत्याही स्त्रीस रात्री १० ते सकाळी ५ या दरम्यान नोकरीस लावण्याचा प्राधिकार प्राप्त होणार नाही ;

(दोन) जेथे राष्ट्रीय हितसंबंध गुंतलेले आहेत अशा आणीबाणीच्या प्रसंगी या पोटकलमाच्या उपबंधापासून सूट देऊ शकेल.]

(२) ज्या किशोरास पूर्वोक्त खंड (ख) अन्वये कारखान्यात प्रौढ म्हणून काम करण्यासाठी स्वास्थ्य प्रमाणपत्र देण्यात आले नसेल अशा किशोरास, त्याचे वय काहीही असले तरी, या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी बालक म्हणून समजण्यात येईल.

**बालकांसाठी कामाचे तास.** ७१. (१) कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात—

(क) कोणत्याही दिवशी साडेचार तासांपेक्षा अधिक वेळ ;

[३][ (ख) रात्री,

कामावर लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही.

*स्पष्टीकरण.*—या पोटकलमाच्या प्रयोजनाकरिता "रात्र" याचा अर्थ, रात्री १० ते सकाळी ६ च्या दरम्यानचे कालांतर धरून कमीत कमी लागोपाठ बारा तासांचा कालावधी, असा होईल.]

(२) कारखान्यात कामावर लावलेल्या सर्व बालकांच्या कामाचा अवधी दोन पाळयांइतका मर्यादित राहील आणि अशा पाळया परस्परव्यापी नसतील किंवा त्यांचा प्रत्येकी पाच तासांपेक्षा अधिक विस्तार नसेल, आणि प्रत्येक बालकास एकाच टप्पागटात कामावर लावण्यात येईल व तो टप्पागट मुख्य निरीक्षकाच्या लेखी पूर्वपरवानगीखेरीज तीस दिवसांच्या कालावधीत एकापेक्षा अधिक वेळा बदलता येणार नाही.

(३) कलम ५२ चे उपबंध हे, कामगार बालकांनासुद्धा लागू असतील, आणि त्या कलमाच्या उपबंधापासून कोणत्याही बालकाच्या बाबतीत कोणतीही सूट देता येणार नाही.

(४) ज्या कोणत्याही दिवशी एखादे बालक एखाद्या कारखान्यात आधीच काम करीत असेल त्या दिवशी इतर कोणत्याही कारखान्यात त्या बालकास काम करावयास लावता येणार नाही किंवा तशी मुभा देता येणार नाही.

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम २२ द्वारे, वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे, समाविष्ट करण्यात आले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. १९५४ चा अधिनियम २५, कलम १९ द्वारे, खंड (ख) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[१][(५) कोणत्याही बालिकेस कोणत्याही कारखान्यात सकाळी ८ ते संध्याकाळी ७ या व्यतिरिक्त एरव्ही काम करण्यास भाग पाडण्यात येणार नाही किंवा परवानगी देण्यात येणार नाही.]

**बालकांकरिता कामाच्या अवधीं-बाबतची नोटीस.**

७२. (१) ज्या कारखान्यात बालकांना कामावर लावण्यात आले असेल अशा प्रत्येक कारखान्यात, प्रत्येक दिवशी कोणकोणत्या अवधीत बालकांना काम करावे लागेल किंवा त्यांना तशी मुभा देण्यात येईल ते स्पष्टपणे दर्शवणारी, कामगार बालकांच्या कामाच्या अवधींबाबतची नोटीस कलम १०८, पोट-कलम (२) च्या उपबंधानुसार लावावी लागेल व ती बिनचूक ठेवावी लागेल.

(२) पोटकलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या नोटिशीत दर्शवावयाचे अवधी कलम ६१ मध्ये प्रौढ कामगारांसाठी ठरवून दिलेल्या रीतीने आगाऊ निश्चित करावे लागतील आणि त्या अवधीत बालकांना काम करावे लागल्यास, तशा कामामुळे कलम ७१ च्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण होणार नाही अशा प्रकारचे ते असावे लागतील.

(३) कलम ६१ ची पोटकलमे (८), (९) व (१०) यांचे उपबंध, या कलमाच्या पोटकलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या नोटिशीलासुद्धा लागू असतील.

**कामगार बालकांची नोंदवही.**

७३. (१) ज्या कारखान्यात बालकांना कामावर लावण्यात आलेले असेल अशा प्रत्येक कारखान्याच्या कामगार व्यवस्थापकाला कामगार बालकांची एक नोंदवही राखावी लागेल व ती कामाच्या वेळात किंवा कारखान्यात कोणतेही काम चालू असेल तेव्हा सर्व वेळी निरीक्षकास केव्हाही उपलब्ध झाली पाहिजे आणि तीत पुढील गोष्टी दर्शविल्या पाहिजेत :—

(क) कारखान्यातील प्रत्येक कामगार बालकाचे नाव ;

(ख) त्याच्या कामाचे स्वरूप ;

(ग) त्याचा समावेश असेल असा कोणताही गट असल्यास तो गट ;

(घ) त्याचा गट पाळीपद्धतीने काम करीत असेल तेव्हा, त्यास नेमून देण्यात आलेला टप्पागट ; व

(ङ) कलम ६९ अन्वये त्यास मंजूर करण्यात आलेल्या स्वास्थ्य प्रमाणपत्राचा क्रमांक.

[२][(१क) कोणत्याही कामगार बालकाच्या नावाची व इतर तपशिलाची नोंद कामगार बालकांच्या नोंदवहीत केल्याखेरीज त्याला कोणत्याही कारखान्यात काम करावयास लावता येणार नाही किंवा काम करण्याची मुभा देता येणार नाही.]

(२) राज्य शासनास, कामगार बालकांच्या नोंदवहीचा नमुना, ती कशा रीतीने ठेवण्यात आली पाहिजे ती रीत व किती मुदतीपर्यंत ती जपून ठेवली पाहिजे ती मुदत या गोष्टी विहित करता येतील.

**कामाचे तास कलम ७२ खालील नोटीस व कलम ७३ खालील नोंदवही या दोहोंशी जुळते असणे.**

७४. कोणत्याही कारखान्यात कोणत्याही बालकास, बालकांसाठी कामाच्या अवधींसंबंधी त्या कारखान्यात लावलेली नोटीस व कारखान्यातील कामगार बालकांच्या नोंदवहीत त्याच्या नावासमोर आगाऊ करण्यात आलेल्या नोंदी यास अनुसरून असेल ते खेरीजकरून एरव्ही, कामावर लावता येणार नाही.

**वैद्यकीय तपासणी करून घेण्यास फर्मावण्याचा अधिकार.**

७५. (क) स्वास्थ्य प्रमाणपत्राशिवाय कारखान्यात काम करणारी एखादी व्यक्ती अल्पवयीन आहे ; किंवा

(ख) स्वास्थ्य प्रमाणासह कारखान्यात काम करणारी अल्पवयीन व्यक्ती त्यात नमूद केलेल्या प्रकारचे काम करण्यास यापुढे लायक नाही ;

असे निरीक्षकाचे मत असेल त्या बाबतीत, तो कारखान्याच्या व्यवस्थापकावर नोटीस बजावून त्या नोटिशीत, अशा व्यक्तीची किंवा, प्रकरणपरत्वे अल्पवयीन व्यक्तीची प्रमाणन शल्यचिकित्सकाकडून तपासणी करण्यास फर्मावू शकेल आणि अशा व्यक्तीस किंवा अल्पवयीन व्यक्तीस, निरीक्षकाने तसा निदेश दिला तर, त्या व्यक्तीची तशी तपासणी होईपर्यंत आणि कलम ६९ अन्वये स्वास्थ्य प्रमाणपत्र किंवा प्रकरणपरत्वे, नवीन स्वास्थ्य प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईपर्यंत किंवा तिची तपासणी करणाऱ्या प्रमाणन शल्यचिकित्सकाकडून ती व्यक्ती अल्पवयीन नसल्याचे प्रमाणित करण्यात येईल, कोणत्याही कारखान्यात कामावर लावता येणार नाही अथवा तशी परवानगी देता येणार नाही.

**नियम करण्याचा अधिकार.**

७६. राज्य शासनास पुढील प्रकारचे नियम करता येतील :—

(क) कलम ६९ अन्वये मंजूर करावयाच्या स्वास्थ्य प्रमाणपत्राचे नमुने विहित करणारी, मूळ प्रमाणपत्रे गहाळ झाल्यास त्यांची दुसरी प्रत देण्याची तरतूद करणारे आणि अशा प्रमाणपत्रांसाठी व त्यांचे नूतनीकरण करून देण्यासाठी व त्यांच्या अशा दुसऱ्या प्रतींसाठी आकारावयाची फी ठरविणारे ;

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम २३ द्वारे, समाविष्ट करण्यात आले (दिनांक १ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम २५, कलम ३० द्वारे, पोटकलम (१) समाविष्ट करण्यात आले.

(ख्) कारखान्यात काम करणारी बालके व किशोर यांनी प्राप्त करावयाची शारीरिक प्रमाणपातळी विहित करणारे ;

(ग्) ह्या प्रकरणान्वये प्रमाणन शल्यचिकित्सकांच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणारे ;

(घ्) कारखान्यात तरुण व्यक्तींस कामावर लावण्याच्या संबंधात प्रमाणन शल्यचिकित्सकांनी जी इतर कामे करणे आवश्यक आहे ती कामे विनिर्दिष्ट करणारे आणि अशा कामांबद्दल आकारावयाची फी व ती कोणत्या व्यक्तींनी भरावयाची ते ठरविणारे.

**विधीच्या इतर विवक्षित उपबंधांना आडकाठी नाही.** ७७. या प्रकरणाचे उपबंध बालक सेवायोजन अधिनियम, १९३८ याच्या उपबंधांच्या व्यतिरिक्त असतील, त्यांस न्यूनकारी असणार नाहीत. **सन १९३८ चा २६.**

[1][प्रकरण आठ

**वार्षिक सवेतन रजा**

**प्रकरणाची प्रयुक्ती.** ७८. (१) इतर कोणत्याही विधिन्वये किंवा कोणताही लवाद-निवाडा, [2][कोणत्याही (समझोता-सुद्धा) करार] किंवा सेवा-संविदा यांच्या तरतुदींअन्वये, कामगाराला जो कोणताही हक्क मिळाला असेल त्यास बाध येईल अशा रीतीने या प्रकरणाचे उपबंध अंमलात येणार नाहीत :

[3][परंतु, जर असा लवाद-निवाडा, (समझोतासुद्धा) करार किंवा सेवा-संविदा यामध्ये या प्रकरणात उपबंधित केलेल्या वार्षिक सवेतन रजेपेक्षा अधिक मुदतीच्या वार्षिक सवेतन रजेची तरतूद असेल तर, कामगार ज्या रजेला हक्कदार असेल तिचे ठरीव प्रमाण असा लवाद-निवाडा, करार किंवा सेवा-संविदा यास अनुसरून असेल, परंतु असा लवाद-निवाडा, करार किंवा सेवा-संविदा यामध्ये ज्यांसाठी तरतूद नाही अशा बाबींच्या संबंधात किंवा त्यामध्ये कमी अनुकूल अशी तरतूद असलेल्या बाबींच्या संबंधात कलमे ७९ ते ८२ यांचे उपबंध, शक्य असेल, तेथवर कामगारास लागू होतील.]

(२) शासनाने चालवलेल्या कोणत्याही रेल्वेच्या [4][कोणत्याही कारखान्यातील] ज्या कामगारांना केंद्र शासनाने मान्य केलेले रजेसंबंधीचे नियम लागू असतील त्या कामगारांना ह्या प्रकरणाचे उपबंध लागू असणार नाहीत.

**वार्षिक सवेतन रजा.** ७९. (१) ज्याने एका कॅलेंडर वर्षामध्ये कारखान्यात २४० दिवस किंवा त्याहून जास्त काळ काम केले असेल अशा प्रत्येक कामगारास—

(एक) जर तो प्रौढ असेल तर, पूर्वीच्या कॅलेंडर वर्षात त्याने काम केलेल्या प्रत्येक वीस दिवसांमागे एक दिवस,

(दोन) जर तो बालक असेल तर, पूर्वीच्या कॅलेंडर वर्षात त्याने काम केलेल्या प्रत्येक पंधरा दिवसांमागे एक दिवस,

या दराने परिगणित करून येतील इतक्या दिवसांची सवेतन रजा नंतरच्या कॅलेंडर वर्षात अनुज्ञेय असेल.

स्पष्टीकरण १.—या पोटकलमाच्या प्रयोजनाकरिता,

(क्) करार किंवा संविदा यानुसार किंवा स्थायी आदेशांन्वये अनुज्ञेय असल्याप्रमाणे अपरिहार्य कामबंदीचे कोणतेही दिवस,

(ख्) स्त्री कामगारांच्या बाबतीत, बारा आठवड्यांपेक्षा अधिक नसतील इतके प्रसूतिरजेचे दिवस, व

(ग्) ज्या वर्षी रजा घेतली असेल त्याच्या पूर्वीच्या वर्षात अर्जित केलेले रजेचे दिवस,

हे २४० दिवसांच्या किंवा त्याहून अधिक दिवसांच्या मुदतीची संगणना करण्याच्या प्रयोजनाकरिता, त्या कामगाराने कारखान्यात काम केलेले दिवस आहेत असे समजण्यात येईल, परंतु ह्या दिवसांबद्दल त्याला रजा अर्जित होणार नाही.

स्पष्टीकरण २.—या पोटकलमान्वये अनुज्ञेय असलेली रजा ही रजेच्या मुदतीत येणाऱ्या किंवा तिच्या सुरुवातीस अथवा शेवटी येणाऱ्या सर्व सुट्या वगळून असेल.

---

१. १९५४ चा अधिनियम २५, कलम २० द्वारे, मूळ प्रकरण आठऐवजी हे प्रकरण दाखल करण्यात आले.

२. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ३१ (क्) (एक) द्वारे, "करार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३१ (क्) (दोन) द्वारे, मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३१ (ख्) द्वारे, "कोणत्याही कर्मशाळेतील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) ज्या कामगाराची नोकरी जानेवारीच्या पहिल्या तारखेखेरीज इतर दिवशी सुरू झाली असेल त्यास, पोटकलम (१) चा खंड (एक) किंवा प्रकरणपरत्वे, खंड (दोन) यामध्ये दिलेल्या दराने सवेतन रजा मिळण्याचा हक्क असेल—मात्र त्याने उर्वरित कॅलेंडर वर्षातील एकूण दिवसांपैकी दोन-तृतीयांश इतके दिवस काम केलेले असले पाहिजे.

[1][(३) जर कॅलेंडर वर्ष चालू असताना एखाद्या कामगारास कार्यमुक्त किंवा बडतर्फ करण्यात आले किंवा त्याने आपली नोकरी सोडून दिली किंवा सेवेत असताना त्याला वयनिवृत्त करण्यात आले अथवा त्याचा मृत्यू झाला तर, त्या कामगाराची कार्यमुक्ती, बडतर्फी, नोकरी सोडून देणे, वयनिवृत्ती किंवा मृत्यू याच्या लगतपूर्वी तो ज्या ठरीव प्रमाणातील रजेस हक्कदार होता त्याऐवजी पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने परिगणित केलेले वेतन मिळण्याचा त्याला किंवा त्याच्या वारसदाराला किंवा प्रकरणपरत्वे, नामनिर्दिष्ट व्यक्तीला हक्क असेल मग, त्या कामगाराला अशा रजेचा लाभ घेण्यास पात्र ठरवणाऱ्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संपूर्ण कालावधीमध्ये त्याने काम केलेले नसले तरी चालेल आणि असे प्रदान हे,

(एक) कामगारास कार्यमुक्त किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा तो आपली नोकरी सोडून गेला असेल त्या बाबतीत, अशा कार्यमुक्तीच्या, बडतर्फीच्या किंवा नोकरी सोडून जाण्याच्या दिवसानंतर दुसरा कामाचा दिवस उलटून जाण्याच्या आत ; आणि

(दोन) कामगार सेवेत असताना वयनिवृत्त झाला असेल किंवा मरण पावला असेल त्या बाबतीत, अशा वयनिवृत्तीच्या किंवा मृत्यूच्या दिनांकापासून दोन महिने उलटून जाण्याच्या आत; करण्यात येईल.]

(४) या कलमान्वये रजेची परिगणना करताना, अर्ध्या दिवसाची रजा किंवा त्याहून मोठी अपूर्णांश रजा म्हणजे रजेचा एक संपूर्ण दिवस म्हणून गणला जाईल व अर्ध्या दिवसाहून कमी अपूर्णांश वगळण्यात येईल.

(५) जर एखाद्या कामगाराने कोणत्याही एका कॅलेंडर वर्षात, पोटकलम (१) किंवा प्रकरणपरत्वे, पोटकलम (२) अन्वये त्यास अनुज्ञेय असलेली संपूर्ण रजा घेतली नाही तर, त्याने न घेतलेली कोणतीही रजा, नंतरच्या कॅलेंडर वर्षात त्यास अनुज्ञेय होणाऱ्या रजेमध्ये मिळविण्यात येईल :

परंतु, पुढील वर्षात जमेस धरावयाच्या रजेच्या दिवसांची एकूण संख्या, प्रौढ व्यक्तीच्या बाबतीत तीसपेक्षा अधिक असता कामा नये आणि बालकाच्या बाबतीत ती चाळीसपेक्षा अधिक असता कामा नये :

परंतु आणखी असे की, ज्या कामगाराने सवेतन रजेकरिता अर्ज केला असेल, पण ज्यास पोटकलमे (८) व (९) यांत दिलेल्या कोणत्याही योजनेनुसार [2][किंवा पोटकलम (१०) चे उल्लंघन करून] अशी रजा देण्यात आली नसेल त्या कामगारास, त्यास [3][नाकारण्यात आलेली] रजा पुढे जमेस धरण्यास हक्क राहील, आणि त्याबाबतीत कोणतीही मर्यादा असणार नाही.

(६) एखाद्या कामगारास, ज्या तारखेस आपली रजा सुरू व्हावी अशी त्याची इच्छा असेल त्या तारखेच्या किमान पंधरा दिवस अगोदर त्यास कॅलेंडर वर्षात अनुज्ञेय असलेली सर्व रजा किंवा त्यापैकी कोणतीही आंशिक रजा घेण्यासाठी, कोणत्याही वेळी कारखान्याच्या व्यवस्थापकाकडे लेखी अर्ज करता येईल :

१९४७ चा १४. परंतु, जर कामगार हा औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, कलम २, खंड (ढ) यात व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक उपयुक्ततेच्या सेवेत काम करीत असेल तर, ज्या तारखेस रजा सुरू व्हावी अशी त्याची इच्छा असेल त्या तारखेच्या किमान तीस दिवस अगोदर असा अर्ज करावा लागेल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही वर्षात तीनाहून अधिक वेळा रजा घेता येणार नाही.

(७) जर एखाद्या कामगाराची त्यास देय असलेली सवेतन रजा आजारपणासाठी घेण्याची इच्छा असेल तर, जरी त्याने पोटकलम (६) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत रजेचा अर्ज केलेला नसला तरी, त्यास अशी रजा द्यावी लागेल आणि अशा बाबतीत, कलम ८१ अन्वये अनुज्ञेय असलेले वेतन रजेकरिता केलेल्या अर्जाच्या तारखेपासून उशिरात उशिरा तिसाव्या दिवशी, द्यावे लागेल.

(८) कारखान्यात काम सतत चालू राहील अशी खात्रीशीर व्यवस्था करण्यासाठी कारखान्याचा
१९४७ चा १४. कार्यचालक किंवा व्यवस्थापक यास कारखान्याच्या औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, कलम ३ अन्वये प्रस्थापित केलेल्या कामगार कार्य समितीच्या किंवा इतर कोणत्याही अधिनियमान्वये प्रस्थापित केलेल्या तत्सम समितीच्या सहमतीने किंवा कारखान्यात अशी कोणतीही कामगार कार्य समिती किंवा तत्सम समिती नसेल तर, विहित रीतीने निवडलेल्या तेथील कामगार प्रतिनिधींच्या सहमतीने, ज्याद्वारे या कलमाखालील अनुज्ञेय रजा देण्याबाबत विनियमन करता येईल अशी योजना मुख्य निरीक्षकाकडे लेखी सादर करता येईल.

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ३२ (क) द्वारे, मूळ पोटकलम (३) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३२ (ख) (एक) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३२ (ख) (दोन) द्वारे, "न मिळण्याजोगी रजा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(९) पोटकलम (८) अन्वये सादर केलेली योजना, कारखान्यात ठळक व सोईस्कर ठिकाणी लावावी लागेल आणि ज्या तारखेस ती अंमलात येईल त्या तारखेपासून बारा महिनेपर्यंत ती अंमलात राहील आणि त्यानंतर व्यवस्थापकास, कामगार कार्य समितीच्या किंवा तत्सम समितीच्या सहमतीने किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (८) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कामगार प्रतिनिधींच्या सहमतीने एका वेळी, पुढील बारा महिन्यांच्या मुदतीसाठी, फेरबदलानिशी किंवा त्यावाचून, तिचे नूतनीकरण करता येईल आणि तिचे नूतनीकरण करण्यापूर्वी, मुख्य निरीक्षकाकडे नूतनीकरणाबद्दलची नोटीस पाठवावी लागेल.

(१०) ज्यामुळे पोटकलम (६) च्या उपबंधांचे व्यतिक्रमण होत नसेल असा रजेचा अर्ज नाकारता येणार नाही—मात्र पोटकलमे (८) व (९) अन्वये त्या त्या काळी अंमलात असलेल्या योजनेनुसार असा नकार द्यावयाचा असेल तर ती बाब खेरीजकरून.

(११) जर, पोटकलम (१) किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (२) अन्वये रजा मिळण्याचा हक्क असलेल्या कामगारांची नोकरी, त्याची हक्काची सर्व रजा त्याने घेण्यापूर्वी कार्यचालकाने समाप्त केली तर, किंवा रजेसाठी अर्ज केला असता त्यास अशी रजा मंजूर करण्यात आली नसून रजा घेण्यापूर्वी त्याने नोकरी सोडली तर, कारखान्याचा कार्यचालक न घेतलेल्या रजेबद्दल कलम ८० अन्वये प्रदेय असलेली रक्कम त्यास देईल आणि अशी रक्कम कामगाराची नोकरी कार्यचालकाने समाप्त केली असेल त्या बाबतीत, अशा रीतीने नोकरी समाप्त केल्यानंतरचा दुसरा कामाचा दिवस संपण्यापूर्वी, आणि कामगाराने स्वत: नोकरी सोडली असेल त्या बाबतीत, नंतरच्या वेतनाच्या दिवशी किंवा त्यापूर्वी द्यावी लागेल.

(१२) कामगारास कार्य मुक्त किंवा बडतर्फ करण्यापूर्वी देणे आवश्यक असलेल्या कोणत्याही नोटिशीची मुदत मोजताना त्या कामगाराने न घेतलेली रजा विचारात घेता येणार नाही.

**रजेच्या मुदतीतील वेतन.** ८०. (१) [१][कलम ७८ किंवा प्रकरणपरत्वे, कलम ७९] अन्वये कामगारास अनुज्ञेय असलेल्या रजेबद्दल [२][तो] त्याच्या रजेच्या लगतपूर्वीच्या महिन्यात जितके दिवस [३][त्याने प्रत्यक्ष काम केले असेल] त्या दिवसांची कोणतीही अतिकालिक कमाई व बोनस वगळून, परंतु महागाई भत्ता व त्या कामगाराला अन्नधान्य आणि इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्याने मिळणाऱ्या फायद्याचे रोख सममूल्य धरून जितकी एकूण पूर्णकालिक कमाई असेल तिच्या दैनिक सरासरीइतक्या दराने [२][वेतन मिळण्यास हक्कदार असेल :]

[४][परंतु, ज्या कामगाराने त्याच्या रजेच्या लगतपूर्वीच्या कॅलेंडर महिन्यातील कोणत्याही दिवशी काम केलेले नसेल अशा कामगारांच्या बाबतीत, रजेवर जाण्यापूर्वी ज्या कॅलेंडर महिन्यात शेवटचे प्रत्यक्ष काम केलेले असेल त्या महिन्यातील प्रत्यक्ष काम केलेल्या दिवसांसाठी त्याला मिळालेल्या पूर्णकालिक एकूण कमाईच्या दैनिक सरासरीइतक्या दराने त्याला पैसे देण्यात येतील, मात्र त्यात कोणताही अतिकालिक भत्ता आणि बोनस जमेस धरण्यात येणार नाही परंतु, महागाई भत्ता व कामगारांना अन्नधान्य आणि इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्याने त्याद्वारे उपार्जित होणाऱ्या फायद्याइतकी रोख रक्कम जमेस धरली जाईल.]

(२) कामगाराला अन्नधान्य व इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे त्याला उपार्जित होणाऱ्या फायद्याचे रोख सममूल्य हे, जेव्हा-जेव्हा विहित करण्यात येईल तेव्हा तेव्हा, एका प्रमाण कुटुंबास जास्तीत जास्त जितके अन्नधान्य व इतर वस्तू अनुज्ञेय असतील तितक्या कमाल मर्यादेच्या आधारे संगणित केले जाईल.

**स्पष्टीकरण १.**—"प्रमाण कुटुंब" याचा अर्थ, कामगार, त्याचा किंवा तिचा विवाहसाथी व चौदा वर्षाखालील वयाची दोन मुले मिळून एकूण तीन प्रौढ उपभोग युनिटांचे बनलेले कुटुंब, असा होतो.

**स्पष्टीकरण २.**—"प्रौढ उपभोग युनिट" याचा अर्थ, चौदा वर्षावरील वयाच्या पुरुषास लागणारे उपभोग युनिट, असा होतो, आणि चौदा वर्षावरील वयाच्या स्त्रीसाठी आणि चौदा वर्षांखालील वयाच्या मुलासाठी लागणारे उपभोग युनिट हे प्रौढ उपभोग युनिटाच्या अनुक्रमे, ८ व ६ या दराने परिगणित केले जाईल.

(३) राज्य शासनास—

(क) कामगाराला अन्नधान्य व इतर वस्तू सवलतीच्या दराने विकल्यामुळे मिळणाऱ्या फायद्याचे रोख सममूल्य कशा रीतीने संगणित करावे ते, आणि

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ३३ (एक) द्वारे, "कलम ७९" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. १९८७ चा अधिनियम २०, कलम २४ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ३३ (दोन) द्वारे, "त्याने काम केले असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. १९८७ चा अधिनियम २०, यांच्या कलम २४ द्वारे, समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर १९८७ रोजी व तेव्हापासून).

(ख) या कलमाच्या उपबंधाचे खात्रीपूर्वक पालन होण्याच्या प्रयोजनासाठी कारखान्यामध्ये कोणत्या नोंदवह्या राखाव्या लागतील ते,

विहित करण्यासाठी नियम करता येतील.

८१. ज्या प्रौढ कामगाराला कमीत कमी चार दिवस आणि ज्या कामगार बालकाला कमीत कमी पाच दिवस इतकी रजा देण्यात आली असेल त्याला, त्याची रजा सुरू होण्यापूर्वी त्या रजेच्या मुदतीबद्दल देय असलेली वेतनाची रक्कम द्यावी लागेल. विवक्षित बाबतीत रक्कम आगाऊ देणे.

१९३६ चा ४. ८२. या प्रकरणान्वये जी रक्कम मालकाने दिली पाहिजे परंतु त्याने दिली नसेल अशी कोणतीही रक्कम वेतन प्रदान अधिनियम, १९३६ याच्या उपबंधान्वये विलंबित वेतन म्हणून वसूल करता येईल. देण्यात न आलेले वेतन वसूल करण्याची पद्धती.

८३. राज्य शासन, विहित करण्यात येईल असा तपशील असलेल्या नोंदवह्या ठेवण्याबद्दल कारखान्यांच्या व्यवस्थापकास निदेश देणारे व निरीक्षकांना तपासणी करता यावी यासाठी अशा नोंदवह्या उपलब्ध करून देण्यास फर्मावणारे नियम करू शकेल. नियम करण्याचा अधिकार.

८४. कारखान्यातील कामगारांना लागू असलेल्या रजा-नियमांत ज्या फायद्यांची तरतूद आहे ते फायदे या प्रकरणात ज्या फायद्यांची तरतूद करण्यात आलेली आहे त्या फायद्यांपेक्षा आपल्या मते कमी अनुकूल आहेत असे नाही याबद्दल राज्य शासनाचे समाधान होईल त्या बाबतीत, ते लेखी आदेशाद्वारे आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा शर्तींच्या अधीनतेने, कारखान्यास या प्रकरणाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधापासून सूट देऊ शकेल. कारखान्यांना सूट देण्याचा अधिकार.

[1][**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी कोणत्याही रजा नियमांद्वारे तरतूद केलेले फायदे हे या प्रकरणात ज्या फायद्यांची तरतूद करण्यात आलेली आहे त्या फायद्यांपेक्षा कमी अनुकूल आहेत किंवा कसे हे ठरवताना एकंदर फायदे विचारात घ्यावे लागतील.]].

## प्रकरण नऊ

## विशेष उपबंध

८५. (१) राज्य शासनास शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून असे जाहीर करता येईल की, या अधिनियमाचे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही उपबंध, ज्या जागेत शक्तीच्या सहाय्याने किंवा त्याशिवाय निर्मिती प्रक्रिया चालवली जात असेल किंवा सामान्यतः चालवली जाते अशा कोणत्याही जागेस लागू होतील, मग— विवक्षित परिवास्तुना अधिनियम लागू करण्याचा अधिकार.

(एक) ते काम शक्तीच्या सहाय्याने करण्यात येत असल्यास त्यात कामावर लावलेल्या व्यक्तींची संख्या दहापेक्षा कमी असली व ते काम शक्तीच्या सहाय्यावाचून करण्यात येत असल्यास ही संख्या विसाहून कमी असली; किंवा

(दोन) त्याठिकाणी काम करणाऱ्या व्यक्तींना तेथील मालकाने नोकरीवर ठेवलेले नाही, पण अशा मालकाच्या परवानगीने किंवा त्याच्याशी करार करून त्या काम करीत आहेत असे असले तरी हरकत नाही :

परंतु, निर्मिति प्रक्रिया मालकाने फक्त आपल्या कुटुंबियांच्याच सहाय्याने चालवलेली नसली पाहिजे.

(२) अशा रीतीने जागा जाहीर करण्यात आल्यानंतर, ती या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कारखाना म्हणून समजण्यात येईल आणि मालक हा कार्यचालक म्हणून व त्यात काम करणारी कोणतीही व्यक्ती कामगार म्हणून समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी "मालक" या संज्ञेत, परिवास्तू ज्याच्या ताब्यात आहे असा पट्टेदार किंवा गहाणधारक यांचा समावेश होईल.

८६. जेथे निर्मितिप्रक्रिया चालवण्यात येत असून जी शिक्षण, [2][प्रशिक्षण देण्याच्या, संशोधन] किंवा सुधारणा करण्याच्या प्रयोजनांसाठी चालविण्यात येत असलेल्या सार्वजनिक संस्थेला संलग्न असेल अशा कोणत्याही कार्यशाळेस किंवा कामाच्या जागेस राज्य शासन त्यास आवश्यक वाटतील अशा शर्तींवर ह्या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांपासून सूट देऊ शकेल : सार्वजनिक संस्थांना सूट देण्याचा अधिकार.

परंतु, संस्थेवर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्तींनी, संस्थेत कामावर लावलेल्या किंवा संस्थेत जाणाऱ्या किंवा संस्थावासी व्यक्तींच्या कामाचे तास, भोजनाची मध्यंतरे व सुटचा यांचे विनियमन करण्यासंबंधीची योजना राज्य शासनास मंजुरीसाठी सादर केली असून, योजनेतील उपबंध या अधिनियमाच्या तत्सम

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ३४ द्वारे, स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३५ द्वारे, "प्रशिक्षण देण्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

उपबंधापेक्षा कमी अनुकूल नाहीत अशी राज्य शासनाची खात्री झाल्याखेरीज कामाचे तास व सुटचा यासंबंधीच्या उपबंधापासून कोणतीही सूट दिली जाणार नाही.

धोक्याची कामे.

८७. एखाद्या कारखान्यात करण्यात येणाऱ्या कोणत्याही [1][निर्मितिप्रक्रियेमुळे किंवा कामामुळे] त्या कामावर लावलेल्या कोणत्याही व्यक्तींना शारीरिक इजा, विषबाधा किंवा रोग होण्याचा गंभीर धोका आहे असे राज्य शासनाचे मत झाले तर, राज्य शासनास ज्या कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या कारखान्यांत अशा [2][निर्मितिप्रक्रिया किंवा काम] चालू असेल त्यास लागू होणारे पुढील प्रकारचे नियम करता येतील :—

(क) अशी [2][निर्मितिप्रक्रिया किंवा काम] विनिर्दिष्ट करून ते धोक्याचे म्हणून जाहीर करणारे ;

(ख) अशी [2][निर्मितिप्रक्रिया किंवा काम] करण्यास स्त्रिया, किशोर किंवा बालके यांना कामावर लावण्यास मनाई करणारे किंवा त्यावर निर्बंध घालणारे ;

(ग) अशी [2][निर्मितिप्रक्रिया किंवा काम] करण्यासाठी कामावर लावलेल्या किंवा लावले जावे म्हणून प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींच्या नियतकालिक वैद्यकीय तपासणीचा उपबंध करणारे आणि अशा कामावर नेमल्या जाण्यास लायक म्हणून ज्यांना प्रमाणित करण्यात आले नसेल अशा व्यक्तींना कामावर नेमण्यास प्रतिबंध करणारे, [3][आणि कारखान्याच्या कार्यचालकाने अशा वैद्यकीय तपासणीची फी भरावी असे फर्मावणारे];

(घ) अशी [2][निर्मितिप्रक्रिया किंवा काम] करण्यासाठी नेमलेल्या किंवा अशी [2][निर्मिति-प्रक्रिया किंवा काम] चालू असेल अशा ठिकाणांच्या जवळपास कामावर लावलेल्या सर्व व्यक्तींचे संरक्षण करण्यासाठी उपबंध करणारे;

(ङ) अशा [4][निर्मितिप्रक्रियेच्या किंवा कामाच्या] संबंधात कोणतेही विनिर्दिष्ट साहित्य उपयोगात आणण्यास अथवा तशा प्रक्रिया अनुसरण्यास मनाई करणारे, त्यांवर निर्बंध घालणारे किंवा त्यांचे नियंत्रण करणारे;

[5][(च) निर्मितिप्रक्रियेचे किंवा कामाचे धोकादायक स्वरूप विचारात घेऊन कल्याण-विषयक जादा सुविधांची व स्वच्छताविषयक जादा सोयींची तरतूद करण्यात व संरक्षक साधन-सामग्री व कपडे पुरवण्यास फर्मावणारे व त्यासंबंधीची मानके नमूद करणारे;]

[6]* * * *

गंभीर धोक्यामुळे कामावर लावण्यास प्रतिबंध करण्याची शक्ती.

[7][८७क.(१) निरीक्षकाला जेव्हा असे आढळून येईल की, कारखान्यातील किंवा त्याच्या भागातील परिस्थिती अशी आहे की, जी मुळे तेथे कामावर लावलेल्या व्यक्तींना किंवा जवळपास राहणाऱ्या जनतेला इजा पोचण्याचा किंवा मृत्यू येण्याचा गंभीर धोका आहे, तेव्हा त्याबाबतीत तो, कारखान्याच्या कार्य-चालकास लेखी आदेशाद्वारे ज्या तपशिलाच्या बाबतीत कारखाना किंवा त्याचा भाग हा अशा गंभीर धोक्याचे कारण आहे, असे त्यास वाटत असेल, तो तपशील कळवू शकेल आणि धोका नष्ट केला जाई-तोपर्यंत किमान काम पार पाडण्यासाठी आवश्यक असतील इतक्या किमान व्यक्ती वगळता, कोणाही व्यक्तीस कारखान्यात किंवा त्याच्या भागात, कामावर लावण्यास कार्यचालकास प्रतिबंध करू शकेल.

(२) निरीक्षकाने पोटकलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाचा प्रभाव हा मुख्य निरीक्षक नंतर आदेशाद्वारे वाढवील अशा तीन दिवसांच्या मुदतीपर्यंत असेल.

(३) निरीक्षकाच्या पोटकलम (१) खालील आणि मुख्य निरीक्षकाच्या पोटकलम (२) खालील आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला उच्च न्यायालयात अपील करण्याचा अधिकार राहील.

(४) जिच्या नोकरीवर पोटकलम (१) अन्वये काढलेल्या आदेशामुळे परिणाम झाला आहे, अशी कोणतीही व्यक्ती, वेतन व अन्य लाभ मिळण्यास हक्कदार असेल आणि जेव्हा शक्य असेल तेव्हा आणि विहित रीतीनुसार त्या व्यक्तीला पर्यायी काम देणे, हे कार्यचालकाचे कर्तव्य असेल.

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ३६ द्वारे "कामामुळे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३६ (क) द्वारे, "काम" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेर-फारांसह जिथे जिथे आला असेल तिथे तिथे त्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३६(ख) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमांच्या याच्या कलम ३६(क) द्वारे, "काम" हा शब्द त्याच्या व्याकरणिक भेदांसह जिथे जिथे आला असेल तिथे तिथे त्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३६ (ग) द्वारे, खंड (ङ) नंतर हे खंड समाविष्ट करण्यात आले.

६. १९८७ चा अधिनियम २०, कलम २५ द्वारे, वगळण्यात आला (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम २६ द्वारे, समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी तेव्हापासून).

(५) पोटकलम (४) च्या उपबंधामुळे औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ खालील पक्षकारांच्या अधिकारास हानी पोचणार नाही.]

८८. [१][(१)] एखाद्या कारखान्यात एखादा अपघात होऊन त्यामुळे मृत्यू घडला असेल, किंवा इजा झालेली व्यक्ती अपघाताच्या लगतनंतर अठ्ठेचाळीस तास किंवा त्यापेक्षा अधिक वेळपर्यंत आपले काम करण्यास जीमुळे असमर्थ होईल अशी कोणतीही शारीरिक इजा तिला झाली असेल किंवा या बाबतीत विहित करण्यात येईल अशा कोणत्याही स्वरूपाचा अपघात झाला असेल तर, कारखान्याच्या व्यवस्थापकाला अशा अपघाताची नोटीस, विहित करण्यात येतील अशा प्राधिकरणाकडे, आणि अशा नमुन्यात व अशा मुदतीत पाठवावी लागेल. विवक्षित अपघातांबाबत नोटीस.

[२][(२) पोटकलम (१) खाली देण्यात आलेली नोटीस मृत्यूस कारणीभूत झालेल्या अपघाताशी संबंधित असेल त्या बाबतीत, अशी नोटीस ज्याला पाठवण्यात आली असेल ते प्राधिकरण नोटीस मिळाल्या-पासून एका महिन्याच्या आत अपघाताच्या घटनेची चौकशी करील किंवा असे प्राधिकरण म्हणजे निरीक्षक नसेल तर ते निरीक्षकास उक्त मुदतीच्या आत चौकशी करावयास लावील.

(३) राज्य शासनाला या कलमाखालील चौकशीच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणारे नियम करता येतील.]

[३][८८क. एखाद्या कारखान्यामध्ये, विहित करण्यात येईल अशा स्वरूपाची कोणतीही धोकादायक घटना घडेल त्या बाबतीत--मग अशा घटनेमुळे कोणतीही शारीरिक इजा झालेली असो वा नसो किंवा नि:समर्थता आलेली असो वा नसो--कारखान्याचा व्यवस्थापक त्याबद्दलची नोटीस विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणांना आणि अशा नमुन्यात व अशा मुदतीत पाठवील.] विवक्षित धोकादायक घटनांची नोटीस.

८९. (१) कारखान्यातील कोणत्याही कामगारास [४][तिसऱ्या अनुसूचीत] विनिर्दिष्ट केलेला कोण-ताही रोग जडला तर, त्या कारखान्याच्या व्यवस्थापकाला त्याबद्दलची नोटीस विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडे आणि अशा नमुन्यात व अशा मुदतीत पाठवावी लागेल. विवक्षित रोगांबाबत नोटीस.

(२) जी व्यक्ती एखाद्या कारखान्यात कामावर लावलेली आहे किंवा होती अशा व्यक्तीवर कोणताही वैद्यकव्यवसायी औषधोपचार करीत असेल आणि [४][तिसऱ्या अनुसूचीत] विनिर्दिष्ट केलेला कोणताही रोग त्या व्यक्तीला झालेला असेल किंवा झाला आहे असे वैद्यकव्यवसायीस वाटत असेल तर, त्या वैद्यकव्यवसायीला विलंब न लावता पुढील गोष्टी नमूद केलेला लेखी अहवाल मुख्य निरीक्षकाकडे पाठवावा लागेल :--

(क) रोग्याचे नाव व त्याचा डाक पत्ता;

(ख) रोग्याला जो रोग झाला आहे असे त्यास वाटत असेल त्या रोगाचे नाव; व

(ग) जेथे रोगी कामगार असेल किंवा लगतपूर्वी कामाला होता त्या कारखान्याचे नाव व पत्ता.

(३) उक्त व्यक्तीला [४][तिसऱ्या अनुसूचीत] विनिर्दिष्ट केलेला रोग झाला आहे याबद्दल प्रमाणन शल्य-चिकित्सकाने दिलेल्या प्रमाणपत्रावरून किंवा अन्यथा मुख्य निरीक्षकाची खात्री होईल अशा रीतीने पोटकलम (२) खालील अहवालास पुष्टी मिळाली असेल त्याबाबतीत, त्या व्यक्तीला विहित करण्यात येईल अशी फी वैद्यकव्यवसायीकडे भरावी लागेल, आणि अशा रीतीने भरलेली फीची रक्कम, ज्या कारखान्यात असताना व्यक्तीस रोग झाला असेल त्या कारखान्याच्या कार्यचालकाकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येण्यासारखी असेल.

(४) जर पोटकलम (२) च्या उपबंधांचे पालन करण्यात एखादा वैद्यकव्यवसायी कसूर करील तर, तो [५][एक हजार रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ३७ द्वारे, मुख्य अधिनियमाचे कलम ८८ याला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे, अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोटकलम (१) नंतर ही पोटकलमे समाविष्ट करण्यात आली.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३८ द्वारे, हे कलम समाविष्ट करण्यात आले.

४. १९८७ चा अधिनियम २०, कलम २७ द्वारे, मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम २७ द्वारे, मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[1][ (५) केंद्र शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तिसऱ्या अनुसूचीत भर घालता येईल किंवा फेरफार करता येतील आणि अशी कोणतीही भर किंवा फेरफार हे जणू काही या अधिनियमाद्वारे करण्यात आले असल्याप्रमाणे परिणामक होतील.]

अपघाताच्या किंवा रोगाच्या प्रकरणांची चौकशी करण्याबद्दल निदेश देण्याचा अधिकार.

९०. (१) राज्य शासनास, तसे करणे इष्ट वाटल्यास, एखाद्या कारखान्यात झालेल्या कोणत्याही अपघाताच्या कारणांची किंवा [2][तिसऱ्या अनुसूचीत] विनिर्दिष्ट केलेला रोग कारखान्यात असताना जडला आहे अथवा जडला असल्याचा संशय असेल अशा कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सक्षम व्यक्ती नियुक्त करता येईल आणि त्यास अशा चौकशीच्या वेळी न्यायसहायक म्हणून काम करण्यासाठी विधीचे किंवा विशेष ज्ञान असलेली एक किंवा अशा अधिक व्यक्ती नियुक्त करता येतील.

(२) या कलमान्वये चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीस, साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडण्याच्या आणि दस्तऐवज व महत्वाच्या वस्तू दाखल करण्याची सक्ती करण्याच्या प्रयोजनांसाठी, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ या अन्वये दिवाणी न्यायालयास असलेले सर्व अधिकार असतील आणि १९०८ चा ५. तसेच, चौकशीच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असेल तेथवर या अधिनियमाखाली निरीक्षकाला असलेल्यांपैकी कोणत्याही अधिकाराचा वापर त्या व्यक्तीला करता येईल, आणि चौकशी करणारी व्यक्ती कोणतीही माहिती हजर करण्याविषयी ज्या ज्या व्यक्तीला फर्मावील ती प्रत्येक व्यक्ती भारतीय दंड संहिता १८६० चा ४५. यांच्या कलम १७६ च्या अर्थानुसार तसे करण्यास कायदेशीरपणे बांधलेले आहे असे समजले जाईल.

(३) या कलमान्वये चौकशी करणाऱ्या व्यक्तीला, अपघाताची किंवा, प्रकरणपरत्वे, रोगाची कारणे आणि कोणतीही सहवर्ती परिस्थिती नमूद करुन व स्वतःस किंवा कोणत्याही न्यायसहायकास जे अभिप्राय देणे योग्य वाटेल असे अभिप्राय जोडून एक अहवाल राज्य शासनाकडे पाठवावा लागेल.

(४) या कलमान्वये दिलेला कोणताही अहवाल किंवा त्यातील कोणतेही उतारे राज्य शासनास, स्वतःला योग्य वाटल्यास प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करता येईल.

(५) या कलमाखालील चौकशीच्या कामकाजाचे विनियमन करण्यासाठी राज्य शासनाला नियम करता येतील.

नमुने घेण्याचा अधिकार.

९१. (१) निरीक्षक हा कारखान्याच्या नेहमीच्या कामाच्या वेळेच्या दरम्यान केव्हाही, कारखान्याचा कार्यचालक किंवा व्यवस्थापक किंवा त्यावेळी कारखाना ज्या व्यक्तीच्या हुकमतीखाली आहे असे दिसत असेल अशा अन्य व्यक्तीस सूचना दिल्यानंतर, कारखान्यात उपयोग करण्यात येत असलेल्या किंवा उपयोग करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही पदार्थाचा पुरेसा नमुना यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने घेऊ शकेल ; मात्र अशा उपयोगामुळे,

(क) या अधिनियमाच्या अथवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधाचे व्यतिक्रमण होत आहे अशी निरीक्षकाची समजूत असली पाहिजे, किंवा

(ख) कारखान्यातील कामगारास शारीरिक इजा होण्याचा किंवा त्याच्या आरोग्यास अपाय होण्यास संभव आहे असे निरीक्षकाचे मत असले पाहिजे.

(२) निरीक्षक पोटकलम (१) अन्वये नमुना घेईल त्याबाबतीत, त्या पोटकलमान्वये ज्यास सूचना देण्यात आली आहे त्या व्यक्तीच्या समक्ष——मात्र ती व्यक्ती बुद्ध्या गैरहजर राहिली असेल तर गोष्ट वेगळी——तो त्या नमुन्याचे तीन भाग करील आणि ते पक्के मोहोरबंद करील व त्यांवर योग्य अशी खूण करील, तसेच तो अशा व्यक्तीस आपली स्वतःची मोहोर लावण्यास व त्यावर खूण करण्यास परवानगी देईल.

(३) वर म्हटल्याप्रमाणे ज्या व्यक्तीला सूचना देण्यात आली असेल त्या व्यक्तीकडे निरीक्षकाने तशी मागणी केली असता, या कलमान्वये घेण्यात आलेल्या नमुन्याचे भाग पाडण्यासाठी, ते मोहोरबंद करण्यासाठी व त्यांवर खूण करण्यासाठी आवश्यक ती साधने पुरवावी लागतील.

(४) निरीक्षक——

(क) नमुन्याचा एक भाग पोटकलम (१) अन्वये ज्या व्यक्तीला सूचना देण्यात आली आहे त्या व्यक्तीस ताबडतोब देईल ;

(ख) दुसरा भाग विश्लेषणासाठी व त्यासंबंधी अभिप्राय देण्यासाठी ताबडतोब सरकारी विश्लेषकाकडे पाठवील ;

(ग) तिसरा भाग एखाद्या न्यायालयात त्या पदार्थाच्या संबंधात कार्यवाही सुरू केली असल्यास त्या न्यायालयात सादर करण्यासाठी स्वतःजवळ ठेवून घेईल.

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम २७ द्वारे, नविन पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २८ द्वारे, मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(५) जो दस्तऐवज म्हणजे या कलमान्वये विश्लेषणासाठी व त्यावर अभिप्राय देण्यासाठी सरकारी विश्लेषकाकडे पाठविलेल्या कोणत्याही पदार्थासंबंधीचा त्या सरकारी विश्लेषकाची स्वाक्षरी असलेला अहवाल असल्याचे दिसते असा कोणताही दस्तऐवज त्या पदार्थाच्या संबंधात सुरू करण्यात आलेल्या कोणत्याही कार्यवाहीत पुरावा म्हणून वापरता येईल.

[१][ ९१क. (१) मुख्य निरीक्षक किंवा महानिदेशक, कारखानेविषयक सल्ला सेवा व कामगार संस्था किंवा भारत सरकारचा महानिदेशक, आरोग्य सेवा यास अथवा राज्य शासन किंवा मुख्य निरीक्षक किंवा महानिदेशक, कारखानेविषयक सल्ला सेवा व कामगार संस्था, किंवा महानिदेशक, आरोग्य सेवा हा या संबंधात प्राधिकृत करील अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्यास, कारखान्याच्या कार्यचालकाला किंवा व्यवस्थापकाला किंवा त्या त्या वेळी जी व्यक्ती कारखान्याचा प्रभारी म्हणून दिसत असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला लेखी नोटीस दिल्यानंतर, कारखान्याच्या नेहमीच्या कामाच्या वेळेच्या दरम्यान केव्हाही किंवा त्याला आवश्यक वाटेल अशा इतर कोणत्याही वेळी सुरक्षेची व व्यावसायिक आरोग्याची पाहणी करता येईल आणि अशा कार्यचालकास किंवा व्यवस्थापकास किंवा अन्य व्यक्तीस अशा पाहणीसाठी सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून द्याव्या लागतील, त्यामध्ये, संयंत्र व यंत्रसामग्रीची तपासणी व चाचणी, आणि नमुने व पहाणीशी संबद्ध अशी इतर आधारसामग्री गोळा करणे यासाठी लागणाऱ्या सोयींचा समावेश असेल. **सुरक्षा व व्यावसायिक आरोग्यविषयक पाहणी.**

(२) पोटकलम (१) खालील पाहणीचे काम अधिक सुकर करण्यासाठी प्रत्येक कामगार पाहणी करणाऱ्या व्यक्तीने, त्याला तसे फर्माविले तर, अशा व्यक्तीला आवश्यक वाटेल अशी वैद्यकीय तपासणी करून घेण्यासाठी हजर राहील आणि त्याच्याकडे असलेली व पाहणीशी संबद्ध असलेली सर्व माहिती पुरवील.

(३) पोटकलम (२) खाली वैद्यकीय तपासणी करून घेण्यासाठी किंवा माहिती पुरवण्यासाठी कामगाराने खर्च केलेल्या कोणत्याही वेळाच्या संबंधात, वेतन व अतिकालिक कामाबद्दलचे जादा वेतन यांची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा कामगाराने त्या वेळात कारखान्यात काम केले असे मानण्यात येईल. ]

[२][ स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, पोटकलम (१) अन्वये, सर्वेक्षण करणाऱ्या व्यक्तीने राज्य शासनाला सादर केलेला अहवाल, (कोणताही असल्यास) हा या अधिनियमान्वये निरीक्षकाने सादर केलेला अहवाल असल्याचे मानण्यात येईल. ]

## प्रकरण दहा

## शिक्षा व कार्यपद्धती

९२. या अधिनियमात अन्यथा स्पष्ट शब्दांत उपबंधित केलेल्या बाबी सोडून आणि कलम ९३ च्या उपबंधांच्या अधीनतेने, जर कोणत्याही कारखान्यात किंवा कारखान्याच्या संबंधात, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या कोणत्याही उपबंधांचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही लेखी आदेशाचे व्यतिक्रमण करण्यात आले असेल तर, त्या कारखान्याचा कार्यचालक आणि व्यवस्थापक यापैकी प्रत्येकाला अपराधाबद्दल दोषी धरण्यात येईल आणि ते [३][दोन वर्षापर्यंत] असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा [३][एक लाख] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस आणि दोषसिद्धीनंतर असे व्यतिक्रमण चालू राहिल्यास, व्यतिक्रमण चालू राहील अशा प्रत्येक दिवसागणिक [३][एक हजार रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होतील : **अपराधांबद्दल सर्वसाधारण दंड.**

[४][परंतु, प्रकरण चारचा कोणताही उपबंध अथवा त्याखाली किंवा कलम ८७ खाली केलेला कोणताही नियम यांच्या व्यतिक्रमणामुळे मृत्युमध्ये किंवा गंभीर शारीरिक इजेमध्ये पर्यवसान होणारा असा अपघात घडलेला असेल त्या बाबतीत द्रव्यदंड, मृत्युस कारणीभूत होणाऱ्या अपघाताच्या बाबतीत [५][पंचवीस हजार रुपयांपेक्षा] व गंभीर शारीरिक इजेस कारणीभूत होणाऱ्या अपघाताच्या बाबतीत [५][पाच हजार रुपयांपेक्षा] कमी असणार नाही.

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ३९ द्वारे, हे कलम समाविष्ट करण्यात आले.

२. १९८७ चा अधिनियम २०, कलम २९ द्वारे, हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे, मूळ मजकुराऐवजी घातले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

४. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ४० (ख्) द्वारे, हे परंतुक आणि स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

५. १९८७ चा अधिनियम २०, कलम ३० द्वारे, मूळ मजकुराऐवजी घातले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण.**—या कलमामध्ये आणि कलम ९४ मध्ये "गंभीर शारीरिक इजा" याचा अर्थ, ज्या इजेमुळे परिणामी कोणत्याही अवयवाची उपयुक्तता कायमची गमवावी लागणे किंवा त्याला कायमची इजा पोहोचणे किंवा दृष्टी अथवा श्रवणशक्ती कायमची गमवावी लागणे किंवा तिला कायमची इजा पोहचणे किंवा कोणतेही हाड मोडणे किंवा तसा परिणाम होणे सर्वथा संभाव्य असेल ती इजा असा आहे, परंतु, त्यामध्ये हाताच्या किंवा पायाच्या कोणत्याही बोटाच्या पेराचे हाड किंवा सांधा मोडणे (एकापेक्षा अधिक हाडे किंवा सांधे मोडणे नव्हे) याचा समावेश होणार नाही.]

**विवक्षित परीस्थितीत परिवास्तूच्या मालकांचे दायित्व.** [1][९३. (१) जेव्हा एखाद्या परिवास्तूतील निरनिराळ्या इमारती या निरनिराळे कारखाने म्हणून, निरनिराळ्या कार्यचालकांना भाडेपट्टयाने दिल्या असतील तेव्हा, त्या परिवास्तूचा मालक हा पोचमार्ग, सांडपाण्याचा निचरा, पाणीपुरवठा, दिवाबत्ती व स्वच्छता यांसारख्या समाईक सोयी व सेवा यांची व्यवस्था करण्यास व त्या सुस्थितीत ठेवण्यास दायी असेल.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात परिवास्तूच्या मालकाला आदेश देण्याचा मुख्य निरीक्षकास राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने अधिकार असेल.

(३) कोणत्याही परिवास्तूतील स्वतंत्र किंवा स्वयंपूर्ण असे मजले किंवा गाळे निरनिराळ्या कार्यचालकांना स्वतंत्र कारखाने म्हणून वापरण्याकरिता भाडेपट्टयाने दिले असतील तेव्हा पुढील बाबतीत या अधिनियमाच्या उपबंधांचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण झाल्यास, त्या परिवास्तूचा मालक हा जणू काही कारखान्याचा कार्यचालक किंवा व्यवस्थापक असल्याप्रमाणे जबाबदार राहील.

(एक) शौचकूप, मुताऱ्या व धुण्याच्या सोयी—जेथवर ह्या प्रयोजनांसाठी समाईक पाणीपुरवठा चालू ठेवण्याचा संबंध असेल तेथवर ;

(दोन) मालकाची मालकी असलेल्या आणि कार्यचालकाकडे खासकरून सांभाळण्यासाठी किंवा त्याच्या उपयोगासाठी स्वाधीन करण्यात न आलेल्या यंत्रसामग्रीला व संयंत्राला कुंपण घालणे ;

(तीन) मजले किंवा गाळे याकडे जाण्यास सुरक्षित साधने आणि जीने व सर्वांसाठी असलेले जाण्या येण्याचे मार्ग हे सुस्थितीत व स्वच्छ ठवणे ;

(चार) आग लागल्यास त्या प्रसंगी बाळगावयाची सावधगिरी ;

(पाच) पाळणे व लिफ्ट सुस्थितीत ठेवणे ; आणि

(सहा) या जागेमध्ये पुरवलेल्या इतर कोणत्याही समाईक सुखसोयी नीट राखणे.

(४) पोटकलम (३) च्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात परिवास्तूच्या मालकाला आदेश देण्याच्या मुख्य निरीक्षकास, राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, अधिकार असेल.

(५) मालकाच्या दायित्वासंबंधातील पोटकलम (३) चे उपबंध हे कोणत्याही परिवास्तूत सामाईक शौचकूप, मुताऱ्या व धुण्याच्या सोयी यांसहित असलेले स्वतंत्र कक्ष निरनिराळे कारखाने म्हणून वापरण्याकरिता निरनिराळ्या कार्यचालकांना भाडेपट्टयाने दिले असतील त्या बाबतीत लागू होतील.

परंतु, शौचकूप, मुताऱ्या व धुण्याच्या सोयी यांची व्यवस्था करण्याच्या व त्या सुस्थितीत ठेवण्याच्या संबंधातील आवश्यक गोष्टींचे पालन करण्यासही मालक दायी असेल.

(६) कलम ४६ किंवा कलम ४८ च्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात पोटकलम (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परिवास्तूच्या मालकाला आदेश देण्याचा मुख्य निरीक्षकास, राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, अधिकार असेल.

(७) कोणत्याही परिवास्वतूरील एखादा कक्ष किंवा छपरी यांचे भाग, स्वतंत्र कारखाने म्हणून वापरण्याकरिता निरनिराळ्या कार्यचालकांना भाडेपट्टयाने दिले असतील तेव्हा, त्या परिवातूस्चा मालक, पुढील उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण झाल्यास त्याबद्दल जबाबदार असेल :—

(एक) प्रकरण तीन—कलमे १४ व १५ खेरीजकरून ;

(दोन) प्रकरण चार—कलमे २२, २३, २७, ३४, ३५ व ३६ खेरीजकरून :

परंतु, कलमे २१, २४ व ३२ यांच्या उपबंधांच्या संबंधा मतेलकाचे दायित्व, त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या गोष्टींना असे उपबंध जेथवर लागू असतील थव र मर्यादित असेल :

परंतु आणखी असे की, कार्यचालक हा, त्याच्या मालकीचे किंवा त्याने पुरविलेले संयंत्र व यंत्रसामग्री यांच्या संबंधात, चौथ्या प्रकरणाच्या उपबंधांचे पालन करण्यासाठी जबाबदार असेल ;

(तीन) कलम ४२.

(८) पोटकलम (७) च्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, परिवास्तूच्या मालकाला आदेश देण्याचा मुख्य निरीक्षकास, राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, अधिकार असेल.

---

१. १९५४ चा अधिनियम २५, कलम २१ द्वारे, मूळ कलम ९३ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(९) पोटकलमे (५) व (७) यांच्या सबंधात या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाच्या प्रयोजनार्थ रोजगारी कामगारांच्या एकूण संख्येची संगणना करताना संपूर्ण परिवास्तू हा एकच कारखाना आहे असे समजण्यात येईल.]

९४. [१][(१)] ज्या कोणत्याही व्यक्तीस कलम ९२ अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल अशी व्यक्ती त्याच उपबंधाच्या व्यतिक्रमणाचा अंतर्भाव असलेला अपराध केल्याबद्दल पुन्हा दोषी ठरली तर, ती व्यक्ती नंतरच्या दोषसिद्धीअंती [२][तीन वर्षांपर्यंत] असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास, किंवा [२][दहा हजार] रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु [२][दोन लाख] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल : **पूर्वीच्या दोषसिद्धीनंतर, वाढीव शिक्षा.**

[३][परंतु, न्यायालयास न्यायनिर्णयामध्ये कोणतीही पुरेशी व विशेष कारणे नमूद करून [२][दहा हजार] रुपयांपेक्षा कमी असेल इतका द्रव्यदंड बसवता येईल :

परंतु आणखी असे की, प्रकरण चारच्या अथवा त्याखाली किंवा कलम ८७ खाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाच्या व्यतिक्रमणामुळे मृत्यूमध्ये किंवा गंभीर शारीरिक इजेमध्ये पर्यवसन होणारा असा अपघात घडलेला असेल त्या बाबतीत द्रव्यदंड, मृत्यूस कारणीभूत होणाऱ्या अपघाताच्या बाबतीत [२][पस्तीस हजार] रुपयांपेक्षा व गंभीर शारीरिक इजेस कारणीभूत होणाऱ्या अपघाताच्या बाबतीत [२][दहा हजार] रुपयांपेक्षा कमी असणार नाही.]

[४][(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, ज्या अपराधाबद्दल त्या व्यक्तीला त्यानंतर दोषी ठरवण्यात आले असेल तो अपराध घडण्याच्या लगतपूर्व दोन वर्षांहून अधिक काळापूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही दोषसिद्धीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.]

९५. जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये निरीक्षकास प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराचा तो वापर करत असताना त्यास बुद्धया अडथळा करील, किंवा या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांन्वये राखण्यात आलेल्या त्याच्या ताब्यातील कोणत्याही नोंदवह्या किंवा इतर दस्तऐवज निरीक्षकाने मागितले असता ते सादर करण्यात कसूर करील, किंवा कारखान्यातील कोणत्याही कामगारास निरीक्षकापुढे हजर व्हावे लागू नये अगर निरीक्षकाकडून त्याची तपासणी होऊ नये अशातऱ्हेने त्याची ओळख गुप्त राखील किंवा त्यास प्रतिबंध करील ती व्यक्ती [५][सहा] महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा [५][दहा हजार] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल. **निरीक्षकास अडथळा केल्याबद्दल शिक्षा.**

९६. जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल खटला भरण्याच्या प्रयोजनासाठी जेथवर आवश्यक असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, कलम ९१ अन्वये केलेल्या विश्लेषणाचा निकाल प्रसिद्ध करील किंवा कोणत्याही व्यक्तीजवळ प्रकट करील ती व्यक्ती, [६][सहा] महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा [६][दहा हजार] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल. **कलम ९१ खालील विश्लेषणाचा निकाल गैरपणे जाहीर केल्याबद्दल शिक्षा.**

[७][९६क. (१) कलमे ४१ख, ४१ग किंवा ४१ज यांच्या किंवा त्या अन्वये तयार केलेल्या नियमांच्या उपबंधांचे अनुपालन करण्यात जो कोणी कसूर करील किंवा त्यापैकी कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील तो, किंवा अशा कसुरीबद्दल किंवा उल्लंघनाबद्दल सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल आणि अशी कसूर करणे किंवा उल्लंघन करणे पहिल्या कसुरीच्या वा उल्लंघनाच्या दोषसिद्धीनंतरही चालू राहिल्यास, त्या प्रत्येक दिवसासाठी पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडास पात्र होईल. **कलमे ४१ ख, ४१ ग व ४१ ज यांच्या उपबंधांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.**

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ४१(क्) द्वारे, मुख्य अधिनियमातील कलम ९४ ला त्या कलमाचे 'पोटकलम (१)' असा नवीन क्रमांक देण्यात आला.

२. १९८७ चा अधिनियम २०, कलम ३१, द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ४१ (क्) (दोन) द्वारे, मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

४. वरील अधिनियमांच्या कलम ४१ (ख्) द्वारे, नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोटकलम (१) नंतर हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

५. १९८७ चा अधिनियम २०, कलम ३२ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ३३ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (एक) मध्ये निर्देशित केलेली कसूर किंवा उल्लंघन जर दोषसिद्धीच्या तारखेनंतर एक वर्षापेक्षा अधिक काळ चालू राहिली तर अपराधी; दहा वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल.]

**कामगारांनी केलेले अपराध.**

९७. (१) कलम १११ च्या उपबंधांच्या अधीनतेने, जर कारखान्यात कामावर लावलेला कोणताही कामगार, कामगारावर कोणतेही दायित्व किंवा कर्तव्य लादणाऱ्या या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा आदेशांच्या कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण करील तर, तो [१][पाचशे] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(२) कोणताही कामगार पोटकलम (१) अन्वये शिक्षापात्र अपराध केल्याबद्दल दोषी ठरेल त्याबाबतीत, कारखान्याचा कार्यचालक किंवा व्यवस्थापक हा त्या व्यतिक्रमणाच्या संबंधातील अपराधाबद्दल दोषी आहे असे समजण्यात येणार नाही. मात्र त्या अपराधास प्रतिबंध करण्यासाठी हरप्रकारे बाजवी उपाय योजण्यात त्याने कसूर केली होती असे सिद्ध करण्यात आले तर गोष्ट वेगळी.

**खोट्या स्वास्थ्य प्रमाणपत्राचा उपयोग केल्याबद्दल शिक्षा.**

९८. जी कोणतीही व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस कलम ७० अन्वये देण्यात आलेल्या स्वास्थ्य प्रमाणपत्राचा त्याच कलमान्वये आपणास देण्यात आलेले प्रमाणपत्र म्हणून जाणूनबुजून उपयोग करील किंवा तसा उपयोग करण्याचा प्रयत्न करील किंवा जी कोणतीही व्यक्ती स्वत:साठी असे प्रमाणपत्र मिळवून त्या प्रमाणपत्राचा जाणूनबुजून दुसऱ्या व्यक्तीस उपयोग करू देईल किंवा उपयोग करू देण्याचा प्रयत्न करू देईल, ती व्यक्ती, [२][दोन] महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा [२][एक हजार] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**[[३]बालकाला दोन ठिकाणी कामावर लावण्यास परवानगी दिल्याबद्दल शिक्षा.**

९९. एखाद्या बालकाने ज्या दिवशी एखाद्या कारखान्यात काम केले असेल त्याच दिवशी त्याने दुसऱ्या कारखान्यात आधीच काम केलेले असेल तर, त्या बालकाची आई किंवा त्याचे वडील अथवा त्याचा पालक अथवा त्याच्यावर ताबा किंवा नियंत्रण असणारी अथवा त्याच्या वेतनातून कोणताही प्रत्यक्ष फायदा मिळविणारी व्यक्ती, [३][एक हजार] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल— मात्र बालकाने त्याप्रमाणे काम केले तेव्हा त्याला आईची वा वडिलांची किंवा पालकांची किंवा अशा व्यक्तीची संमती किंवा मूकानुमतीही नव्हती असे न्यायालयाला दिसून आले तर गोष्ट वेगळी.

[४]१०० * * * * * *

**विवक्षित बाबतीत कार्यचालकास किंवा व्यवस्थापकास दायित्वातून सूट.**

१०१. एखाद्या कारखान्याच्या कार्यचालकावर किंवा व्यवस्थापकावर या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराध केल्याचा दोषारोप करण्यात येईल त्याबाबतीत, कार्यचालकाने किंवा व्यवस्थापकाने योग्य रीतीने तक्रार केल्यावर आणि तसे करण्याच्या आपल्या हेतूसंबंधी अभियोक्त्यास किमान तीन पूर्ण दिवसांची लेखी नोटीस दिल्यावर, ज्या दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीवर प्रत्यक्ष अपराधी म्हणून त्याचा आरोप असेल त्या व्यक्तीस, आरोपाच्या सुनावणीसाठी नेमलेल्या वेळी, न्यायालयासमोर आणविण्याचा कार्यचालकाला किंवा व्यवस्थापकाला हक्क असेल; आणि जर अपराध घडल्याचे सिद्ध झाल्यावर, कारखान्याच्या कार्यचालकाने किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापकाने—

(क) या अधिनियमाची अंमलबजावणी करवून घेण्याच्या कामी आपण यथायोग्य दक्षता घेतली होती, आणि

(ख) उक्त दुसऱ्या व्यक्तीने प्रस्तुत अपराध केला तेव्हा त्याबद्दल आपणास त्याची माहिती नव्हती, आपली त्यास संमती नव्हती किंवा मूकानुमतीही नव्हती,

असे न्यायालयाला समाधानकारक वाटेल अशा रीतीने सिद्ध केले तर, ती दुसरी व्यक्ती त्या अपराधाबद्दल दोषी ठरवली जाईल आणि ती जणू काही कारखान्याचा कार्यचालक किंवा व्यवस्थापक असल्याप्रमाणे तशाच शिक्षेस पात्र होईल आणि कार्यचालक किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापक अशा अपराधांच्या संबंधात या अधिनियमाखालील कोणत्याही दायित्वापासून मुक्त होईल :

परंतु, वर म्हटल्याप्रमाणे सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असताना कारखान्याच्या कार्यचालकाची किंवा प्रकरणपरत्वे व्यवस्थापकाची, शपथेवर साक्षतपासणी करता येईल आणि त्याची व त्याच्या पुष्टयर्थ तो बोलवील अशा कोणत्याही साक्षीदाराची साक्ष ज्या व्यक्तीवर तो प्रत्यक्ष अपराधी म्हणून आरोप करील त्या व्यक्तीच्या वतीने व अभियोक्त्याकडून उलटतपासणी केली जाण्यास पात्र असेल :

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ३५ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३६ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३८ द्वारे, वगळण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

परंतु आणखी असे की, कार्यचालकाकडून किंवा व्यवस्थापकाकडून प्रत्यक्ष अपराधी म्हणून आरोप करण्यात आलेल्या व्यक्तीस आरोपाची सुनावणी करण्यासाठी नेमलेल्या वेळेस न्यायालयापुढे हजर करता येत नसेल तर, न्यायालय तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत वेळोवेळी सुनावणी तहकूब करील आणि उक्त कालावधीच्या अखेरीस सुद्धा प्रत्यक्ष अपराधी म्हणून आरोप करण्यात आलेली व्यक्ती न्यायालयापुढे आणता येत नसेल तर, न्यायालय कार्यचालकाच्या किंवा व्यवस्थापकाच्या विरुद्ध असलेल्या आरोपीच्या सुनावणीचे काम सुरू करील आणि अपराध सिद्ध झाल्यास कार्यचालकास किंवा व्यवस्थापकास दोषी ठरवील.

**आदेश देण्याचा न्यायालयाचा अधिकार.**

१०२. (१) जेव्हा कारखान्याचा कार्यचालक किंवा व्यवस्थापक या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आला असेल तेव्हा, न्यायालय कोणतीही शिक्षा देताना त्याबरोबरच लेखी आदेशाद्वारे, ज्या गोष्टीच्या संबंधात तो अपराध घडला असेल त्या गोष्टी, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत (ही मुदत न्यायालयास योग्य वाटल्यास आणि त्याबाबतीत अर्ज करण्यात आल्यास वेळोवेळी वाढविता येईल) निस्तरण्यासाठी विनिर्दिष्ट करण्यात येतील असे उपाय योजण्यास त्याला फर्मावू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत, कारखान्याचा कार्यचालक किंवा, प्रकरणपरत्वे व्यवस्थापक हा, न्यायालयाने दिलेल्या मुदतीत अगर मुदत वाढविलेली असल्यास अशा कोणत्याही वाढीव मुदतीत, अपराध चालू राहिल्याबद्दल या अधिनियमान्वये जबाबदार असणार नाही. मात्र अशी मुदत किंवा, प्रकरणपरत्वे, वाढीव मुदत संपल्यावर, जर न्यायालयाच्या आदेशाचे पूर्णपणे पालन करण्यात आले नसेल तर, कार्यचालकाने किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापकाने आणखी अपराध केला असल्याचे समजण्यात येईल; आणि न्यायालय त्याला त्याबद्दल सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास भोगण्याची किंवा अशी मुदत संपल्यावर असा आदेश अंमलात न आणलेल्या प्रत्येक दिवसागणिक शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड भरण्याची किंवा पूर्वोक्तानुसार असा कारावास भोगण्याची आणि द्रव्यदंडही भरण्याची अशा दोन्ही शिक्षा देऊ शकेल.

**कामावर असण्यासंबंधी गृहीतक.**

१०३. जर कोणतीही व्यक्ती भोजनाच्या किंवा विश्रांतीच्या मध्यंतराखेरीज एरव्ही काम चालू असता किंवा यंत्रसामग्री चालू असता कोणत्याही वेळी कारखान्यात दिसून आली तर, ती या अधिनियमाच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या प्रयोजनासाठी त्यावेळी त्या कारखान्यात कामाला आहे असे, त्याविरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, समजण्यात येईल.

**वय सिद्ध करण्याची जबाबदारी.**

१०४. (१) जेव्हा कोणतीही कृती किंवा अकृती ही एखादी व्यक्ती, विवक्षित वयाच्या आतील असती तर, या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराध ठरली असती आणि अशी व्यक्ती सकृतदर्शनी अशा वयाच्या आतील आहे असे न्यायालयाचे मत असेल तेव्हा, अशी व्यक्ती अशा वयाच्या आतील नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर राहील.

(२) प्रमाणन शल्यचिकित्सकाने एखाद्या कामगारासंबंधी लेखी अधिकथन करून त्यात त्याने, आपण त्या कामगारास जातीने तपासले आहे व तो अधिकथनात दाखल केलेल्या वयाच्या आतील आहे असे आपणास वाटते असे लिहून दिल्यास, ते अधिकथन या अधिनियमाच्या व तदन्वये केलेल्या नियमाच्या प्रयोजनांसाठी त्या कामगाराच्या वयाबाबतचा पुरावा म्हणून ग्राह्य ठरेल.

**व्यवहार्यतेची मर्यादा शाबीत करण्याची जबाबदारी.**

[1][१०४क. या अधिनियमाच्या कोणत्याही उपसंबंधाचे किंवा त्या अन्वये तयार केलेल्या नियमांच्या उपबंधाचे उल्लंघन केल्याच्या आणि एखादी गोष्ट करण्याच्या कर्तव्याचे किंवा आवश्यकतेचे पालन करण्यात कसूर केल्याचा ज्यात अंतर्भाव आहे अशा अपराधाबाबतच्या कोणत्याही कार्यवाहीत, जिने अशा कर्तव्याचे किंवा आवश्यक गोष्टीचे पालन करण्यात कसूर केल्याचा आरोप असेल त्या व्यक्तीला, ते कर्तव्य किंवा आवश्यक गोष्ट पुरी करणे खाजगीरीत्या व्यवहार्य नव्हते किंवा प्रकरणपरत्वे, ते कर्तव्य वा गोष्ट पूर्ण करण्यासाठी तिने सर्व व्यवहारी उपाय अवलंबले होते, हे सिद्ध करावे लागेल. ]

**अपराधांची दखल घेणे.**

१०५. (१) या अधिनियमाखालील अपराधाबाबत निरीक्षकाने किंवा त्याच्या लेखी पूर्वमंजुरीनिशी तक्रार केली असल्याखेरीज, कोणतेही न्यायालय त्याची दखल घेणार नाही.

(२) इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाहून कमी दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

**खटल्यांची मुदत.**

१०६. या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला जो कोणताही अपराध करण्यात आला असल्याचे अभिकथन केलेले असेल ती घडल्याची माहिती निरीक्षकास मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत त्याबद्दल तक्रार करण्यात आल्याशिवाय कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही :

परंतु, तो अपराध निरीक्षकाने दिलेल्या लेखी आदेशाचे पालन न केल्याबाबतचा असेल त्या बाबतीत अपराध ज्या तारखेस घडला असे अभिकथन केलेले असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत त्याबाबत तक्रार करता येईल.

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ३९ द्वारे, नवीन कलम समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[1][स्पष्टीकरण—या कलमाच्या प्रयोजनांसाठी—

(क) चालू राहणाऱ्या अपराधाच्या बाबतीत, ठरवून दिलेली मुदत ही अपराध ज्या कालावधीत चालू राहिला असेल त्या कालावधीतील प्रत्येक क्षणाच्या संदर्भात मोजण्यात येईल;

(ख) कारखान्याच्या कार्यचालकाने किंवा व्यवस्थापकाने केलेल्या अर्जावरून कोणतीही कृती करण्यासाठी कालावधी मंजूर करण्यात आला असेल किंवा वाढवून देण्यात आला असेल त्या बाबतीत अशा रीतीने मंजूर केलेला किंवा वाढवून दिलेला अवधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून मुदत मोजण्यात येईल.]

[2][अपराधासाठी कार्यवाही इ. विचारात घेण्याची न्यायालयाची अधिकारिता.

१०६क. या अधिनियमाखालील किंवा त्याअन्वये तयार केलेल्या नियमांखालील कोणत्याही संयंत्राच्या कार्यचालनाबाबतच्या अपराधासंबंधित, कोणत्याही न्यायालयाला अधिकारिता प्रदान करण्याच्या प्रयोजनार्थ, जेथे ते संयंत्र त्यावेळी असेल तेच स्थळ, असा अपराध घडल्याचे स्थळ मानले जाईल.]

## प्रकरण अकरा

## पुरवणी

अपिले.

१०७. (१) ज्या कारखाना-व्यवस्थापकावर निरीक्षकाने या अधिनियमाच्या उपबंधान्वये लेखी आदेश बजावला आहे त्यास किंवा कारखान्याच्या कार्यचालकास, आदेश बजावल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, त्या आदेशाविरुद्ध विहित प्राधिकरणाकडे अपील करता येईल आणि अशा प्राधिकरणास राज्य शासनाने याबाबत केलेल्या नियमांच्या अधीनतेने, तो आदेश कायम करता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा तो फिरवता येईल.

(२) या संबधात राज्य शासनाने केलेल्या नियमांच्या अधीनतेने (न्यायसहायकांच्या मदतीने सुनावणी करता येणार नाही असे अपिलांचे वर्ग त्या नियमांद्वारे विहित करता येतील), अपील प्राधिकरणास, न्यायसहायकांच्या मदतीने, अपिलाची सुनावणी करता येईल किंवा अपील-विनंतीअर्जात तशी मागणी करण्यात आल्यास, त्याप्रमाणे सुनावणी करावी लागेल व उक्त न्यायसहायकांपैकी एक न्यायसहायक अपील प्राधिकरणाकडून व दुसरा, संबंधित उद्योगधंद्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा मंडळाकडून नियुक्त करण्यात येईल:

परंतु, अपिलाच्या सुनावणीसाठी ठरविण्यात आलेल्या वेळेपूर्वी अशा मंडळाने कोणताही न्यायसहायक नियुक्त केलेला नसेल तर, अथवा अशा रीतीने नियुक्त केलेला न्यायसहायक अशा सुनावणीच्या वेळी हजर राहिला नाही तर, अशा अपील प्राधिकरणास अशा न्यायसहायकाच्या मदतीवाचून किंवा तसे योग्य वाटल्यास कोणत्याही न्यायसहायकाच्या मदतीवाचून अपिलाच्या सुनावणीचे काम चालविता येईल—मात्र तो न्यायसहायक पुरेशा कारणामुळे हजर राहू शकला नाही याबाबत अपील प्राधिकरणाची खात्री झाली तर गोष्ट वेगळी.

(३) राज्य शासन याबाबत जे नियम करील त्या नियमांच्या अधीनतेने आणि कोणत्याही प्रकरणात अंशत: पालन करण्याच्या अथवा तात्पुरते उपाय योजण्याच्या संबंधात ज्या शर्ती लादणे अपील प्राधिकरणास योग्य वाटेल त्या शर्तींवर, अपील प्राधिकरण त्यास योग्य वाटले तर, ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश अपिलाचा निकाल होईपर्यंत तहकूब करू शकेल.

नोटिसा लावणे.

१०८. (१) या अधिनियमानुसार किंवा त्याखाली कोणत्याही कारखान्यात ज्या नोटिसा लावणे आवश्यक असेल त्या नोटिसांच्या भरीला, या अधिनियमाचे व तदन्वये केलेल्या नियमांचे विहित करण्यात येतील असे गोषवारे अंतर्भूत असलेली आणि निरीक्षक व प्रमाणन शल्यचिकित्सक यांची नावे व पत्तेदेखील नमूद करणारी एक नोटीस, प्रत्येक कारखान्यात लावावी लागेल.

(२) या अधिनियमानुसार किंवा त्याखाली कारखान्यात ज्या नोटिसा लावणे आवश्यक असेल अशा सर्व नोटिसा इंग्रजीत व कारखान्यांतील बहुसंख्य कामगारांस समजत असलेल्या भाषेत असाव्या लागतील व त्या कारखान्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर किंवा जवळपास कोणत्यातरी ठळक व सोयीस्कर ठिकाणी लावाव्या लागतील आणि त्या सर्व नोटिसा व्यवस्थित व सुवाच्च स्थितीत ठेवाव्या लागतील. १८

(३) मुख्य निरीक्षक, कोणत्याही कारखान्याच्या व्यवस्थापकावर लेखी आदेश बजावून त्याद्वारे कारखान्यातील कामगारांचे आरोग्य, सुरक्षितता किंवा कल्याण यासंबंधात इतर कोणतीही नोटीस किंवा भित्तिफलक कारखान्यात लावण्यास फर्मावू शकेल.

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ४३ द्वारे, हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

२. १९८७ चा अधिनियम २०, कलम ३९ द्वारे, नवीन कलम समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

१०९. राज्य शासन, कारखान्याच्या मालकांवर, कार्यचालकांवर किंवा व्यवस्थापकांवर या अधिनियमाखालील आदेश कशा रीतीने बजावण्यात यावेत ते विहित करणारे नियम करू शकेल. नोटिसा बजावणे.

११०. राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आपल्या मते आवश्यक असतील अशी प्रासंगिक किंवा नियतकालिक प्रतिवेदने सादर करण्यास कारखान्याचे मालक, कार्यचालक किंवा व्यवस्थापक यांना फर्मविणारे नियम करू शकेल. प्रतिवेदने.

१११. (१) कारखान्यातील कोणत्याही कामगाराने,— कामगारांची आबंधने.

(क) कारखान्यातील कामगारांचे आरोग्य, सुरक्षितता किंवा कल्याण साधण्यासाठी कारखान्यात उपलब्ध करण्यात आलेल्या कोणत्याही उपकरणात, सुखसोयीच्या साधनात किंवा इतर वस्तूत: जाणूनबुजून व्यत्यय आणता किंवा त्याचा दुरुपयोग करता कामा नये;

(ख) आपल्या स्वत:च्या किंवा दुसऱ्याच्या जीवितास ज्यायोगे धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य जाणूनबुजून आणि वाजवी कारणावाचून करता कामा नये; आणि

(ग) कारखान्यातील कामगारांचे आरोग्य किंवा सुरक्षितता साधण्यासाठी कारखान्यात उपलब्ध करण्यात आलेल्या कोणत्याही उपकरणाचा किंवा इतर वस्तूचा वापर करण्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करता कामा नये.

(२) कारखान्यात कामावर ठेवलेला कोणताही कामगार या कलमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील तर, तो तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

[1][१११क. प्रत्येक कामगारास पुढील अधिकार असतील,— कामगारांचे अधिकार, इ.

(एक) कामगारांचे कामावर असतानाचे आरोग्य आणि सुरक्षितता या संबंधी कार्यचालकाकडून माहिती प्राप्त करणे,

(दोन) कारखान्यात जेथे शक्य असेल तेथे प्रशिक्षण मिळविणे, किंवा मुख्य निरीक्षकाने रीतसर मान्यता दिलेल्या, व जेथे कामगारांचे कामावर असतानाचे आरोग्य आणि सुरक्षितता यासाठी प्रशिक्षण देण्यात येते अशा प्रशिक्षण केंद्रात किंवा संस्थेत प्रशिक्षण घेण्यासाठी कार्यचालकाकडून स्वत:चे नाव पुरस्कृत करवून घेणे,

(तीन) त्यांच्या आरोग्य संरक्षणासाठी किंवा कारखान्यातील सुरक्षिततेच्या बाबतीत पुरेशी तरतूद नसल्याच्या प्रकरणी प्रत्यक्षपणे किंवा त्याच्या प्रतिनिधीमार्फत निरीक्षकाकडे प्रतिवेदन करणे.]

११२. राज्य शासन, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये विहित करावयाच्या किंवा विहित करता येईल अशा किंवा या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी इष्ट म्हणून समजण्यात येईल अशा कोणत्याही बाबींची तरतूद करण्यासाठी नियम करू शकेल. नियम करण्याचा सर्वसाधारण अधिकार.

११३. केंद्र सरकार, या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनास निदेश देऊ शकेल. निदेश देण्याचे केंद्राचे अधिकार.

११४. कलम ४६ च्या उपबंधांच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या उपबंधान्वये कार्यचालकाने करावयाच्या कोणत्याही व्यवस्थांबद्दल किंवा पुरवावयाच्या सुविधांबद्दल किंवा तेथे पुरवावयाच्या कोणत्याही साधनसामग्रीबद्दल किंवा उपकरणाबद्दल कोणत्याही कामगाराकडून कोणतीही फी किंवा आकार वसूल करता येणार नाही. सुविधा व सुखसोयी यांबद्दल आकार न घेणे.

११५. [2][(१)] या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केले जातील, आणि ते पूर्वप्रकाशनाच्या शर्तीस अधीन असतील; आणि सर्वसाधारण खंड अधिनियम, १८९७ याचे कलम २३, खंड (३) अन्वये विनिर्दिष्ट करावयाची तारीख ही प्रस्तावित नियमांचा मसुदा ज्या तारखेस प्रसिद्ध करण्यात आला असेल त्या तारखेपासून [3][पंचेचाळीस दिवसांच्या] आतील असणार नाही. नियम प्रसिद्ध करणे. १८९७ चा १०.

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ४१ द्वारे, हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४२ द्वारे, पुन: क्रमांकित केले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४२ द्वारे, मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[१][ (२) राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम तो तयार करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर राज्य विधानमंडळासमोर मांडण्यात येईल.]

...रखान्यांस ...लागू होणे.

११६. अन्यथा उपबंधित केले नसेल तर, हा अधिनियम केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीच्या कारखान्यांस लागू असेल.

...न्वये काम ...व्यक्तींना संरक्षण.

११७. या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

...ती प्रकट ...र निर्बंध.

११८. (१) कोणत्याही निरीक्षकाला आपली पदीय कर्तव्ये करीत असताना त्यास माहीत होईल अशी कोणतीही वस्तूनिर्मितीविषयक किंवा वाणिज्यविषयक धंद्यासंबंधीची किंवा कोणत्याही प्रक्रियेसंबंधीची कोणतीही माहिती, या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंबंधात किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही त्याला नोकरीत असताना किंवा नोकरी सोडल्यानंतर प्रकट करता येणार नाही.

(२) पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट अशा धंद्याच्या किंवा प्रक्रियेच्या मालकाकडून लेखी पूर्वसंमती घेऊन अथवा या अधिनियमास अनुसरून असलेल्या कोणत्याही वैध कार्यवाहीच्या (लवाद धरून) प्रयोजनार्थ किंवा या अधिनियमास अनुसरून किंवा अन्यथा करता येईल अशा कोणत्याही फौजदारी कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ किंवा पूर्वोक्त अशा कार्यवाहीच्या कोणत्याही इतिवृत्ताच्या प्रयोजनार्थ करावयाच्या कोणत्याही माहिती-प्रकटनास लागू होणार नाही.

(३) जर कोणताही निरीक्षक पोटकलम (१) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करील तर, तो सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

[२][ ११८क. (१) प्रत्येक निरीक्षक, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन केल्याची जी तक्रार त्याच्या निदर्शनास आणून देण्यात येईल, तिचा मूळ स्रोत गोपनीय ठेवील.

(२) या अधिनियमान्वये तपासणी करीत असताना कोणताही निरीक्षक, कार्यचालकाकडे, व्यवस्थापकाकडे किंवा प्रतिनिधीकडे, ती तपासणी तक्रारीस अनुलक्षून करण्यात आली आहे, ही गोष्ट प्रकट करणार नाही :

परंतु, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट, ज्या व्यक्तीने तक्रार केलेली आहे त्या व्यक्तीने तिचे नाव प्रकट करण्यास संमती दिली असेल अशा कोणत्याही प्रकरणी लागू होणार नाही.]

अधि... ...ामध्ये ...र्तभूत ...री हा ...नियम ...रसणे.

[३][ ११९. कंत्राटी कामगार (विनियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० यामध्ये या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी ते उपबंध परिणामक होतील [४][किंवा त्या त्या वेळी जो कोणताही विधि अंमलात असेल तो परिणामक होईल.]]

...वृत्ती.

१२०. या कलमास जोडलेल्या तक्त्यात दिलेल्या अधिनियमिती याद्वारे निरसित झाल्या आहेत:

परंतु, उक्त अधिनियमिती अन्वये करण्यात आलेली जी कोणतीही गोष्ट, हा अधिनियम त्यावेळी अंमलात असता तर त्या अन्वये करता आली असती ती कोणतीही गोष्ट या अधिनियमान्वये करण्यात आलेली आहे असे समजण्यात येईल.

तक्ता : (निरसित अधिनियमिती) निरसन व विशोधन अधिनियम, १९५० (१९५० चा ३५) कलम २ व अनुसूची पहिली यांद्वारे निरसित.

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ४२ द्वारे, हे नवीन पोटकलम समाविष्ट करण्यात आले. (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४३ द्वारे, हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ४४ द्वारे, हे कलम समाविष्ट करण्यात आले.

४. १९८७ चा अधिनियम २०, कलम ४४ द्वारे, हा नवीन मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ डिसेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

## [1]["पहिली अनुसूची

[कलम २ (ग् ख्) पहा.]

धोक्यात परिणत होणाऱ्या औद्योगिक प्रक्रियांची सूची

१. लोहयुक्त धातू उद्योग—
   लोखंड आणि पोलाद एकात्मिकृत केलेले
   फेरो–संमिश्रण
   विशेष पोलाद

२. अलोहयुक्त धातू उद्योग—
   प्राथमिक धातू उद्योग म्हणजे जस्त, शिसे, तांबे, मँगनिज आणि अॅल्युमिनिअम

३. स्थापित (लोहयुक्त आणि अलोहयुक्त) वाळुने स्वच्छ किंवा गुळगुळीत/खडबडीत करण्यासह ओतीव व फाँर्जिंग करणे आणि सुरुंगाचा बार करणे.

४. कोळसा (कोकसह) उद्योग—
   कोळसा लिग्नाईट, कोक इ.
   इंधन वायू (कोल वायू, प्रोड्युसर गॅस, वॉटर गॅससह)

५. वीज निर्मिती शक्ती उद्योग

६. लगदा आणि कागद (कागद उत्पादितांसह) उद्योग

७. खत उद्योग—
   नायट्रोजन
   फॉस्फेटिक
   मिश्रण

८. सिमेंट उद्योग
   पोर्टलँड सिमेंट (स्लॅग सिमेंट, पझ्झोलोना सिमेंट आणि त्यांच्या उत्पादितांसह)

९. पेट्रोलियम उद्योग—
   तेल शुद्धिकरण
   वंगण तेल आणि चरबीचे तेल

१०. पेट्रो–रासायनिक उद्योग

११. औषधे आणि औषधनिर्माण विषयक उद्योग—
   नशिली द्रव्ये, औषधे आणि औषधनिर्माण

१२. किण्वन उद्योग (आसवनी आणि दारूगाळण)

१३. रबर (कृत्रिम) उद्योग

१४. रंग आणि रंगद्रव्य उद्योग

१५. चर्म शोधन उद्योग

१६. विद्युत विलेपन उद्योग

१७. रासायनिक उद्योग—
   कोळसा भट्टी उप उत्पादन आणि आसवानी उत्पादने
   औद्योगिक वायू (नायट्रोजन, ऑक्सीजन, अॅसिटिलीन, आर्गोन, कार्बन डायॉक्साईड, हायड्रोजन, सल्फर, सल्फर डायॉक्साईड, नायट्रेस ऑक्साईड, हॅलोजनैटेड, हायड्रो-कार्बन, ओझोन इ.)
   –औद्योगिक कार्बन
   –अल्कलीज आणि अॅसिड्स
   –क्रोमेट्स आणि डायक्रोमेट्स

---

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ४५ द्वारे, अनुसूची पहिली व दुसरी समाविष्ट करण्यात आली.

—शिसे आणि त्याचे मिश्रण

—विद्युत रासायनिक (सोडियम धातू, पोटॅशिअम आणि मॅग्निसिअम, क्लोरेट्स, पेरोलॅरेट्स आणि पेरॉक्साईड)

—जलविद्युत उत्पादने (कृत्रिम अपघर्षक, कॅल्शिअम कार्बाइड्स)

—नायट्रोजेनस संयुगे (सायनाईट्स, सायनामाईड्स आणि इतर नायट्रोजेनस संयुगे)

—फॉस्फरस आणि त्याची संयुगे

—हॅलोजन्स आणि हॅलोजनयुक्त संयुगे (क्लोरीन, फ्लोरीन, ब्रोमीन आणि आयोडिन)

—स्फोटके (औद्योगिक स्फोटके आणि विस्फोटन यंत्रे आणि प्रज्वलक यांसह)

१८. कीटनाशके, बुरशीनाशके, शाकनाशी आणि इतर कीटनाशक उद्योग

१९. कृत्रिम राळ आणि प्लास्टिक

२०. मानव—निर्मित तंतू (सेल्युलोजिक आणि नॉन-सेल्युलोजिक उद्योग)

२१. विद्युत संचांची निर्मिती आणि दुरुस्ती

२२. काच आणि मृत्तिका शिल्प

२३. धातूंचे पेषण आणि चकाकी

२४. ॲस्बेस्टॉस व त्याच्या उत्पादितांची निर्मिती, हाताळणी आणि संस्करण

२५. वनस्पती आणि प्राणी यांच्यापासून तेल व चरबी काढणे

२६. बेन्झीन व बेन्झीनमध्ये अंतर्भूत असलेले पदार्थ यांची निर्मिती, हाताळणी आणि उपयोग करणे

२७. कार्बनडाय सल्फाईडचा अंतर्भाव असलेल्या निर्मिती प्रक्रिया व क्रिया

२८. इंटरमिजीएट्सह असलेली रंजके व रंजकसामग्री

२९. शीघ्र ज्वालाग्राही द्रव्ये आणि वायु.

## दुसरी अनुसूची

(कलम ४१ ड पहा)

पर्यावरण कार्यामधील मध्यवर्ती रासायनिक पदार्थांची अनुज्ञेय पातळी

| पदार्थ | उद्भासनाची अनुज्ञेय मर्यादा | | | |
|---|---|---|---|---|
| | काळ—भारांक सरासरी संहतीकरण (८ तास) | | लघु सत्र उद्भासन मर्यादा (१५ मिनिट)* | |
| (१) | पी.पी.एम. (२) | एमजी/एम ३ (३) | पी.पी.एम. (४) | एमजी/एम ३ (५) |
| ॲसिटेलडेहाईड .. .. | १०० | १८० | १५० | २७० |
| ॲसेटिक आम्ल .. .. | १० | २५ | १५ | ३७ |
| ॲसिटोन .. .. | ७५० | १७८० | १००० | २३७५ |
| ॲक्रेलीन .. .. | ०.१ | ०.२५ | ०.३ | ०.८ |
| ॲक्रेलोनीट्राईल-स्कीन .. | २ | ४.५ | ... | ... |
| अल्ड्रीन-स्कीन .. .. | ... | ०.२५ | ... | ०.७५ |
| अल्लाईल क्लोराईड .. | १ | ३ | २ | ६ |
| अमोनिया .. .. | ०.२५ | १८ | ३५ | २७ |
| ॲनिलीन-स्कीन .. .. | २ | १० | ५ | २० |
| ॲनिसाईडीन (ओ.पीजोनर्स) स्कीन | ०.१ | ०.५ | ... | ... |

| पदार्थ | पी.पी.एम्. | एम्जी/एम्$^3$ | पी.पी.एम्. | एम्जी/एम्$^3$ |
|---|---|---|---|---|
| आर्सेनिक आणि संयुगे (अँज अँस) .. | ... | ०.२ | ... | ... |
| बेन्झेन .. .. | १० | २० | २५ | ७५ |
| बेरिलियम .. .. | ... | ०.००२ | ... | ... |
| बोरेनॉन ट्रिफ्लोराईड .. | ०.१ | ०.३ | ... | ... |
| ब्रोमीन .. .. | ०.१ | ०.७ | ०.३ | २ |
| ब्युटेन .. .. | ८०० | १९०० | ... | ... |
| ब्युटेनन (मेथायलेथाईल केटोन एम. इ. के.) | २०० | ५९० | ३०० | ८८५ |
| एन-ब्युटाईल अँसेटेट .. | १५० | ७१० | २०० | ९५० |
| एन-ब्युटाईल अल्कोहोल-स्कीन .. | सी५० | सी १५० | ... | ... |
| द्वितीयक/तृतीयक ब्युटाईल अँसिटेट .. | २०० | ९५० | २५० | ११९० |
| ब्युटाईल मर्सेप्टन .. .. | ०.५ | १.५ | ... | ... |
| कॅडमिअम-भुकटी आणि क्षार (अँज सीडी) | ... | ०.०५ | ... | ०.२ |
| कॅल्शिअम ऑक्साईड .. | ... | २ | ... | ... |
| कार्बेराईल (सेव्हीन) .. | ... | ५ | ... | १० |
| कार्बोफ्युरन (फ्युरॅडन) .. | ... | ०.१ | ... | ... |
| कार्बन डाय सल्फाईड-स्कीन .. | १० | ३० | ... | ... |
| कार्बन मोनाक्साईड .. | ५० | ४० | ४०० | ४४० |
| कार्बन ते ट्रॅक्लोराईड-स्कीन .. | एम ५ | ३० | २० | १२५ |
| कार्बोनाईल क्लोराईड (फॉसजेन) .. | ०.१ | ०.४ | ... | ... |
| क्लोरोबेन्झेन (मोनाक्लोरी-बेन्झन) .. | ७५ | ३५० | ... | ... |
| क्लोरायडेन स्कीन .. .. | ... | ०.५ | ... | ... |
| क्लोरीन .. .. | १ | ३ | ३ | ९ |
| क्लोरोफॉर्म .. .. | १० | ५० | ५० | २२५ |
| बाय-क्लोरोमेथाईल ईथर .. | ०.००१ | ०.००५ | ... | ... |
| क्रोमिक अँसिड आणि क्रोमेट्स (अँज-सी आर) | ... | ०.०५ | ... | ... |
| क्रोम्स सॉल्ट्स (अँज सीआर) .. | ... | ०.०५ | ... | ... |
| कॉपर फ्युम .. .. | ... | ०.२ | ... | ... |
| कॉटन डस्ट, रॉ .. .. | ... | ०.२ | ... | ०.६ |
| क्रोसोल, सर्व समघटक-स्कीन .. | ५ | २२ | ... | ... |
| सायनाईड्स (अँज सीएन) स्कीन .. | ... | ५ | ... | ... |
| सायनोजेन .. .. | १० | २० | ... | .. |
| डी.डी.टी. (डिफ्लोरीडीफेनाईल ट्री-क्लोरोयेथीन) | ... | १ | ... | ३ |
| डेमोटोन-स्कीन .. .. | ०.०१ | ०.१ | ०.०३ | ०.३ |
| डायाझीनॉन-स्कीन .. | ... | ०.१ | ... | ०.३ |
| डीब्युटालई फिथेलेट .. | ... | ५ | ... | १० |
| डायक्लोव्होज (डीडीव्हीपी) स्कीन .. | ०.१ | १ | ०.३ | ३ |
| डायल्ड्रीन-स्कीन .. | ... | ०.२५ | ... | ०.७५ |
| डायनिटीओबेन्झेन (सर्व सम घटक) स्कीन. | ०.१५ | १ | ०.५ | ३ |
| डायनायट्रोटोल्यूयेन-स्कीन .. | ... | १.५ | ... | ५ |
| डायोफेनाईल .. .. | ०.२ | १.५ | ०.६ | ४ |
| एंडोसल्फान (थायोडेन)-स्कीन .. | ... | ०.१ | ... | ०.४ |
| एन्ड्रीन-स्कीन .. .. | ... | ०.१ | ... | ०.३ |
| इथिल अँसिटेट .. .. | ४०० | १४०० | ... | ... |
| इथिल अल्कोहोल .. .. | १००० | १९०० | ... | ... |
| इथिलेमिन .. .. | १० | १८ | ... | ... |
| फ्लोराईड्स (अँज एफ्) .. | ... | २.५ | ... | ... |
| क्लोरीन .. .. | १ | २ | २ | ४ |
| फॉर्मिक अँसिड .. .. | ५ | ९ | ... | ... |
| हायड्रेझिन-स्कीन .. .. | ०.१ | ०.१ | ... | ... |
| हायड्रोजन क्लोराईड .. | सी ५ | सी ७ | ... | ... |
| हायड्रोजन सायनाईड-स्कीन .. | सी १० | सी १० | ... | ... |

| पदार्थ | पी.पी.एम्. | एम्.जी/एम्.³ | पी.पी.एम्. | एम्.जी/एम्.³ |
|---|---|---|---|---|
| हायड्रोजन क्लोराईड (अँज एफ्) .. | ३ | २.५ | ६ | ५ |
| हायड्रोजन पेरॉक्साईड .. | १ | १.५ | २ | ३ |
| हायड्रोजन सल्फाईड .. | १० | १४ | १५ | २१ |
| गॅसोलीन .. .. | ३०० | ९०० | ५०० | १५०० |
| आयोडिन .. .. | सी ०.१ | सी १ | ... | ... |
| आयर्न ऑक्साईडफ्युम (फी २ ओ ३) (ब्रेंज-फी). .. | ... | ५ | ... | १० |
| आयसोएमिल अँसिटेक .. | १०० | ५२५ | १२५ | ६५५ |
| आयसोएमिल अल्कोहोल .. | १०० | ३०० | १२५ | ४५० |
| आयसोब्युटाईल अल्कोहोल . .. | ५० | १५० | ७५ | २२५ |
| लेड अकार्बनी बाफारा आणि भुकटी (अँज पीबी) | ... | ०.१५ | ... | ०.४५ |
| लाइन्डेन स्कीन .. .. | ... | ०.५ | ... | १.५ |
| मॅलेथिन-स्कीन .. .. | ... | १० | ... | ... |
| मॅंगेनिज (अँज एम्एम्)—भुकटी आणि संयुगे. | ... | सी ०५ | ... | ... |
| फ्यूम .. .. | ... | १ | ... | ०.३ |
| मर्क्युरी (अँज एच्जी)—स्कीन अल्कली संयुगे. .. | ... | ०.०१ | ... | ०.०३ |
| सर्व रूपात अपवादनीय अल्कली व्हेपर | ... | ०.०५ | ... | ... |
| अर्रील आणि इनऑर्गेनिक संयुगे .. | ... | ०.१ | ... | ... |
| मेथिल अल्कोहोल (मेथेनोल)—स्कीन | २०० | २६० | २५० | ३१० |
| मेथिल सेलोझॉव्ह स्कीन (२ मेथॉक्सी एथेनोल). . | ५ | १६ | ... | ... |
| मेथिल आयसोब्युटाईल केटोन—स्कीन | ५० | २०५ | ७५ | ३०० |
| मेथिल आयसोसायनेट .. | ०.०२ | ०.०५ | ... | ... |
| नॅपथेलीन .. .. | १० | ५० | १५ | ७५ |
| निकेल कार्बोनिल (अँजनी) .. | ०.०५ | ०.३५ | ... | ... |
| नायट्रिक अँसिड .. .. | २ | ५ | ४ | १० |
| नायट्रिक ऑक्साईड .. .. | २५ | ३० | ३५ | ४५ |
| नायट्रोबेन्झीन-स्कीन .. .. | १ | ५ | २ | १० |
| नायट्रोजन-डायॉक्साईड .. | ३ | ६ | ५ | १० |
| ऑईल मिस्ट, मिनरल्स .. | ... | ५ | ... | १० |
| ओक्सॉन .. .. | ०.१ | ०.२ | ०.३ | ०.६ |
| पॅरिथिओन-स्कीन .. .. | ... | ०.१ | ... | ०.३ |
| फिनॉल-स्कीन .. .. | ५ | १९ | १० | ३८ |
| फोरेट (थायमेट)-स्कीन .. | ... | ०.०५ | ... | ०.२ |
| फोस्जोन (कार्बोनिल-क्लोराईड) .. | ०.१ | ०.४ | ... | ... |
| फॉस्फीन .. .. | ०.३ | ०.४ | १ | १ |
| फॉस्फरस (पिवळा) .. .. | ... | ०.१ | ... | ०.३ |
| फॉस्फरस पेन्टॅक्लोराईड .. | ०.१ | १ | ... | ... |
| फॉस्फरस ट्रायक्लोराईड .. | ०.२ | १.५ | ०.५ | ३ |
| पिक्रीक अँसिड-स्कीन .. .. | ... | ०.५ | ... | ०.३ |
| पायरिडीन .. .. | ५ | १५ | १० | ३० |
| सायलेन (सिलीकॉनटेट्राहाइड्रीड) .. | ५ | ७ | ... | ... |
| सोडीयम हायड्रोक्साइड .. | ... | सी २ | ... | ... |
| सायरेन, मोनोमर (फेनायलेथायलेन). | ५० | २१५ | १०० | ४२५ |
| सल्फर डायॉक्साईड .. .. | २ | ५ | ५ | १० |
| सल्फर हेक्साफ्लोराईड .. | १००० | ६००० | १२५० | ७५०० |
| सल्फुरिक अँसिड .. .. | ... | १ | ... | ... |
| टोलयून (टोल्युओल) .. | १०० | ३७५ | १५० | ५६० |
| ओ-टचुल्याडीन-स्कीन .. | २ | ९ | ... | ... |
| ट्रीब्युटाईल फॉस्फेट .. .. | ०.२ | २.५ | ०.४ | ५ |
| ट्रायक्लोरोइथिलीन .. .. | ५० | २७० | २०० | १०८० |
| युरेनियम, नॅचरल (अँज यू) .. | ... | ०.२ | ... | ०.५ |

| पदार्थ | पी.पी.एम्. | एम्.जी/एम्.[3] | पी.पी.एम्. | एम्.जी./एम्.[3] |
|---|---|---|---|---|
| व्हिनाईल क्लोराईड .. | ५ | १० | ... | ... |
| वेल्डिंग फ्युमल .. | ... | ५ | ... | ... |
| झायलिन (ओ–एम–पी.–समघटक .. | १०० | ४३५ | १५० | ६५५ |
| झिरोनियम संयुगे. (अँज झेडआर) .. | ... | ५ | ... | १० |

सी. कमाल मर्यादा दर्शविते.

*लागोपाठच्या दोन उद्‌भासनातील अंतर किमान ६० मी. इतके असावे व दिवसातून जास्तीत जास्त ४ वेळा उद्‌भासने करावीत.

| पदार्थ | अनुज्ञेय वेळ-भारांक सरासरी (८ तास) | संहतीकरण |
|---|---|---|

(१) सिलिका

(क्) क्रायस्टेलिन

(ख्) क्वार्टझ

(१) धूली मापन संज्ञा .. $\frac{१०६००}{\text{टक्के क्वार्टझ} + १०}$ मी.पी.पी.सें.मी.

(२) धूली श्वसन योग्यता संज्ञा $\frac{१०}{\text{टक्के श्वसन योग्य क्वार्टझ} + २}$ मी.ग्रॅ./मी[3]

(३) धुलीची एकूण संज्ञा .. $\frac{१०}{\text{टक्के क्वार्टझ} + ३}$ मी.ग्रॅ./मी.[3]

(२) क्रिस्टेवेलिट .. क्वार्टझ विरुद्ध अर्धांश मर्यादा देणे.

(२) ट्रायडेमाईट .. क्वार्टझ विरुद्ध अर्धांश मर्यादा देणे.

(३) सिलीका एकीकृत .. क्वार्टझसाठी सम मर्यादा.

(४) (क्) ट्रायपोली .. क्वार्टझ विरुद्ध बाब-२ मधील सूत्राप्रमाणे सम मर्यादा देणे.

(ख्) अँमॉरफस .. ७०५ मी. पी. पी. सें. मी. "]

## [1][तिसरी अनुसूची]

(कलमे ८९ व ९० पहा)

अधिसूचित करता येण्यासारख्या रोगांची यादी.

१. शिशापासून विषबाधा—शिशापासून तयार केलेल्या कोणत्याही पदार्थामुळे किंवा शिशाच्या कोणत्याही संयुगामुळे होणारी विषबाधा अगर त्याचे परिणामी रोग धरून.

२. लेड टेट्राइथिलपासून विषबाधा.

३. फॉस्फरसपासून विषबाधा किंवा त्याचे परिणामी रोग.

१. १९८७ चा अधिनियम २०, कलम ४६ द्वारे, या अनुसूचीला "तिसरी अनुसूची" असा नवीन क्रमांक दिला.

४. पाऱ्यापासून विषबाधा किंवा त्यांचे परिणामी रोग.

५. मँगनीजपासून विषबाधा किंवा त्याचे परिणामी रोग.

६. आर्सेनिकपासून विषबाधा किंवा त्याचे परिणामी रोग.

७. नायट्रसच्या धूमापासून विषबाधा.

८. कार्बन बायसल्फाईडपासून विषबाधा.

९. बेंझिनपासून विषबाधा—बेंझिनचा कोणताही समजातीय किंवा त्याचे नेट्रो किंवा अमिडोसाधित पदार्थ यामुळे होणारी विषबाधा किंवा त्याचे परिणामी रोग धरून.

१०. क्रोमव्रणन किंवा त्याचे परिणामी रोग.

११. काळपुळी.

१२. सिलिकॉसिस.

१३. ॲलिफॅटिक सीरीजचे हॅलोजेन किंवा त्यांच्या हायड्रोकार्बनचे हॅलोजेनसाधित पदार्थ यांपासून विषबाधा.

१४. (क) रेडियम किंवा इतर किरणोत्सर्गी पदार्थ,

(ख) क्ष—किरणे,

यांमुळे दिसून येणारी विकृतीची लक्षणे.

१५. बाह्यत्वचा ग्रंथीचा प्रथमावस्थतील कर्करोग. (अेपिथेलिओमॅटस् कॅन्सर).

१६. विषयुक्त रक्तक्षय.

१७. विषारी पदार्थामुळे होणारी विषयुक्त कावीळ.

[1][१८. तेलामुळे उठणारे पुरळ किंवा खनिज तेले आणि खनिज तेले हा मुख्य घटक असलेली मिश्रणे यामुळे होणारे चर्मरोग.

१९. बायसिओनॉसिस.

२०. ॲस्बेस्टासिस.

२१. रसायने व रंग यांच्या प्रत्यक्ष संपर्कामुळे उद्भवणारे व्यवसायजन्य किंवा संपर्कजन्य चर्मरोग. रसायने व रंग दोन प्रकारचे असतात—मूलक्षोभक व ॲलर्जिक संवेदनकारक.

२२. आवाजामुळे श्रवणशक्ती गमावणे (अत्यंत तार स्वरातील आवाज ऐकावा लागल्यामुळे).]

[2][२३. बेरीलियम पॉयझनींग.

२४. कार्बन मोनाक्साइड.

२५. कोल मायनरस न्यूमोकोनीऑसीस.

२६. फॉसजीन पॉयझनींग.

२७. व्यवसायजन्य कर्करोग (ऑक्यूपेशनल कॅन्सर).

२८. आयसोसायनेट पॉयझनींग.

२९. टॉक्सीक नेफ्रायटीस.]

---

१. १९७६ चा अधिनियम ९४, कलम ४५ द्वारे, हे क्रमांक व नोंदी समाविष्ट करण्यात आल्या.

२. १९८७ चा अधिनियम २०, कलम ४६ द्वारे, नवीन मजकूर समाविष्ट करण्यात आला.

# THE FACTORIES ACT, 1948

## कारखाना अधिनियम, १९४८

### इंग्रजी–मराठी शब्दसुची

| | | |
|---|---|---|
| abrasive wheel | घर्षक चक्र | [S. 30(1)] |
| adapting | अनुकूल बदल करणे | [S. 2(*k*)(*i*)] |
| adolescent | किशोर | [S. 2(*d*)] |
| adult consumption unit | प्रौढ उपभोग युनिट | [S. 80(2)-expl. 2] |
| allergic sensitizors | ॲलर्जिक संवेदनकारक | [Sch. 21] |
| attendant circumstances | सहवर्ती परिस्थिती | [S. 90(3)] |
| baffle | बाधिका | [S. 37(2)] |
| balance weight | संतुलन भार | [S. 28(2)(*a*)] |
| belt | कडीपट्टा | [S. 22(1)(*a*)(*i*)] |
| belt-joint | पट्ट्याचा जोड | [S. 22(1)(*a*)(*iii*)] |
| boiler house | बाष्पगृह | [S. 64(2)(*h*)] |
| cage | पिंजरा | [S. 28(2)(*a*)] |
| chain slings | साखळीचे ओळकंबे | [S. 29(3)-expl. (*b*)] |
| choke | चोक | [S. 37(2)] |
| clutch | क्लच | [S. 2(*i*)] |
| cotton opener | कापूस खोलणी यंत्र | [S. 27] |
| coupling | कप्लिंग | [S. 2(*i*)] |
| cover of any opening | उघडणाऱ्या कोणत्याही मुखावरील झाकण | [S. 37(3)(*a*)] |
| crab | खेकडा | [S. 29(3)-expl. (*a*)] |
| delivery | सूपूर्दगी | [S. 2(*k*)(*i*)] |
| delivery end | निकासद्वार | [S. 27-proviso] |
| driving belt | गतिदायक पट्टा | [S. 24(1)(*a*)] |
| drum | ड्रम | [S. 2(*i*)] |
| electric generator | विद्युज्जनित्र | [S. 21(1)(*iv*)(*a*)] |
| enclosed accommodation | बंदिस्त कक्षाची सोय | [S. 19(1)(*b*)] |
| enclosure | कुंपण | [S. 28(1)(*b*)] |
| engine-room | इंजिनघर | [S. 64(2)(*h*)] |
| fast and loose pulleys | कायम बसवलेल्या व सुटया कप्प्या | [S. 24(1)(*a*)] |
| fastening | खिळणी | [S. 37(3)(*a*)] |
| feed end | भरणद्वार | [S. 27-proviso] |
| finish | सफाईदार करणे | [S. 2(*k*)(*i*)] |
| flue | धुरांडे | [S. 36(1)] |
| fly wheel | जडचक्र | [S. 21(1)(*i*)] |
| gin wheel | तिपाईयारीचक्र | [S. 29(3)-expl. (*a*)] |
| glazed tile | झिलईदार फरशी | [S. 19(2)(*b*)] |
| grindstone | घासणीचा दगड | [S. 30(1)] |
| headrace | माथा पन्हळ | [S. 21(1)(*ii*)] |
| head stock of lathe | खरात यंत्राचा वरचा भाग | [S. 21(1)(*iii*)] |
| hoist | पाळणा | [S. 28(1)(*a*)] |
| hook | आकडा | [S. 29(3)-expl. (*b*)] |
| humidification | आर्द्रीकरण | [S. 15(1)(*a*)] |

| | | |
|---|---|---|
| interlocking device | आंतरपाशक क्लृप्ती | [S. 28(1)(*e*)] |
| internal combustion engine | अंतर्ज्वलन इंजिन | [S. 14(2)] |
| lifting machine | उचलयंत्र | [S. 29(1)] |
| lifting tackle | उचलतेगार] | [S. 29(1)] |
| maximum safe working peripheral speed | सुरक्षित कार्याथं कमाल परिधीय वेग | [S. 30(2)] |
| means of escape | सुटकेची साधने | [S. 38(5)] |
| moving pulley | चालती कप्पी | [S. 22(1)(*a*)] |
| non-explosive | अस्फोटक | [S. 37(4)] |
| non-inflammable | अज्वालाग्राही | [S. 37(4)] |
| Occupire | कार्यचालक | [S. 2(*a*)] |
| opening | विवर | [S. 33(1)] |
| outward or inward traverse | बाहेरून आत किंवा आतून बाहेर फिरण्याची कक्षा | [S. 25] |
| overlaping shifts | परस्परव्यापी पाळ्या | [S. 58-m.n.] |
| photogravure | उत्कीर्ण प्रकाश लेख | [S. 2(*k*)(*iv*)] |
| physical standards | शारीरिक प्रमाणपातळी | [S. 76(*b*)] |
| premises | परिवास्तु | [S. 93(1)] |
| primary irritants | मूलक्षोभके | [Sch. 21] |
| prime mover | मूल गतिचालक | [S. 2(*h*)] |
| process of grinding | घासणीची प्रक्रिया | [S. 30(1)] |
| pulley | कप्पी | [S. 2(*i*)] |
| pulley block | कप्याची चौकट | [S. 29(3)-expl. (*a*)] |
| relay | टप्पागट | [S. 61(6)] |
| remedying | निस्तरणे | [S. 102(1)] |
| revolving shaft | फिरती लाट | [S. 22(1)(*b*)] |
| rope slings | दोराचे ओळकंबे | [S. 29(3)-expl. (*b*)] |
| rotary converter | चक्रावर्ती परिवर्तक | [S. 21(1)(*iv*)(*a*)] |
| safe working peripheral speed | सुरक्षित कार्यार्थ परिधीय वेग | [S. 30(1)] |
| sanitary blocks | स्वच्छता कक्ष | [S. 19(2)(*b*)] |
| sanitary type | स्वच्छता पद्धती | [S. 19(2)(*a*)] |
| self-acting machine | स्वयंचलित यंत्र | [S. 25] |
| set screw | पेचखिळा | [S. 22(1)(*b*)] |
| shackles | यंत्री सापळा | [S. 29(3)-expl. (*b*)] |
| shaft | लाट | [S. 2(*i*)] |
| skylight | साप | [S. 17(2)] |
| specifications | तपशीलवारी | [S. 6(1)(*b*)] |
| spread over | कार्यकालविस्तार | [S. 56-m.n.] |
| spur | कंटकचक्र | [S. 22(1)(*b*)] |
| standard family | प्रमाण कुटुंब | [S. 80(2)-expl. (1)] |
| stop-valve | बंद झडप | [S. 37(3)(*a*)] |
| sump | थारोळे | [S. 33(1)] |
| swivels | भोवरकड्या | [S. 29(3)—(expl. (*b*)] |
| system of pulleys | कप्पीची यंत्रणा | [S. 2(*i*)] |
| tailrace | पायथा पन्हळ | [S. 21(1)(*ii*)] |
| transmission machinery | पारेषण यंत्रसामग्री | [S. 2(*i*)] |

| | | |
|---|---|---|
| transporter | परिवाहित्र | [S. 29(3)-expl. (*a*)] |
| traverse | आरपार मार्ग | [S. 25] |
| vat | पिंप | [S. 36(1)] |
| vent | निकास छिद्र | [S. 37(2)] |
| wastes and effluents | माळसाळ व सांडपाणी | [S. 12(1)] |
| water-turbine | पाण टर्बाईन | [S. 21(1)(*ii*)] |
| water-wheel | पाणचक्की | [S. 21(1)(*ii*)] |
| wheel or pinion | चाक किंवा दंतचक्र | [S. 22(1)(*b*)] |
| winch teagle | यंत्रीरहाट टीगल | [S. 29(3)(*a*)] |
| workshop | कार्यशाळा | [S. 86] |
| worm | सर्पिल यंत्र | [S. 22(1)(*b*)] |
| young person | अल्पवयीन व्यक्ती | [S. 2(*d*)] |

# THE FACTORIES ACT, 1948

## कारखाना अधिनियम, १९४८

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अज्वालाग्राही | non-inflammable | [क. ३७(४)] |
| अंतर्ज्वलन इंजिन | internal combustion engine | [क. १४(२)] |
| अनुकूल बदल करणे | adapt | [क. २(ट्)(एक)] |
| ॲलर्जिक संवेदनकारक | allergic sensitzier | [अनुसूची(२१)] |
| अस्फोटक | non-explosive | [क. ३७(४)] |
| आकडे | hooks | [क. २९(३)-स्पष्टी. (ख्)] |
| आंतरपाशक क्लृप्ती | interlocking device | [क. २८(१) (ङ्)] |
| आरपार मार्ग | traverse | [क. २५] |
| आर्द्रीकरण | humidification | [क. १५(१ (क्)] |
| इंजिनघरे | engine-rooms | [क. ६४(२) (ज्)] |
| उघडणाऱ्या कोणत्याही मुखावरील झाकण | cover of any opening | [क. ३७(३) (क्)] |
| उचलतेगार | lifting tackle | [क. २९(१)] |
| उचलयंत्र | lifting machine | [क. २९ (१)] |
| ऋणप्रकाशलेख | photogravure | [क. २(ट्) (चार)] |
| कडीपट्टा | belt | [क. २२(१) (क्) (एक)] |
| कंटकचक्र | spur | [क. २२(१) (ख्)] |
| कप्पी | pulley | [क. २(एक)] |
| कप्पीची यंत्रणा | system of pulleys | [क. २(एक)] |
| कप्प्यांची चौकट | pulley block | [क. २९(३)-स्पष्टी. (क्)] |
| कप्लिंग | coupling | [क. २(एक)] |
| कापूस खोलणी यंत्र | cotton opener | [क. २७] |
| कायम बसवलेल्या व सुट्ट्या कप्प्या | fast and loose pulleys | [क. २४(१) (क्)] |
| कार्यकालविस्तार | spreadover | [क. ५६-समासटीप] |
| कार्यचालक | occupier | [क. २(ढ्)] |
| कार्यशाळा | workshop | [क. (८६)] |
| किशोर | adolescent | [क. २(ख्)] |
| कुंपण | enclosure | [क. २८(१) (ख्)] |
| क्लच | clutch | [क. २(एक)] |
| खरात यंत्राचा वरचा भाग | head stock of lathe | [क. २१(१) (तीन)] |
| खिळणी | fastening | [क. ३७(३) (क्)] |
| खेकडा | crab | [क. २९(३)-स्पष्टी. (क्)] |
| गतिदायक पट्टा | driving belt | [क. २४(६) (क्)] |
| गाळसाळ व सांडपाणी | wastes and effluents | [क. १२(१)] |
| घर्षक चक्र | abrasive wheel | [क. ३० (१)] |
| घासणीचा दगड | grindstone | [क. ३०(१)] |
| घासणीचा प्रक्रिया | process of grinding | [क. ३०(१)] |
| चक्रावर्ती परिवर्तक | rotary convertor | [क. २१(१) (चार) (क्)] |
| चाक किंवा दंतचक्र | wheel or pinion | [क. २२(१) (ख्)] |
| चालती कप्पी | moving pulley | [क. २२(१) (क्)] |
| चोक | chokes | [क. ३७(२)] |
| जडचक्र | fly wheel | [क. २१(१) (एक)] |

## मराठी–इंग्रजी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| झिलईदार फरशा | glazed tiles | [क. १९(२) (ख्)] |
| टप्पागट | relay | [क. ६ (६) ] |
| ड्रम | drum | [क. २ (एक) ] |
| तपशीलवारी | specifications | [क. ६(१) (ख्) ] |
| तिपाईयारी चक्र | gin wheel | [क. २९ (३)-स्पष्टी. (क्)] |
| थारोळे | sump | [क. ३३(१) ] |
| दोराचे ओळकंबे | rope slings | [क. २९(३)-स्पष्टी. (ख्)] |
| धुरांडे | flue | [क. ३६ (१) ] |
| निकासछिद्र | vent | [क. ३७ (२) ] |
| निकास द्वार | delivery end | [क. २७-परंतुक] |
| निस्तरणे | remedying | [क. १०२ (१) ] |
| पट्टयाचा जोड | belt-joint | [क. २२(१) (क्) (तीन) ] |
| आंतरपाशक क्लृप्ती | interlocking device | [क. २८(१) (ङ्) ] |
| परस्परव्यापी पाळ्या | overlapping shifts | [क. ५८-समासटीप] |
| परिवास्तु | premises | [क. ९३(१) ] |
| परिवाहित्र | transporter | [क. २९(३)-स्पष्टी. (क्)] |
| पाणचक्की | water-wheel | [क. २१(१) (दोन) ] |
| पाण टर्बाइन | water turbine | [क. २१(१) (दोन) ] |
| पायथा पन्हळ | tailrace | [क. २१(१) (दोन) ] |
| पारेषण यंत्रसामग्री | transmission machinery | [क. २(एक )] |
| पाळणा | hoist | [क. २८ (१) (क्) ] |
| पिंजरा | cage | [क. २८ (२) (क्) ] |
| पिंप | vat | [क. २६ (१) ] |
| पेचखिळा | set screw | [क. २२(१) (ख्) ] |
| प्रमाण कुटुंब | standard family | [क. ८०(२)-स्पष्टी. १] |
| प्रौढ उपभोग युनिट | adult consumption unit | [क. ८०(२)-स्पष्टी. २] |
| फिरती लाट | revolving shaft | [क. २२(१) (ख्)] |
| बंद झडप | stop-valve | [क. ३७(३) (क्) ] |
| बंदिस्त कक्षांची सोय | enclosed accommodation | [क. १९(१) (ख्) ] |
| बॅफल्स | baffles | [क. ३७(२) ] |
| बाष्पगृह | boiler-house | [क. ६४(२) (ज्)] |
| बाहेरून आत किंवा आतून | outward or inward | [क. २५] |
| बाहेर फिरण्याची कक्षा | traverse | [क. २५] |
| भरणद्वार | feed end | [क. २७-परंतुक] |
| भोवरकड्या | swivels | [क. २९(३)-स्पष्टी.(ख्) ] |
| माथा पन्हळ | headrace | [क. २१(१) (दोन)] |
| मूल गतिचालक | prime mover | [क. २(ज्) ] |
| मूल क्षोभके | primary irritants | [अनुसूची-२१] |
| यंत्रीरहाट टीगल | winch teagle | [क. २९(३) (क्) ] |
| यंत्री सापळा | shackles | [क. २९(३)-स्पष्टी. (ख्)] |
| लाट | shaft | [क. २(एक)] |
| विद्युतजनित्र | electric generator | [क. २१(१) चार (क्) ] |
| विवर | opening | [क. ३३(१) ] |
| शारीरिक प्रमाणपातळी | physical standards | [क. ७६(ख्)] |
| संतुलन भार | balance weight | [क. २८ (२) (क्) ] |

| | | |
|---|---|---|
| सफाईदार करणे | finish | [क. २(ट्) (एक) ] |
| सर्पिल यंत्र | worm | [क. २२(१) (ख्) ] |
| साखळीचे ओळकंबे | chain slings | [क. २९(३)-स्पष्टी. (ख्) ] |
| साणे | skylight | [क. १७(२) ] |
| सुटकेची साधने | means of escape | [क. ३८(५) ] |
| सुपूर्दगी | delivery | [क. २(ट्) (एक) ] |
| सुरक्षित कार्यार्थ परिघीय वेग | safe working peripheral speed | [क. ३० (१) ] |
| स्वच्छता कक्ष | sanitary blocks | [क. १९(२) (ख्) ] |
| स्वच्छता पद्धती | sanitary type | [क. १९(२) (क्) ] |
| स्वयंचलित यंत्र | self-acting machine | [क. २५] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.